सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ५ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वक्फ बोर्डाच्या अधिकारास लगाम, मोदी सरकार आणणार संसदेत महत्वाचे विधेयक

मुंबई : मोदी सरकार सोमवारी महत्वाचे विधेयक आणणार आहे. वक्फ बोर्डाच्या अधिकारात कपात करण्यासंदर्भात हे विधेयक आहे. मोदी सरकार वक्फ बोर्डाला मिळालेले अमर्यादीत अधिकारावर अंकुश लावण्याच्या तयारीत आहेत. सध्या वक्फ बोर्ड कोणत्याही संपत्तीला आपली संपत्ती जाहीर करु शकते. त्यानंतर ती संपत्ती परत घेण्यासाठी मालकांना कोर्टाच्या फेऱ्या माराव्या लागतात. यामुळे संसदेत येणाऱ्या विधेयकात वक्फ बोर्डाचे अधिकार मार्यादीत करण्यात येणार आहे.

वक्फ अधिनियमात ४० संशोधन?

मोदी कॅबिनेट मंत्रिमंडळाची बैठक शुक्रवारी झाली होती. या बैठकीत वक्फ अधिनियमात ४० संशोधन करण्यासंदर्भात चर्चा झाली. नवीन संशोधनानुसार वक्फ बोर्ड ज्या संपत्तीवर दावा करेल त्या संपत्तीसंदर्भात पडताळणी केली जाईल. तसेच वादग्रस्त संपत्तीसंदर्भातही बिलात पडताळणी अनिवार्य करण्यात येणार आहे.

वक्फ बोर्डाकडे ८.७ लाखांपेक्षा जास्त संपत्ती

देशभरात वक्फ बोर्डाकडे ८.७ लाखांपेक्षा जास्त संपत्ती आहे. एकूण ९.४ लाख एकरमध्ये ही संपत्ती पसरली आहे. यामुळे सरकार वक्फ बोर्डाच्या दाव्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरु करण्याच्या तयारीत आहे. ज्या संपत्तीबाबत मालक आणि वक्फ बोर्ड यांच्यात बाद आहे, त्या संपत्तीची पडताळणी केली जाणार आहे. मागील अनेक वर्षांपासून यामध्ये बदल करण्याची मागणी केली जात आहे.

# मुंबईत शाळा बंद आंदोलन, ६ ऑगस्ट रोजी राज्यभर महामोर्चे

## शाळा मुख्याध्यापक संघटनेचा इशारा

मुंबई : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी मंगळवार दि ६ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे निघणार आहेत. मुंबईत शिक्षण निरीक्षक कार्यालयांवर धरणे आंदोलन करणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेचे मुंबई विभाग अध्यक्ष संजय पाटील आणि मुंबई उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी दिली आहे. जिल्ह्यातील सर्व शिक्षक शिक्षकेतर संघटना, महामुंबई शिक्षण संस्था संघटना तसेच शिक्षक सेनेने या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.



राज्यातील विविध शैक्षणिक प्रश्नांसाठी ऑगस्ट क्रांती दिनी ६ ऑगस्टला आंदोलन करण्यात येणार आहे. त्यातील प्रमुख मागण्या अशा आहेत. १५ मार्च २०२४ च्या सेवक संच शासन निर्णयात दुरुस्ती करण्यात यावी, शाळा तेथे मुख्याध्यापक पद मंजूर असावे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा शासन निर्णय तातडीने जाहीर करावा, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला टप्पा अनुदान प्रचलित पध्दतीने शाळेच्या वयाचा विचार करून शंभर टक्के अनुदान जाहीर करावे, पवित्र पोर्टलवरील शिक्षक नियुक्ती ताबडतोब करावी अथवा संस्थेला शिक्षक नियुक्तीसाठी परवानगी द्यावी, २८ जानेवारी २०१९ आणि ११ डिसेम्बर २०२० हे दोन्ही शिक्षकेतर कर्मचारी विरोधित जीआर रद्द करून शासन नियुक्त १३ सदस्यीय समन्वय समितीने शासनास सदर केलेला अहवाल जसाच्या तसा स्वीकारून शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंध मान्य करावा.

शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस मेडिक्लेम योजना आणा

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता मिळाव्यात , चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची मानधनावर नेमणूक न करता पूर्वीप्रमाणेच वेतनावर नेमणूक व्हावी, अल्पभाषिक आणि अल्पसंख्यांक शाळातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील रिक्त पदांची १०० % शिक्षक भरती करण्याची परवानगी मिळावी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस मेडिक्लेम योजना आणावी. २००५ नंतर नियुक्त सर्वच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना मंजूर करावी, मूल्यांकनात पात्र ठरलेल्या सर्वच प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना त्यांच्या मान्यता वर्षाचा विचार करून शंभर टक्के अनुदान मिळावे, अनुदानासाठी पात्र ठरणाऱ्या वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान जाहीर करावे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान सातव्या वेतन आयोगानुसार मिळावे,

११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दूर कराव्या

२००८ नंतर अनुदानावर आलेल्या शाळांनाही त्यांच्या टप्प्याप्रमाणे वेतनेतर अनुदान देय करावे, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी अशा रिक्त असलेल्या प्रशासकीय १४ पदावर पदोन्नत्या तसेच नियुक्त्या त्वरीत कराव्यात, क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनेक प्रस्ताव महिनोमहिने प्रलंबित राहतात, सेवा हमी कायद्यानुसार शिक्षण विभागातील विविध स्तरावरील क्षेत्रीय कार्यालयातही कामकाज व्हावे, सदोष ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दूर कराव्यात अशा मागण्या केल्या आहेत.

# मुंबईत सोसायटीच्या अध्यक्षाने सदस्याचा तोडला दाताने अंगठा

मुंबई : दहिसर पश्चिममधील म्हात्रेवाडीत सोसायटीच्या बैठकीत एक भयानक प्रकार घडला आहे. रविवार असल्याने सोसायटीमध्ये आज सदस्यांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत सोसायटीच्या दृष्टीने विविध विषयावर भाष्य करण्यात आले. सोसायटीची बैठक सुरु असताना अचानक काही सदस्य मध्ये एक दोन मुद्द्यावरुन वादाचे खटके उडाले आणि पुढे त्याचे रुपांतर भांडणात झाले. अचानक प्रकरण हाणामारीवर पोहचले आणि अशातच सोसायटीच्या अध्यक्षाने थेट सदस्याचा अंगठा कापल्याची घटना समोर आली.

घडलेल्या प्रकारानंतर सारेच हैरान झाले आहेत. दहिसर पश्चिममधील इथल्या पोलीस स्थानकात संबंधित प्रकरणाची तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलीस नेमके हा प्रकार इतका विचित्र का घडला याचा तपास करत आहेत. हा सदरचा प्रकार अमरनाथ अपार्टमेंट नामक इमारतीत घडला आहे. अध्यक्ष नित्यानंद परिहार यांनी रविवार पाहून सोसायटीतील अनेक मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित केली होती.

बैठक सुरु असताना अचानक काही मुद्द्यावरुन गोंधळ झाला यावेळी सोसायटीचे अध्यक्ष असेलेले नित्यानंद परिहार यांनी चक्क सोसायटीतील सदस्य आदित्य देसाई यांचा अंगठा तोडला. अमरनाथ अपार्टमेंटमध्ये सदस्य असलेले आदित्य देसाई म्हणाले, की भांडण सुरु झाली आणि अचानक नित्यानंद परिहार यांनी दाताने माझा अंगठा तोडला. आदित्य देसाई यांनी हाच आरोप करत पोलीसांकडे तक्रार दाखल केली आहे.

आदित्य देसाई यांना तात्काळ सोसायटीतील इतर सदस्यांनी रुग्णालयात हलवले, रुग्णालयात उपचार करुन आदित्य देसाई यांना घरी सोडण्यात आले आहे. तसेच भयानक प्रकारामुळे सोसायाटीत सध्या तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## बहिणींनो, काळजी करु नका, 'तरिही' तुम्हाला पैसे मिळतील : देवेंद्र फडणवीस

मुंबई : लाडकी बहीण योजनेमुळे आपली मतं वाढणार आहेत. पुढच्या मार्च महिन्यापर्यंतचे लाडकी बहीण योजनेचे पैसे बजेटमध्ये ठेवले आहेत. काही लोक लाडकी बहीण विरोधात हायकोर्टात गेले होते. मात्र कोर्टाने त्यांची विनंती स्वीकारली नाही. ज्यांचे फार्म अपडेट झाले नाही. त्यांनीही काळजी करण्याची गरज नाही त्यांचे पुढच्या महिन्यात अपडेट झाले तरी पैसे मिळेल. आपण लेक लाडकी योजना आणली. त्यातून १ लाख रुपये मिळणार आहेत.



महाविकास आघाडी वाले रोज सांगतात गॅसचे भाव वाढले. पण आम्ही वर्षाला तीन सिलेंडर मोफत देणार आहोत. मुलींचं शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.


नागपूर भाजप जिल्हा विस्तारित कार्यकर्रीनी बैठक पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. तेव्हा बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं.

## जायकवाडीच्या दिशेने झेपावणार मोठा जलविसर्ग

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ :- नाशिक तसेच नाथसागर धरणाच्या वरील धरण परिसरात क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसाच्या जोरामुळे जायकवाडीच्या दिशेने नांदूर मधमेश्वर धरणातून सोडण्यात आलेला पाण्याचा विसर्ग रविवारी रात्री झेपावनार असल्याची माहिती जायकवाडी दगडी धरणाचे सहाय्यक अभियंता गणेश खराडकर यांनी दिली.

मराठवाडयाला चिंतेत पाडणारी पाणी पातळी नाथसागराने गाठली असतांना गेल्या आठवड्यापासून नाथसागर धारणाने कात टाकण्यास सुरुवात केली. अवघ्या ४ टाक्यांवर आलेला पाणीसाठा रविवारी दिनांक ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ११.२० टक्क्यांपर्यंत पोहचला असून धरणात १५ हजार क्यूसेक च्या आसपास पाण्याची आवक होत आहे. यामुळे नाथसागर धरण्याच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. रविवारी सायंकाळी ६ वाजता नाथसागर धरणाची पाणीपातळी ११.२० टक्के एवढी झाली असून धरणात पाण्याची १५ हजार क्यूसेक पाण्याची आवक होत आहे. धरणात २४३.२४६ दलघमी जिवंत पाणीसाठा आहे. नाथसागर धरणात वरील धरणातून सोडण्यात आलेला पाण्याचा विसर्ग क्यूसेक प्रमाणे भंडारदरा - २५३९४ निळवंडे ३०७७५, नागमठाण ३६६८० दारणा - २२९६६ ओझरवेअर - १२८७३ भावली - १५०९ कडवा - १००९८ भाम - ४३७०,आढळा ४०७० वालदेवी - १८३ पालखेड- ५२५५ नांदूर मधमेश्वर - ४४७६८ असा आहे.



## अहमदनगर शहर सहकारी बँक सावेडी शाखेतील कर्मचारी राजू डाके यांचा प्रामाणिकपणा लॉकर धारकाचे विसरलेले दागिने केली सुपूर्त



नगर - अहमदनगर शहर सहकारी बँकेने नेहमीच ग्राहकांना सर्वोत्कृष्ट व प्रामाणिक सेवा दिलेली आहे ही परंपरा बँकेचे कर्मचारी पुढे चालवीत आहे, त्याचा निश्चित अभिमान आपल्या सर्वांना आहे कर्मचारी हा अधिकारी आणि ग्राहक यांच्यामधील दुवा असून त्यांच्या माध्यमातून बँकेचा नावलौकिक वाढवला जातो तसेच ग्राहकांचा देखील विश्वास संपादन केला जातो लॉकर धारकाने सोन्याच्या स्वरूपातील आयुष्यभराची कमाई सुरक्षित राहावी म्हणून बँकेच्या लॉकरमध्ये ठेवली जाते या धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्याकडून नजरचुकेने आपली मौल्यवान वस्तू विसरून राहत असते अशी घटना अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या सावेडी शाखेमधील लॉकर विभागात घडली सोन्याचे दागिने लॉकर धारकास कर्मचारी राजू डाके यांनी परत केली. या प्रामाणिकपणाच्या माध्यमातून बँकेच्या नावलौकिकात भर पडेल असे प्रतिपादन चेअरमन सीए गिरीश घैसास यांनी केले

अहमदनगर शहर सहकारी बँक सावेडी शाखेचे कर्मचारी राजू डाके यांनी लॉकर विभागात सापडलेले सोन्याचे दागिने लॉकर धारकास परत केल्याबद्दल बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करताना चेअरमन सीए गिरीश घैसास समवेत व्हाईस चेअरमन डॉ. भूषण अनभुले, संचालक अशोक कानडे, संजय घुले प्राध्यापक माणिकराव विधाते, दत्तात्रेय रासकोंडा, निखिल नहार मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन चितळे वरिष्ठ अधिकारी दिनेश लोखंडे, प्रकाश वैरागर, संजय मुळे सेवक प्रतिनिधी संतोष मखरे, राजेंद्र गायकवाड आदि उपस्थित होते.

# शिर्डी एमआयडीसीत संरक्षण सामग्री निर्मिती कारखान्यातून दोन हजार तरूणांना रोजगार : मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

## महसूल पंधरवड्यात राहाता येथे शासकीय योजनांच्या लाभांचे वितरण

शिर्डी, दि.४ ऑगस्ट (उमाका) - राज्य शासन लोकाभिमुख काम करत आहे. शिर्डी एमआयडीसीत संरक्षण सामग्री निर्मिती करणाऱ्या कारखान्यास शासनाने मंजुरी दिली असून या कारखान्याच्या माध्यमातून शिर्डी व राहाता परिसरातील २ हजार युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. असे प्रतिपादन राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे केले.



महसूल पंधरवडा निमित्त राहाता येथे विविध शासकीय योजनांच्या वैयक्तिक लाभांचे महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिर्डी प्रांताधिकारी माणिकराव आहेर, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरिष वमने, राहाता तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी जालिंदर पठारे, मुख्याधिकारी वैभव लोंढे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब जेजुरकर, मुकुंदराव सदाफळ आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सामाजिक अर्थसहाय्यातील संजय गांधी निराधार अनुदान, इंदिरा गांधी , श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन, आदिवासी शासकीय प्रमाणपत्र व शिधापत्रिकेचा प्रत्येकी पाच लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचे महसूलमंत्र्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कृषी विभागाच्या ११ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात योजनांचा लाभ देण्यात आला. यावेळी पोलीस विभागात शासन नियुक्ती मिळालेले स्थानिक युवतींचा व सीए परीक्षा पास झालेल्या युवकाचा महसूलमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महसूलमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले की, एका सप्ताहात योजनेची माहिती नागरिकांपर्यंत पोहचू शकत नाही म्हणून 'महसूल पंधरवडा' साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला. 'पशुसंवर्धन पंधरवडा' ही साजरा करण्यात येत आहे. या महसूल पंधरवड्यात महसूली दाखल्यांचे सर्वसमान्यांना प्रभावीपणे वितरण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात १८९ तलाठ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. अत्यंत पारदर्शक पध्दतीत ही भरती प्रक्रिया पार पडली. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत राहाता तालुक्यात ५४ हजार अर्ज भरण्यात आले. मुख्यमंत्री बळीराजा योजनेत शेतकऱ्यांचे शंभर टक्के वीज बील माफ करण्यात आले. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षणासाठी मुलींना मोफत शिक्षणाचा निर्णय शासनाने घेतला.

राहाता तालुक्यातील या मेळाव्यात सामाजिक अर्थसहाय्याच्या योजनेत ८१३ लाभार्थ्यांना व कृषी विभागाच्या १२०० लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे. तालुक्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत ७६ कोटी ३३ लाखांचा आरोग्य लाभ वितरित करण्यात आला. १७ हजार २६३ शेतकऱ्यांच्या खात्यात ९ कोटी ४४ लाखांचे दूध अनुदान देण्यात आले. ४४ हजार शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ देण्यात आला. निळवंडे धरण ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे कालव्यातून पाण्याचे आवर्तन सोडण्यात येणार आहे.असे ही श्री.विखे पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या कामास जिल्ह्यात सुरूवात आली. मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे अर्ज या मेळाव्यात भरण्यात आले. या योजनेची गटविकास अधिकारी श्री.पठारे यांनी माहिती दिली.

# दैदिप्यमान इतिहासापासून प्रेरणा घेवून व नव्या प्रणालीची कास धरून वकिलांनी व न्यायधीशांनी न्याय प्रक्रियेत योगदान द्यावे : न्यायमूर्ती विभा कंकणवाडी

### जिल्हा न्यायालयाची द्विशताब्दी वर्षपूर्ती उत्साहात

नगर - न्याय व्यवस्थेकडे सामान्य माणूस आशेच्या दृष्टीने बघत आहे. त्यामुळे लोकशाहीचा हा आधारस्तंभ अधिक भक्कम व वृद्धींगत व्हावा यासाठी दैदिप्यमान इतिहासापासून प्रेरणा घेवून व नव्या प्रणालीची कास धरून वकिलांनी व न्यायधीशांनी न्याय प्रक्रियेत योगदान द्यावे. नगर जिल्हा न्यायालयाचा २०० वर्षांचा इतिहास हा दैदिप्यमान आहे. त्यामुळे या जिल्ह्याचे न्याय व्यवस्थेत मोठे योगदान आहे. जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत. त्यामुळे हा



दैदिप्यमान इतिहास कधीही विसरू नका. या भूमीने अनेक चांगले वकील, न्यायाधीश व न्यायमूर्तीही दिले आहेत. त्यामुळे हा दैदिप्यमान इतिहास सर्वांनी जपत पुढे न्यावा, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विभा कंकणवाडी यांनी केले.

अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालयाच्या स्थापनेस २०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल द्विशतक वर्षपूर्ती निमित्त एका दिमाखदार विशेष कार्यक्रमाचे आयोजन रविवारी केले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती व जिल्ह्याच्या पालक न्यायाधीश विभा कंकणवाडी यांनी दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती व नगरच्या सुपुत्री उर्मिला जोशी फलके, न्यायमूर्ती एस.जी. चपळगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा होते. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती एस. के. शिंदे, माजी न्यायमूर्ती सुधाकर देशमुख, महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप, उपाध्यक्ष ॲड. उदय वारुंजीकर, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, ॲड.हर्षद निंबाळकर, ॲड.वसंतराव साळुंके, ॲड. अमोल सावंत, ॲड.जयंत जायभाय, ॲड.सुधाकर आव्हाड, वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. नरेश गुगळे, उपाध्यक्ष ॲड.महेश शेडाळे, सचिव ॲड.संदीप शेळके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी नगर शहरासह जिल्ह्यातील विविध भागातून शेकडो वकील उपस्थित होते.

यावेळी सरकारी वकील सतीश पाटील, सुधाकर आव्हाड, एस.बी. देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.अभय राजे, ॲड.वृषाली तांदळे व ॲड.बेबी बोर्डे यांनी केले. आभार सुनील मुंदडा यांनी मानले. यावेळी वकील संघटनेचे खजिनदार शिवाजी शिरसाठ, सहसचिव संजय सुंबे, महिला सहसचिव भक्ती शिरसाठ, कार्यकारणी सदस्य रामेश्वर कराळे, सारस क्षेत्रे, विनोद रणसिंग, देवदत्त शहाणे, अमोल अकोलकर, शिवाजी शिंदे, अस्मिता उदावंत व गौरव दांगट आदी उपस्थित होते.



## स्पाईन केअर साठी विशेष स्पाईन क्लिनिकची सुरुवात

अहमदनगर - लोकांना सर्वोत्कृष्ट वैद्यकीय सेवा देण्याच्या आपल्या वचनबध्दतेचा एक भाग म्हणून मणिपाल हॉस्पिटल, खराडी तर्फे आज हॉस्पिटलच्या आवारात विशेष अशा स्पाईन क्लिनिकची सुरुवात केली आहे. या उद्घाटन समारंभात बोलतांना मणिपाल हॉस्पिटल खराडीचे स्पाईन सर्जन डॉ. राहुल चौधरी यांनी सांगितले पुणे आणि आसपासच्या भागातील रुग्णांना अजोड अशी स्पाईन केअर सेवा देण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे विशेष अशा स्पाईन क्लिनिकची सुरुवात होय.

## पेठवडजमध्ये कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन

पेठवडज- आज पेठवडज गावात एक भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये ग्रामस्थांनी मा. श्री. बालाजीराव पाटील खतगावकर यांचे आत्मीय स्वागत केले. या मेळाव्यात, त्यांनी विधानसभेसाठी निवडणुकीला उभे राहण्याची मागणी केली. या विशेष कार्यक्रमात सरपंच, उपसरपंच, मार्केट कमिटी संचालक आणि शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती. मा. श्री. पाटील खतगावकर यांनी त्यांच्या भाषणात गावातील विविध समस्यांचे समाधान आणि सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन केले. त्यांनी तरुण वर्गाला प्रेरित करत त्यांच्या क्षमतांचा उपयोग करण्याच्या आणि भविष्यातील योजनांची रूपरेषा तयार करण्याच्या संदर्भात मार्गदर्शन केले. महिलांसाठी त्यांनी विविध विकासात्मक व सामाजिक योजनांची माहिती देऊन त्यांचे जीवन सुधारण्याच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

## सोनी सबवर १२ ऑगस्टपासून श्रीमद् रामायण सुरु होणार

भारतातील प्रमुख कौटुंबिक मनोरंजन वाहिनी सोनी सबवर १२ ऑगस्टपासून श्रीमद् रामायण प्रसारीत होणार आहे. या प्रसिद्ध कथेचा पुढचा अध्याय यात दाखवण्यात येणार आहे. भगवान राम आणि रावणातील पौराणिक युद्धाची समाप्ती १२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७.३० वाजता सोनी सबवरून प्रसारीत होईल. त्यात खूप ॲक्शन सीन असतील. या युद्धानंतर सोनी सब आता युद्धानंतर सुरु झालेली अनोखी कहाणी समोर आणणार आहे. भगवान राम आणि सीता पुन्हा एकत्र आल्यानंतर तसेच अयोध्येत आल्यानंतर काय घडते, हे त्यात दाखवले जाईल. श्रीमद् रामायणाच्या दिव्य कथेतील या पुढच्या भागात अयोध्येला परत येणं आणि त्यांची जुळी मुले- लव आणि कुश यांच्या जन्मानंतर राम आणि सीतेच्या आयुष्यातील आनंद व इतर आव्हाने अशी कथानकं आहेत. प्रभू श्री राम आणि सीता अयोध्येला परत आल्यानंतर त्यांच्या जीवनातील अकथित कहाण्या आणि त्यांचे सखोल अर्थ खूप सुंदरपणे वर्णन केले आहेत.

## इनसाइड इनसाइड बिएसे २०२४: सर्वात मोठ्या सुविधेवर प्रगत मशीन मॅन्युफॅक्चरिंग तंत्रज्ञानाचे प्रीमियर शोकेस

पुणे - लाकूडकामाच्या यंत्रसामग्रीच्या निर्मितीमध्ये जागतिक आघाडीवर असलेली बिएसे , तिचा प्रमुख कार्यक्रम- इनसाइड बिएसे २०२४ चे आयोजन करण्यासाठी सज्ज आहे. हे अत्यंत अपेक्षित इन-हाउस प्रदर्शन ८ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०२४ या कालावधीत बिएसे बेंगळुरू शोरूममध्ये होणार आहे. अभ्यागतांना लाकूड, काच, दगड आणि प्रगत सामग्रीवर प्रक्रिया करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्रीद्वारे कंपनीच्या नवीनतम प्रगती आणि क्षमतांचे साक्षीदार होण्याची अनोखी संधी आहे.नरसी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक श्री नरसी डी. कुलरिया आणि नरसी ग्रुपचे संचालक श्री जगदीश कुलरिया हे आगामी कार्यक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात लिवस्पेस चे श्री गोपाल द्विवेदी, एफएफएससी चे श्री राहुल मेहता, श्री. उदय एन. सायंटिस्ट-जी, पीपीपीटी विभाग, आयपीआयआरटीआय आणि कॅनेडियन वुडमधील डॉ. जिमी थॉमस. उपस्थित लोक पॅनेल चर्चा, उद्योग पुरवठादार प्रदर्शन, थेट प्रात्यक्षिके आणि बिएसे च्या जागतिक दर्जाच्या कारखान्याच्या मार्गदर्शित टूरची देखील अपेक्षा करू शकतात.

## सात्विक मूवमेंटच्या द सात्विक रिवोल्यूशन च्या पॅन इंडिया बुक लॉन्च टूर

पुणे - सात्विक मूवमेंट चा देशव्यापी ग्रंथ दौरा पुण्यात दाखल झाला आहे. द सात्विक रिवोल्यूशन : ७ जीवन-परिवर्तनशील सवयी शोधण्यासाठी पीक हेल्थ अँड जॉय नावाचे त्यांचे नव्याने जाहीर झालेले पुस्तक भावनिक, शारीरिक आणि मानसिक आरोग्य संतुलित करण्यावर केंद्रित आहे. शहरात दौऱ्यादरम्यान त्याचे लोकार्पण आणि चर्चा होणार आहे.८-शहर दौऱ्याची अधिकृतपणे सुरुवात चेन्नई येथे ३ ऑगस्ट रोजी झाली आणि पुणे हे दुसरे शहर असून त्यानंतर मुंबई, अहमदाबाद, दिल्ली, जयपूर, हैदराबाद आणि कोलकाता आणि ३१ ऑगस्ट रोजी बंगळुरू येथे भव्य सात्विक फेस्ट २०२४ सह समाप्त झाले.'द अल्टीमेट सात्विक एक्सपीरियंस ' या टूरचे शीर्षक असलेल्या या टूरमध्ये आठवड्याच्या शेवटी होणाऱ्या मजेदार आणि सर्वांगीण कल्याणकारी क्रियाकलापांची मालिका दाखवली जाईल.

## बादल पे पांव है मालिकेत त्यांचे फुलणारे प्रेम आणखी बहरेल..?

सोनी सबवरील 'बादल पे पांव है..'मालिकेत बानी या महत्त्वाकांक्षी मुलीचे कथानक वर्णन करण्यात आले आहे. बिकट आर्थिक परिस्थिती असूनही ती स्वत:च्या कुटुंबाच्या भल्यासाठी प्रयत्न करत असते. नुकत्याच झालेल्या भागात बानी (अमनदीप सिधू) शेअर मार्केटमधील नफ्यातून तिच्या कुटुंबियांसाठी भेटवस्तू खरेदी करते. रजत (आकाश अहुजा) पासून ती हे लपवून ठेवते. बानीच्या स्वभावामुळे आनंदीत झालेला रजन तिला इयरपॉड्स भेट म्हणून देतो. यामुळे दोघही एक हृदयस्पर्शी क्षण अनुभवतात. आगामी भागात, बानी आणि रजतमधील जवळीकता वाढत होते. पण एक रहस्य बाहेर आल्याने दोघांच्या आनंदावर विरजण पडते.

## भेटा शबीर आहलुवालियाच्या 'फरी फ्रेंड'ला!

आजच्या धावपळीच्या जगामध्ये, जिथे काही मानवी नातेसंबंध तात्पुरत्या काळासाठी टिकतात, पण आपले फरी फ्रेंड्स मात्र आपले सर्वांत ईमानदार जोडीदार बनतात. आपले पाळीव प्राणी आपल्या बिनशर्त प्रेम, भावनिक आधार आणि सुरक्षेची भावना प्रदान करतात आणि अनेकदा ते आपल्या परिवाराचा अतिशय महत्त्वाचा हिस्सा बनून जातात. हीच संकल्पना 'प्यार का पहला नाम राधा मोहन'मध्ये खूपच सुंदर पद्धतीने मांडण्यात आली असून त्यात आपल्या शबीर आहलुवालियाची व्यक्तिरेखा मोहन आणि त्याचा ऑनस्क्रीन मुलगा मनन (शौर्य विजयवर्गिया) यांचा पाळीव कुत्रा चंपी यांच्यामधील प्रेमाचे नाते पाहायला मिळते.

## सरप्राइजेजना उजाळा देत एण्ड टीव्ही कलाकार त्यांच्या हृदयस्पर्शी कथां

फ्रेण्डशीप डे हा खास प्रसंग आहे, जो मित्रांसोबतच्या अतूट नात्याला साजरे करतो. या खास दिनी, व्यक्ती वेळात वेळ काढून त्यांच्या जिवलग मित्रांना भेटतात, एकत्र वेळ व्यतित करतात आणि अधिक आनंद साजरा करत संस्मरणीय आठवणी तयार करतात. हे कलाकार आहेत आशुतोष कुलकर्णी (मालिका 'अटल'मधील क्रिष्णन बिहारी वाजपेयी), अमित भारद्वाज (मालिका 'भीमा'मधील मेवा), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि रोहिताश्व गौड (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी). अशाच एका क्षणाबाबत सांगताना मालिका 'अटल'मध्ये क्रिष्णन बिहारी वाजपेयीची भूमिका साकारणारे आशुतोष कुलकर्णी म्हणाले, ''माझ्या बॅचलर दिवसांमध्ये मी एका मित्रासोबत भाड्याच्या घरामध्ये राहायचो, जो नाइट शिफ्ट्समध्ये काम करायचा आणि सकाळी घरी परत यायचा.

# खड्डे बुजविणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने बिडकीन ग्रामपंचायतच्या पत्राला दाखवली केराची टोपली


तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ४ ऑगस्ट : पैठण ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याचे चौपदरीकरण तसेच जलवाहिनीचे काम चालू असल्यामुळे बिडकीन येथील शेकटा फाटा ते निलजगाव फाटा पर्यंत २५०० मि मि जलवाहिनी पाईप टाकण्याचे काम चालू असलेल्या कामामुळे व पावसामुळे रस्त्याची दुर्दशा झालेली आहे त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे रस्त्यावर झालेल्या खड्ड्यामुळे शेकटा फाटा ते निलजगाव फाटा या रस्त्यावर वारंवार नेहमी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे आपण रस्त्यावरील खड्डे लवकरात लवकर बुजवून देण्यात यावे व आपल्या



कामामुळे नागरिकांना नाहक त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे पत्र बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना लेखी स्वरुपात दि. २३ जुलै रोजी देण्यात आले होते परंतु जीव्हीपीआर इंजिनीअर्स ठेकेदार कंपनी यांनी ग्रामपंचायत यांनी दिलेल्या पत्राला जुमानता नसल्याचे दिसून येत आहे शेकटा फाटा ते निलजगाव फाट्यापर्यंत रोडवरती मोठाले खड्डे पडल्यामुळे त्यामध्ये पावसाचे पाणी तसेच पाईपलाईन नालीमधीला पाणी रोडवर सोडल्यामुळे रस्त्याची दुरावस्था झाली असून या खड्ड्यामुळे अनेक अपघात घडत आहे, या जलवाहिनीचे काम तीन महिन्यापासून चालू असून ह्या कामामुळे वाहनधारक व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व जीव्हीपीआर इंजिनीअर्स ठेकेदार यांनी त्वरित लक्ष घालून रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात यावे अशी मागणी वाहनधारक व स्थानिक नागरिक करत आहे.

## श्रावण मास निमित्ताने १२ महादेवाच्या दर्शनासाठी भक्तांची पर्वणी



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ : श्री क्षेत्र पैठण नगरीत उद्या दिनांक ५ ऑगस्टपासून श्रावण मास पर्व सुरू होत असल्यामुळे शहरातील अति प्राचीन महादेवाच्या दर्शनासाठी परंपरेनुसार महादेव भक्त दर्शनासाठी पैठण येथे येतात. शहरातील बारा महादेवांचा अभिषेक करतात. शहरातील अति प्राचीन पिंपळेश्वर, गाढेश्वर, दोलेश्वर, गंगेश्वर, रामेश्वर, तारकेश्वर, हरहरेश्वर, कालिकेश्वर, बाललिंगेश्वर, इंद्रेश्वर, भुयारेश्वर,नागेश्वर, सिद्धेश्वर यासह अनेक अतिशय प्राचीन मंदिरे शहरात आहेत. १२ महादेवांचा श्रावणात दर्शन घेतल्यास कुटुंबाचे कल्याण होते अशी धारणा भक्तांची असल्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भक्त महादेवाच्या दर्शनासाठी येतात. शहरातील ग्रामीण दैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोलेश्वर मंदिरातही दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते, औरंगजेब या राजाने ढोलेश्वराच्या पिंडीची साखळ दंड लावून उखडून टाकण्याचा प्रयत्न केला पण तरीही त्याला यश आले नाही व पिंडीतून रक्तस्त्राव झाला हा चमत्कार पाहून औरंगजेबासह त्यांच्या सैनिकांची घबराट उडाली व त्यांनी पळ काढला.भाविक महिनाभर पायी जाऊन महादेवांच्या पिंडीचे दर्शन घेतात. श्रावण महिन्याच्या प्रत्येक सोमवारी अन्नदाते साबुदाणा खिचडीचा प्रसाद वाटतात. महाराष्ट्रातील पैठण येथेच प्राचीन १२ महादेवाची मंदिर असलेले हे एकमेव दक्षिण काशीतील क्षेत्र आहे.

## एमजीएममध्ये 'मिथक समजुन घेताना' विषयावरील चर्चासत्राचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संस्था आणि वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिथक समजुन घेताना' या विषयावरील चर्चासत्र बुधवार, दिनांक ७ ऑगस्ट,२०२४ रोजी सकाळी १० वाजता रुक्मिणी सभागृह येथे आयोजित करण्यात आले आहे. मिथक शास्त्राचे अभ्यासक डॉ. अशोक राणा यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असणार आहे. डॉ.अशोक राणा हे ज्येष्ठ विचारवंत असून आतापर्यंत त्यांनी १०२ पुस्तकांचे लिखाण केलेले आहे.

या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित असणार आहेत. या चर्चासत्रात पुरातत्वशास्त्राचे प्रा.आशुतोष पाटील हे डॉ.अशोक राणा यांच्याशी प्रश्नोत्तरे स्वरुपात संवाद साधणार असून मंचावर विविध विद्याशाखांमधील निवडक विद्यार्थी प्रश्नोत्तरे करण्यास उपस्थित असतील. प्रश्नोत्तरे स्वरुपात हा कार्यक्रम होणार आहे. मिथकशास्त्र हा एक महत्वाचा पण दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. आपण आपले दैनंदिन जीवन जगत असताना मिथकांचा संदर्भ देत प्रत्येकजण त्याला वेगवेगळ्या पद्धतीने हाताळत असतो. पण ते नेमके काय आहे? हे समजुन घेणेदेखील आवश्यक असल्याने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके यानी केले आहे.

## १०, ११ ला दोन दिवसीय लोककला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : बालरंगभूमी परिषद मुंबई शाखा संचलित बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर शाखा आयोजित २ दिवसीय लोककला प्रशिक्षण कार्यशाळा एमआयटी हायस्कूल, एन -४, सिडको येथे शनिवार आणि रविवारी (१० व ११ ऑगस्ट) दुपारी १२ ते ४ या वेळेत संपन्न होणार आहे. वर्ष ६ ते १६ वयोगटातील मुलांना कार्यशाळेत सहभागी होता येईल.

कार्यशाळा पूर्णपणे नि:शुल्क असून, या प्रशिक्षण कार्यशाहेत प्रसिद्ध आणि प्रथितयश लोककलाकारांकडून महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककला आणि लोकनृत्य यांची माहिती आणि प्रात्यक्षिके शिकविले जाणार आहेत. याचसोबत सर्व सहभागी शिबिरार्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

यासाठी प्रशिक्षक म्हणून सुप्रसिद्ध शाहीर प्रा. शाहीर अजिंक्य लिंगायत आणि लोकनृत्य कोरिओग्राफर संजय जाधव हे प्रशिक्षण देणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून संजय वानखेडे (मुख्याध्यापक- एमआयटी हायस्कूल), सचिन अनर्थे (संचालक - टीएमटी प्रोडक्शन कंपनी), भाग्यश्री कुलकर्णी (बालरंगभूमी परिषद), आसिफ अन्सारी (बालरंगभूमी परिषद) हे उपस्थित राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून मधुकर खिल्लारे, जी.सी.वरकड, सचिन शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मोफत लोककला प्रशिक्षण कार्यशाळेचा जास्तीत जास्त शालेय तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सोयगाव बस आगारातून वाहतूक नियंत्रक भारत शिमरे सेवानिवृत्त

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

सोयगाव बस आगारातील सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक भारत दिपचंद शिमरे यांच्या सोयगाव बस आगार येथे मंगळवार रोजी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोयगाव बस आगार प्रमुख विजय काळवणे होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्षांच्या हस्ते सेवानिवृत्त भारत दीपचंद शिमरे



यांचा श्रीफळ,शाल देऊन सत्कार करून गौरव करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.याप्रसंगी कैलास बागुल,कृष्णा कावले,सतीश पाटील,विनोद जाधव, जयराम सूर्यवंशी,राहुल ठाकूर,अण्णा ढेपले,ज्ञानेश्वर वाडेकर,माधव पाटील, दिनेश विसपुते,पंजाबराव कुंणधर, विष्णू सोनवणे,दीपक पाटील, आदींसह चालक,वाहक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार जयराम सूर्यवंशी यांनी केले.

> **मी स.न.१९९८ सोयगाव बस आगारामध्ये वाहक म्हणून आलो असता मला सोयगाव बस आगारामध्ये २६ वर्ष ५ महिने कर्तव्य करताना माझे वर्ष फार चांगले दिवस गेले आज मी वाहतूक नियंत्रक म्हणून सेवानिवृत्त होत असून मला मोठा अभिमान होत आहे.**
>
> **- भारत शिमरे सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक**

## सोयगाव बस आगारातून आगार प्रमुख विजय काळवणे यांची सिल्लोड येथे बदली



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

सोयगाव बस आगार प्रमुख विजय काळवणे यांची सिल्लोड बस आगारात बदली झाल्याने त्यांना सोयगाव बस आगाराकडून निरोप व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आला.आगारात हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी वाहतूक निरीक्षक सतिश अंभोरे,प्रमुख कारागीर साबळे, वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर वाडेकर,कैलास बागुल,दिनेश विसपुते,मिसाळ मामा,लिपिक जाधव,संतोष पाखरे,माधव पाटील,आन्ना ढेपले,जयराम सूर्यवंशी, इरफान तडवी,विष्णु सोनवणे,विनोद जाधव,सह चालक,वाहक व यांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सतिश पाटील यांनी केले तर आभार जयराम सूर्यवंशी यांनी मानले.

## महाराष्ट्र राज्य जि. प. कर्मचारी महासंघ छत्रपती संभाजीनगरची कार्यकारिणी जाहीर



खुलताबाद प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ शाखा छत्रपती संभाजीनगर* जिल्हा शाखेची बैठक दिनांक ३ ऑगस्ट २०२४ जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हाध्यक्ष श्री. गणेश धनवई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, या बैठकीस महासंघाचे राज्य मानद अध्यक्ष श्री. एन. एन. ठाकुर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.


वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी २०२४ चा ग्रामविकास विभागास लागु करणे व . मुख्यमंत्री व उप मुख्य मंत्री नी दिलेल्या लेखी आश्वासुना नुसार सुधारीत पेन्शन योजना लागु करण्यासाठी दि ०९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० या एक तासाचे कालावधीत जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालया समोर धरणे निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.

महासंघाचे जिल्हा सरचिटणीस यांची राज्य सरचिटणीस पदी निवड झाल्याने त्यांच्या रिक्त पदी श्री. स्वप्निल घरमोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली तसेच श्री. ज्ञानेश्वर बिडाईत यांची कोषाध्यक्ष पदी व श्री दिनकर आहेवाड यांची कार्यालयीन सचिव या पदी निवड करण्यात आली. तसेच जिल्हा महासंघाच्या रिक्त पदी उपाध्यक्ष पदी श्री ज्ञानेश्वर सोनवणे, श्री. उमेश मिसाळ, श्री. दत्तात्रय हिंगे, श्री आर. एन. पाथरे, सहसचिव पदी श्री. नावेद शेख, श्री. राजेश्वर तांबडे, श्री. शशिकांत गवळी, प्रसिध्दी प्रमुख श्री. अजय सावळे, दादासाहेब काळे, संघटक राजु तेलंग यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल सर्व मित्र परिवाराकडून अभिनंदन करण्यात आले.

## बिडकीन येथे सावता महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ४ ऑगस्ट : कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी - लसूण मिरची कोथिंबिरी अवघा झाला माझ्या हरी संत शिरोमणी सावता माळी महाराज यांची पुण्यतिथी साजरी पैठण तालुक्यातील बिडकीन व परिसर मध्ये दि ३ ऑगस्ट रोजी माळी समाज बांधवांनी संत शिरोमणी सावता माळी महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या



उत्साहात साजरी केली, सर्व सावता महाराज यांच्या मंदिरामध्ये सकाळी अभिषेक करून नैवेद्य देऊन महाआरती करण्यात आली दिवसभर मंदिरामध्ये भक्तीमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, सर्व सावता महाराज मंदिरामध्ये सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते व रात्री भजनाचे कार्यक्रम करण्यात आले होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. २६४/२०२४

अर्जदार : १) केसरबाई भ्र जनार्दन चोरमारे वय ७० वर्षे धंदा शेती रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) भिमराज जनार्दन चोरमारे वय ५४ वर्षे धंदा शेती रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) रायभान जनार्दन चोरमारे वय ४५ वर्षे धंदा शेती रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) बाबासाहेब जनार्दन चोरमारे वय ४३ वर्षे धंदा शेती रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) अनुसयाबाई भ्र. भिमराव वैद्य, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम रा हतनुर ता. कन्नड जि. छत्रती संभाजीनगर ६) देवका भ्र गंगाधर खंडागळे वय ४६ वर्षे, धंदा घरकाम रा तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.पी. लबडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र. ५ व ६ ह्या त्यांच्या बहिणी आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ६ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडील नामे जनार्दन काशिनाथ चोरमारे हे मोजे अंबेलोहळ ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १६/११/२०१८ रोजी मौजे अंबेलोहळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत जनार्दन काशिनाथ चोरमारे यांना अर्जदार क्र.१ ते ६ असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदार क्र.१ ते ६ यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २९/०७/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 290/2024

अर्जदार : १. संगिता नारायण कऱ्हाळे, २. रामेश्वर नारायण कऱ्हाळे, ३. अर्जुन नारायण कऱ्हाळे, सर्व रा. देवळी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

प्रतिपक्षी : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नारायण पंडितराव क-हाळे हे दि.२१/०६/२०२४ रोजी मौजे देवळी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात, लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे. दि.३०/०७/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 305/2024

अर्जदार : १. मेघा भ्र.सोमिनाथ काळे, २. हरी पिता सोमिनाथ काळे, ३. कृष्णा पिता सोमिंनाथ काळे, अर्जदार नं. २ व ३ यांची अपाक आई अर्जदारं नं. १ सर्व रा.सुलतानाबाद, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

प्रतिपक्षी : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी सोमीनाथ आसाराम काळे यांचा दि.२३/०७/२०१९ रोजी मौजे सुलतानाबाद, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत' या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा, मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.३०/०७/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 308/2024

अर्जदार : १. मारोती पित्ता कचरु काळे, २. अलकावाई भ्र. गारोती काळे, ३. ज्योती भ्र.सागर काळे, ४. श्रावणी पिता सागर काळे, ५. यश पिता सागर काळे, ६. मानसी पिता सागर काळे, अर्जदार नं. ४ ते ६ यांचे अपाक आई अर्जदार नं. ३ सर्व रा.सुलतानाबाद, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

प्रतिपक्षी : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी सागर मारोती काळे हे दि.२७/०४/२०२४ रोजी मौजे सुलतानाबाद, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे सायटेशन नोटीस माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि. ०२/०८/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३४/२०२४.

पुढील तारीख ३०/०८/२०२४.

अर्जदार :- १. हनिफाबी भ्र. गोरेखा पठाण, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. इरफान पिता गोरेखा पठाण, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. इमरान पिता गोरेखा पठाण, वय २३ वर्षे, धंदा मजुरी, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. रुख्सानाबी भ्र. असलमखा पठाण, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा, ता. कन्नड ५. अफसानाबी भ्र. अल्ताफखा पठाण, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. धनबाट, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद. ६. फरजानाबी पिता गोरेखा पठाण, वय २१ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. एच.जी. शेख यांच्या मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत गोरेखा इमामखा पठाण यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४ व ५ ही मयताची विवाहित मुली असून अर्जदार क्र. ६ ही अविवाहित मुलगी आहे. अर्जदार क्रं. २ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्रं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत गोरेखा इमामखा पठाण यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील नामे गोरेखा इमामखा पठाण हे दि.२५/०४/२०२१ रोजी मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. सोबत मयत गोरेखा इमामखा पठाण यांचे ग्रामपंचायत कुंजखेडा यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच मयताची आई मानबी भ्र. इमामखा पठाण व वडील हे सुद्धा मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांना मयत गोरेखा इमामखा पठाण यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महसूल दप्तरी, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत गोरेखा इमामखा पठाण हे मौजे कुंजखेडा तांडा, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.२३/०६/२०२३ रोजी मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेम ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०८/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ग्रीन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने औषधी वनस्पतीचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयातील ग्रीन क्लब आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने औषधी वनस्पतीचे वृक्षारोपण करण्यात आले.



या प्रसंगी प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी, महाविद्यालयातील माजी कर्मचारी रवींद्र सरवदे, ग्रीन क्लब मास्टर ट्रेनर, ग्रीन क्लब धाराशिव जिल्हा नोडल अधिकारी व ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डिनेटर प्रा.डॉ.विनोद्कुमार वायचळ, ग्रीन क्लब शिक्षक प्रतिनिधी प्रा.अभय शिंदे, प्रा. अमोल हिंगमिरे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत गुरव, ग्रंथपाल सचिन महाजन, ग्रीन क्लब यूथ व्हाईस प्रेसिडेंट प्रगती माळी, ग्रीन क्लब कॅम्पेन कोऑर्डिनेटर आरती इंगळे, ग्रीन क्लब डॉक्युमेंटेशन कोऑर्डिनेटर बीबी हाजरा पटेल, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## ▶▶संक्षिप्त वृत्त...




### अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे कार्य प्रेरणादायी: प्रा.डॉ.रसाळ

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे कार्य हे आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी यांच्या कार्याची प्रेरणा घेतली पाहिजे, असे मत प्रा. डॉ. सहदेव रसाळ यांनी व्यक्त केले. व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी यानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी, समर्थ आश्रमशाळा येवतीचे संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा.रसाळ यांनी अण्णाभाऊ साठे यांची साहित्यकृती व लोकमान्य टिळक यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमात बोलताना प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती दिली तसेच आजच्या काळामध्ये यांच्या विचारांची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संजय जोशी यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा.बाबासाहेब इंगळे यांना पीएचडी पदवी

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील आंबेवाडी येथील प्रा.बाबासाहेब इंगळे यांनी भौतिकशास्त्र विषयात एचडी पदवी प्राप्त केले आहे प्राध्यापक इंगळे यांनी सिंथेसिस ॲण्ड इन्वेस्टीगेशन ऑफ एनआयसीयुझेड हायइनिशियल परमियाबिलिटी या विषयावर प्रबंध सादर केला होता. प्रा.इंगळे यांनी सोलापूर विद्यापीठातील प्रा. डॉ.एस.एस. सुरवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही पूर्ण केली. त्यांना सहाय्यक मार्गदर्शक प्रा.डॉ.आर.बी.सुरवंशी यांनी मार्गदर्शन केले. उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद येथील प्रा.डॉ.केमधुकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या या यशाबद्दलसंस्थेचे सचिव डॉ.अफसर शेख, संस्थाध्यक्ष संजय कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एस.यू.मासुमदार यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारीवृंद, आंबेवाडी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.



### पोदार जम्बो किड्सची पहिली पोर्टफोलिओ बैठक

**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**

लोटस पोदार लर्न स्कूल मध्ये पोदार जम्बो किड्स येथे पहिली पोर्टफोलिओ बैठक दि.३ ऑगस्ट रोजी संपन्न झाली. या बैठकीमध्ये पोर्टफोलिओ म्हणजे पालक, पाल्य आणि शिक्षक यांचात मुलांची प्रगती आणि ध्येय यावर चर्चा करण्यात आली. तसेच प्रत्येक मुलांची EYFS पोर्टफोलिओ फाईल पालकांना दाखविण्यात आली. या पोर्टफोलिओ बैठकीमध्ये पालकांनी सक्रियपणे सहभाग घेऊन मौल्यवान अभिप्राय प्रदान केला आणि त्यांच्या मुलांच्या विकासामध्ये खूप रस दाखवला. त्यांच्या पाठिंब्याबद्दल आणि सहकार्या बद्दल शाळेने कृतज्ञ व्यक्त केली. या बैठकीसाठी प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे व पोदार जम्बो किड्सच्या प्रमुख मंजिरी सूर्यवंशी तसेच त्यांच्या सहशिक्षिका रागिणी जावळे, आश्विनी पाटील, ज्योती काळे, अश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, रेणुका हिरमुखे, विजया अंबुसे, अनुसया शिंदे, अंजली क्षीरसागर, सरस्वती भालके यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

### राज ठाकरे आज जिल्हा दौऱ्यावर

**धाराशिव/जळकोट, दि.४ ऑगस्ट -**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात धाराशिव जिल्ह्यात निरीक्षकांची टीम पाठवून आढावा घेतला होता. निरीक्षक व स्थानिक पदाधिका-यांसोबत चर्चा, आढावा व मार्गदर्शक करणार आहेत. दि.५ ऑगस्ट (सोमवार) रोजी ते दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास श्रीक्षेत्र तुळजापूर येथे दर्शन घेण्यासाठी येणार आहेत. त्यानंतर पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन धाराशिवकडे मुक्कामी निघणार आहेत. जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन व चर्चा हे ६ ऑगस्ट (मंगळवार) रोजी धाराशिव येथे आयोजित केलेल्या बैठकीत करणार आहेत. पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे, तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार, विधानसभा अध्यक्ष मयूर गाढवे, तालुका सरचिटणीस गणेश पाटील, नळदुर्ग शहराध्यक्ष अलिम शेख, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी मनविसे तालुकाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी केले आहे.

# तुळजापूर विधानसभेत महायुतीविरुध्द महाविकासआघाडी?

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांची मतदारसंघावर पकड घट्ट... इच्छूकांची संख्याही वाढली...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ ऑगस्ट -**

महाराष्ट्रात लवकरच विधानसभेची निवडणुक होणार आहे. त्यामुळे सध्या सर्वच राजकीय पक्षांकडुन विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी करण्यात येत आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघातही विधानसभा निवडणुकीची आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडुन जोरदार तयारी सुरु आहे. यावेळी या मतदार संघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर ओबीसी नेत्या डॉ. स्नेहा सोनकाटे याही या मतदार संघातुन निवडणुक लढविणार आहे.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मोठ्या यशामुळे आज विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडे उमेदवारी मागणाऱ्यांची आज रांग लागली आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघातही महाविकास आघाडीकडुन निवडणुक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. मात्र या मतदार संघात भाजपचे विद्यमान आमदार हेच पुन्हा एकदा महायुतीचे उमेदवार राहणार आहेत त्यामुळे महायुतीचे राणा जगजितसिंह पाटील यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण राहणार याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. या मतदार संघात यावेळी दुरंगी नाही तर तिरंगी, चौरंगी निवडणुक होण्याची शक्यता आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडुन राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) अशोक जगदाळे, माजी जि.प.सदस्या सक्षणा सलगर, शिवसेना (ठाकरे गट) मकरंदराजे निंबाळकर यांच्यासह अनेकजण निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. या मतदार संघात भाजकडुन रोहन देशमुख, ॲड.गुंड यांच्यासह कांहीजण इच्छुक असले तरी या मतदार संघात भाजपची उमेदवारी राणा जगजितसिंह पाटील यांनाच मिळणार यात शंका नाही. त्यामुळे महायुतीचे राणा जगजितसिंह पाटील यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण राहणार? हे पाहणे गरजेचे आहे.

त्याचबरोबर या मतदार संघातुन निवडणुक लढविण्यासाठी ओबीसी नेत्या डॉ.स्नेहा सोनकाटे यांनी सध्या जोरदार तयारी सुरु केली आहे. डॉ.स्नेहा सोनकाटे यांनी संपुर्ण राज्यात ओबीसी समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न केला आहे. त्या तुळजापुर विधानसभा मतदार संघातीलच रहिवासी असुन त्यांना ओबीसी समजामध्ये आज मानाचे स्थान आहे. ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठी त्या अहोरात्र झटत आहेत. तुळजापुर विधानसभा मतदार संघात ओबीसीचे मतदान जवळपास दोन लाखाच्या आसपास आहे त्यामुळे डॉ.स्नेहा सोनकाटे यांची उमेदवारी भल्याभल्याना घाम फोडणारी ठरू शकते. डॉ.स्नेहा सोनकाटे यांनी तुळजापुर विधानसभा मतदार संघात आपला दौरा सुरु केला आहे.

त्याचबरोबर देवराज मित्र मंडळाचे सर्वेसर्वा देवानंद रोचकरी हेही यावेळी विधानसभा निवडणुक पुर्ण ताकदिनीशी लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे या मतदार संघात यावेळी बहुरंगी लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

येणाऱ्या कांही दिवसात या मतदार संघात मोठया राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीचे तिकीट मिळविण्यासाठी कांहीजण या पक्षातुन त्या पक्षात जाण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी लढा देणारे मराठा योद्धा म्हणुन पुढे आलेले मनोज जरांगे पाटील यांनीही विधानसभेच्या सर्व जागा लढविण्याचा निर्णय घेतला असल्याने त्यांचा उमेदवार या मतदार संघात कोण असणार हेही पाहणे गरजेचे आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या तुळजापुर विधानसभा मतदार संघात राणा जगजितसिंह पाटील यांनी दणदणीत विजय मिळवुन काँग्रेसचा हा बालेकिल्ला उद्ध्वस्त करून टाकला. आणि या मतदार संघावर भाजपचा झेंडा फडकविला. सलग चार टर्म या मतदार संघातुन निवडुन आलेले राज्याचे माजी मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांचा पराभव करीत राणा जगजितसिंह पाटील यांनी या मतदार संघात इतिहास घडविला. आजही या मतदार संघावर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मोठी पकड आहे. कारण गेल्या पाच वर्षांत त्यांनी या मतदार संघात विकासाची कामे केली आहेत.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघात भाजपचे राणा जगजितसिंह पाटील यांना ९९ हजार ३४,काँग्रेसचे मधुकरराव चव्हाण यांना ७५ हजार ८६५ तर वंचित बहुजन आघाडीचे अशोक जगदाळे यांना ३५ हजार ३८३ इतके मतदान मिळाले होते.वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक जगदाळे यांनी घेतलेल्या मतदानामुळे काँग्रेसचे मधुकरराव चव्हाण यांचा पराभव झाल्याचे दिसुन येत आहे.

## कडुसं मधून समाजातील दांभिकतेवर लिखानाद्वारे आसुड : प्रा.ए.डी.जाधव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

शाहू पाटोळे यांनी लिहिलेल्या कडुसं पुस्तकात भुतकाळातील ज्ञान व वर्तमान काळातील भान या पुस्तकात आहे. जे भोगलय व जे पचवलयं ते या पुस्तकात आहे. त्यामुळेच पाटोळे यांनी समाजातील दांभिकता मोडून काढण्यासाठी लिखाणाद्वारे आसुड ओडले आहेत, असे प्रतिपादन इतिहास तज्ञ प्रा.ए.डी.जाधव यांनी केले आहे.

रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथील प्राचिन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातनशास्त्रचे माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.माया पाटील, जनसंज्ञापन विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.रविंद्र चिंचोलकर उपस्थित होते. मसप व मिरा प्रकाशन छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात पुढे बोलताना पाटोळे यांनी या पुस्तकात समाजातील मुळ गाभा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रा.जाधव यांनी सांगितले. तर माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांनी कडुसं हे पुस्तक बोली भाषेत असून, जगण्यासाठी जो संघर्ष करतो त्या स्वभाव व गुणधर्मातून पुस्तकातील भाषा आहे. आण्णाभाऊ साठे यांची भाषा व शाहू पाटोळे यांची पुस्तकातील भाषा सारखीच आहे. तर प्रा.डॉ.माया पाटील यांनी लेखक शाहू पाटोळे यांनी मनन, चिंतन करत आत्मभान राखत स्पष्टवक्ते पणे लिखान केले आहे. तर प्रा.डॉ.रविंद्र चिंचोलकर यांनी जिथे आम्ही लिहिण्याचे थांबतो, तेथून शाहू पाटोळे यांचे लिखान चालू होते. समाजातील व्यंग शाहू यांनी आपल्या पुस्तकात दाखवून दिले आहे. बाबा आमटे यांची भारत जोडो यात्रा असो किंवा समाजातील दांभिकता असो हे सर्व कडुसंमध्ये पाटोळे यांनी मोठ्या धाडसाने मांडले आहे. त्यामुळेच कडुसं मधून विसंगतीवर बोट ठेवणारे लिखान झाले आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अरविंद हंगरगेकर यांनी केले. तर सुत्रसंचालन व आभार दौलत निपाणीकर यांनी मानले. या कार्यक्रमास संरक्षण मंत्रालयाचे जनसंपर्क अधिकारी महेश अय्यगर, मिरा प्रकाशनचे जीवन कुलकर्णी, डॉ.पंकज गांधी, ठाकूर आदीसह पाटोळे यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होतो.

## उमरगा जिल्हा परिषद हायस्कूल येथे गुणवंतांचा कौतुक सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये दहावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उमरगा शहरातील अनेक दानशूर व्यक्तीने विद्यार्थ्यांना एकवीस हजार रुपयाची रोख बक्षीसे दिली.

या कार्यक्रमासाठी अध्यक्षा म्हणून शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे शाळेचे माजी विद्यार्थी मंगेश देशमुख, अविनाश काळे, अंबादास जाधव, समिर सुतके, शंकर बिराजदार, प्रदिप भोसले, मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रशालेतील इयत्ता आठवी वर्गातील पृथ्वीराज वरवटे या विद्यार्थ्यांचे मेंदू मृत झाल्याने निधन झाले. पृथ्वीराजला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शाळेतून प्रथम आलेल्या आल्फिया आलुरे या विद्यार्थिनीला ११००० रुपयाचे पारितोषिक देऊन तिचा गौरव करण्यात आला. द्वितीय आलेल्या प्रतिक्षा मोरे ला १००१ रुपये तृतीय आलेल्या नादीया शानेदिवान १५५१ रुपयाचे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे सूत्रसंचालन सरिता उपासे तर आभार शिल्पा चंदनशिवे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबासाहेब जाधव, धनराज तेलंग, बलभीम चव्हाण, चंद्रशेखर पाटील, सदानंद कुंभार, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, यांनी परिश्रम घेतले.

### परमेश्वर जाधव यांना पीएचडी प्रदान

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

पर्यावरण शास्त्र विषयात परमेश्वर अरुण जाधव यांना डेव्हलपमेंट ऑफ इंटिग्रेटेड अँड इको-फ्रेंडली सिस्टिम फॉर रिडक्शन ऑफ पॉप्युलेशन लोड फ्रॉम सीवर सिस्टीम या विषयात डॉ.एम.बी.मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी प्रदान करण्यात आली. पर्यावरण शास्त्राचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.एन.एन.बंदेला, तसेच प्रा.डॉ.सतीश पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात एक हजार झाडांचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**नळदूर्ग, दि.४ ऑगस्ट -**

मागील पिढीचा इतिहास नजरेसमोर राहिला तरच भविष्यातील पिढी ही संस्कारक्षम बनेल व देशाच्या जडणघडणीत त्यांचा हातभार लागेल असे मत महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री तथा बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण यांनी व्यक्त केले. नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन एक हजार झाडांचे वृक्षारोपण व अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष राम आलुरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापुरकर, सहसचिव प्रकाशराव चौगुले, सहसचिव शहबाज काजी, सहसचिव लिंबराज कोरेकर, सहसचिव ॲड. प्रदीपराव मंटगे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.अभय शाहपुरकर, संस्थेचे कार्याध्यक्ष राम आलुरे, संस्थेचे सहसचिव तथा माजी नगराध्यक्ष शहबाज काजी, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, सुभद्राताई मुळे, कल्पना गायकवाड पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास यशवंतराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद गायकवाड, माजी उपप्राचार्य डॉ. रामदास ढोकळे, माजी नगरसेवक बसवराज धरणे, सुधीर हजारे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय दासकर, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संतोष पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील यांनी मानले.

## डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाच्या जंबो दौऱ्याला सुरुवात

### भूम-परंडा-वाशीच बोला एकत्रच चला या टॅग लाईन खाली २४८ गावांना देणार भेटी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विधानसभेचे रणसिंग फुंकले असून भूम परंडा वाशी विधानसभा मतदारसंघातून ते चाचपणी करण्यासाठी 'भूम परंडा वाशीच बोला एकत्र चला' या टॅगलाईन खाली दौऱ्याला सुरुवात केली आहे.

या दौऱ्याची सुरुवात ईट येथून सुरू केली असून निपाणी, लांजेश्वर, आंद्रुड, माळेवाडी, पखरूड, ज्योतिबाचीवाडी, ईराचीवाडी, उमाचीवाडी, मात्रेवाडी, नागेवाडी, वडाचीवाडी पांढरेवाडी, झेंडेवाडी, डोकेवाडी, गिरवली, सोन्नेवाडी,चांदवड, घाटनांदूर, गिरलगाव या गावातील ज्येष्ठ नागरिकांसाठी फिजिओथेरपीचे तपासणी शिबिर घेऊन नागरिकांच्या समस्या देखील त्यांनी जाणून घेतल्या. या तपासणी शिबिरास जवळपास २५०० पेक्षा जास्त लोकांनी लाभ घेतला. या तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी माजी उपसभापती काकासाहेब चव्हाण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा.डॉ.आप्पासाहेब हुंबे, उपसरपंच प्रमोद देशपांडे, मा.सरपंच पती दत्ता अहिरे, गटनेते सयाजीराजे हुंबे, महेश चव्हाण, विनोद वाडकर, ग्रामपंचायत सदस्य गणेश चव्हाण, अण्णासाहेब चव्हाण, अण्णासाहेब चोरमले, श्रीमंत डोके, दत्ता आसलकर, हायेत भाई पठाण, विकास चव्हाण, सोनू चव्हाण, शामराव देशमुख, जयराम डोके, सुनील देवकते, गवळी, धनंजय चव्हाण यांची यावेळी उपस्थिती होती.

राष्ट्रवादीचे डॉ.प्रतापसिंह पाटील हे ४१ दिवस भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाचा दौरा करणार असून २४८ गावांमध्ये ते भेटी देणार आहेत. यामध्ये नागरिकांच्या वेगवेगळ्या समस्या समजावून घेऊन त्या निवारण करण्यासाठी काय करता येईल यासाठी देखील एक सोबत तज्ज्ञ टीम त्यांनी ठेवली आहे. 'मी येतोय आपल्या समस्या ऐकायला आणि त्याचे निवारण करायला' यासारख्या अनेक टॅगलाईन त्यांनी या दौऱ्यात केल्या असून 'जनसमस्या संवाद भेट' असे या दौऱ्याचे नामकरण केले आहे.

## पारडी शाळेत आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**वाशी, दि.४ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यातील जि.प.प्रा. शाळा पारडी येथे शनिवार (दि.३) रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाअंतर्गत विद्यार्थ्यांना एखादी आपत्ती आल्यानंतर घाबरून न जाता आलेल्या आपत्तीचे दुष्परीणाम कमी व्हावेत अगर होऊच नयेत म्हणून आलेली परिस्थिती कशी हातळावी, अचानक आलेल्या आपत्तीचे व्यवस्थापन कसे करावे, याचे पोष्टर्सच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

आज विद्यार्थ्यांनी दप्तराविना शाळा या अंर्गत योगायोगाने मिळालेला मजकूर वाचन व लेखन केला. मुलांनी सर्प दंश, वीज पडून होणारी दुर्घटना हे टाळण्यासाठी कोणते उपाय सांगितले आहेत. याचा प्रामुख्याने खूप संवेदनशिलतेने, भावनिक होऊन विचार करून त्याचे समजपूर्वक वाचन व लेखनही केले. त्याचवेळी आपण आपल्या आई बाबांना सांगू मग त्यांना समजेल, अशीही काळजीपोटी चर्चा केलेलीही ऐकण्यास मिळाली. आज मुलांनी खूप जाणीवपूर्वक, काळजीपूर्वक, हळव्या मनाने आपत्तीव्यवस्थापन स्वत: समजून घेतलेले दिसून आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आत्माराम नागटिळक यांच्यासह उषा डिसले, उर्मिला भोसले-कावळे, बाबुराव माने, बापुराव कात्रे, ज्ञानराज घुले, वैभव सोणवणे यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

रोखठोक

डॉ. मयंक चतुर्वेदी

# देशाला पोखरत आहेत रोहिंग्या आणि बांगलादेशी

जगात असा कोणताही देश नाही जो आपल्या देशात अवैध घुसखोरी स्वीकारतो. अवैध घुसखोरी रोखण्यासाठी जगातील प्रत्येक देशाने प्रभावी व कठोर कायदे केले असून, घुसखोरांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे त्यांच्या देशात परत पाठवले जाते. मात्र, स्वातंत्र्य प्राप्त होऊन ७७ वर्षे उलटल्यानंतरही भारतात घुसखोरी सुरूच आहे. अलिकडेच एका बांगलादेशी युट्युबरने आपल्या विशेष अहवालाद्वारे बांगलादेशातून भारतात घुसखोरी कशी होते, हे प्रत्यक्ष पुरावे देऊन स्पष्ट केले.

**म्यानमार सीमेवरून मोठ्या प्रमाणात घुसखोरी**

बांगलादेशातून ज्याप्रमाणे दररोज हजारो घुसखोर भारतात येत आहेत, त्याचप्रमाणे म्यानमारमधूनही अनेक लोक घुसखोरी करीत आहेत. म्यानमारमध्ये २०२१ मध्ये झालेल्या लष्करी बंडानंतर भारतात अवैध घुसखोरी करणाऱ्यांच्या संख्येत अचानक वाढ झाली होती, जी अजूनही सुरूच आहे. या चार वर्षांत या सीमेवरून भारतात अवैध रीत्या घुसखोरी केलेल्या लोकांच्या संख्येचा अंदाज घेतला, तर ही संख्या पन्नास हजारांहून अधिक झाली आहे. यापैकी त्यांच्या कुटुंबासह या घुसखोरांची संख्या तर अवघ्या चार वर्षांतच अंदाजे दीड लाखांच्या पुढे गेली आहे. म्हणजे सीमेपलीकडून भारतात घुसलेल्या या घुसखोरांची अख्खी वस्तीच अथवा एक छोटेसे गावच भारतात वसविले जाऊ शकते. वस्तुस्थिती ही आहे की रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोर देशाच्या कानाकोपऱ्यात पसरले आहेत. एका ठिकाणाहून येणाऱ्या लोकांचा हा आकडा केवळ चार वर्षांचा आहे, तर भारतात घुसखोरीची ही समस्या गेल्या ७०-७५ वर्षांपासून सातत्याने सुरूच आहे.

**भारत-बांगलादेशदरम्यान अनेक किलोमीटरची खुली सीमा**

बांगलादेशला लागून असलेल्या भारतीय सीमेचीही तीच अवस्था आहे. लोकांचे लोंढेच्या लोंढे भारताकडे सरकत आहेत. भारत आणि बांगलादेश यांच्यात ४,०९५ किलोमीटर लांबीची सीमा आहे, त्यापैकी सुमारे १,११६ किमी क्षेत्र नदीने वेढलेले आहे. पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय, मिझोराम आणि त्रिपुरा या पाच भारतीय राज्यांनी ही सीमा वेढलेली आहे. भारत-बांगलादेश सीमेवरील मोठ्या भागाला कुंपण नाही कारण राज्य सरकारने अद्याप जमीन दिली नाही. एकट्या दक्षिण बंगालमध्ये भारत-बांगलादेशमधील ९१३ किमीच्या सीमेवर बहुतांश भागात कुंपण नाही. यापैकी बऱ्याच भागात नदीची सीमा आहे, जी अंदाजे ३७२ किलोमीटर आहे आणि केवळ ४०४ किलोमीटर सीमेवर कुंपण घालण्यात आले आहे.

स्वाभाविकच अशा परिस्थितीत बांगलादेशी घुसखोर याचा फायदा घेत सहज भारतात घुसतात. त्यानंतर, भारतात प्रवेश करण्यापूर्वी बांगलादेशी लोकांकडे भारतीय नागरिकत्वाचा पुरावा असलेले आधार कार्ड, मतदार ओळखपत्र आणि पॅन कार्ड आधीपासूनच असते. एवढेच नव्हे तर या अवैध घुसखोरांची बँकांमध्येही खाती आहेत. ते मुख्यत: देशाच्या अशा विविध भागांत स्थलांतरित होतात, जिथे रोजगाराच्या संधी अधिक आहेत. ते देशातील मोठ्या शहरांमध्ये राहतात आणि स्वत:ला पश्चिम बंगालचे रहिवासी म्हणवतात. अशा परिस्थितीत त्यांची ओळख पटवणे खूपच कठीण होऊन बसते. वास्तविक भारतीय नागरिकत्वासाठी कायदेशीर, औपचारिक नियम आहेत. त्यांचे पालन करून वैध, कायदेशीर पद्धतीने देखील नागरिकत्व घेता येते. बांगलादेशी घुसखोर कोणतेही नियम कायदे पाळत नाहीत. त्यात तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी उचललेले एक चुकीचे पाऊल आज भारतासाठी मोठे संकट बनले आहे. या विषयाच्या खोलात शिरण्यापूर्वी आपल्याला संविधानाच्या कलम ११ विषयी जाणून घ्यावे लागेल.

**राजीव गांधींचा 'तो' निर्णय ठरला देशघातक**

राज्यघटनेच्या कलम ११ मध्ये असे म्हटले आहे की, नागरिकत्व देण्यासाठी आणि विशिष्ट परिस्थितीत ते काढून घेण्यासाठी कायदा करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. १९५५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने यासंदर्भात एक कायदा केलाही होता. मात्र, पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या सरकारच्या कारकीर्दीत जो एक निर्णय घेतला त्यामुळे देशाची सर्वाधिक हानी झाली. या एका निर्णयाने भारतात लाखो अवैध स्थलांतरित कायदेशीर झाले. आता या कायद्याच्या आडून भारतात अवैध घुसखोरी सुरूच आहे.

भारताच्या नागरिकत्व कायद्याला राजीव गांधींनी जे छिद्र पाडले, त्यामुळे आज देशासाठी हा कायदा एक संकट बनला आहे. कुठलाही देशभक्त नागरिक, मग तो कोणत्याही पक्षाचा असो, ही गोष्ट मनापासून मान्य करेल. जर देशातील जनतेने १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत राजीव गांधी यांच्या पक्षाला प्रचंड बहुमताने विजयी केले नसते तर १९८५ मध्ये संसदेत असा कायदा मंजूर करवून घेणे त्यांना कधीच शक्य झाले नसते. या कायद्यामुळे अवैध घुसखोरी ही आज देशात एक गंभीर समस्या बनली आहे.

भारतातील अवैध बांगलादेशी घुसखोरांना दुहेरी नागरिकत्व देण्याचे काम राजीव गांधी सरकारने केले आहे. आपण हे लक्षात घ्या की, किती चतुराईने राजीव गांधी यांनी १९८५ मध्ये देशाच्या नागरिकत्व कायद्यात बदल केला. त्यासाठी त्यांनी या कायद्यात नवीन कलम ६ अ जोडले, ज्यात म्हटले आहे की १९७१ पर्यंत जे लोक बांगलादेशातून आसाममध्ये आलेले आहेत, ते सर्व आसामचे रहिवासी आणि भारताचे नागरिक होतील. त्यावेळी ही विशेष सुविधा केवळ आसामसाठी लागू करण्यात आली होती, आता हे लक्षात घ्या की, उर्वरित राज्यांसाठी हा नियम १९४७ पर्यंत होता. म्हणजे जे लोक त्यावेळी आले त्यांना भारताचे नागरिकत्व प्राप्त होईल. या नवीन ६ अ कलमाचा परिणाम असा झाला की, राजीव गांधी सरकारच्या काळात जे ६० लाख बांगलादेशी घुसखोर भारतातील आसाम राज्यात घुसले ते तर भारताचे नागरिक बनलेच, सोबतच त्यांनी भारताची लोकसंख्या वाढवण्याचे कामही केले. आज अशी परिस्थिती आहे की, आता ते सर्व बांगलादेशी घुसखोर भारताचे नागरिक बनले आहेत. अर्थात् काँग्रेस सरकारने लागू केलेल्या कलम ६ अ विरुद्धचा खटला सर्वोच्च न्यायालयात अद्याप सुरू आहे. यावर निर्णय येणे अद्याप बाकी आहे. परंतु या कलम ६ अ चे सध्याचे संकट हे आहे की, आजही जे बांगलादेशी घुसखोर मोठ्या संख्येने भारतात घुसखोरी करतात, त्यातील अनेक प्रथम स्वत:ची आसाममध्ये नोंदणी करून घेतात आणि ज्यांना नोंदणी करणे शक्य होत नाही ते अजूनही हेच सांगण्याचा प्रयत्न करतात की, ते आणि त्यांचे पूर्वज १९७१ च्या आधीच भारतात येऊन स्थायिक झाले होते.

**आसाम आणि पश्चिम बंगालची 'डेमोग्राफी' बदलली**

आसाममधील परिस्थिती दिवसेंदिवस कशी बिघडत चालली आहे, हे खुद्द मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या तोंडून आपण बऱ्याचदा ऐकले आहे. प्रचंड संख्येत भारतात घुसलेल्या बांगलादेशी मुस्लिमांमुळे आसामची 'डेमोग्राफी' (लोकसंख्याशास्त्र, लोकसंख्याशास्त्रीय डेटा) पार बदलली आहे आणि अनेक जिल्ह्यांत हिंदू अल्पसंख्यक झाले आहेत. १९५१ मध्ये जे १२ टक्के मुस्लिम होते ते आता ४० टक्क्यांवर पोहोचले आहेत. ही लोकसंख्या आसाममध्ये अवैध घुसखोरीमुळे दिसून येत आहे.

पश्चिम बंगाल प्रदेश भाजपाध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री



सुकांत मुजुमदार यांनीही मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या विधानाचे समर्थन केले आहे. आसाममध्ये बायोलॉजिकल (जैविक) पद्धतीने कोणताही लोकसंख्या बदल झालेला नाही. हा बदल निव्वळ घुसखोरीचा परिणाम आहे. बंगाललाही या समस्येने ग्रासले आहे, असे सुकांत मुजुमदार यांनी सांगितले. बंगालमध्येही अशाच प्रकारे अवैध घुसखोरी करून डेमोग्राफी बदलण्यात आली, असे ते म्हणाले. मुजुमदार यांच्या मते, हे केवळ आसाम आणि बंगालमध्येच घडलेले नाही, तर संपूर्ण पूर्व भारतात, विशेषत: सीमावर्ती राज्यांमध्ये, स्वातंत्र्याच्या गेल्या ७० ते ७५ वर्षांत मोठा लोकसंख्याशास्त्रीय बदल दिसून आला आहे. ही लोकसंख्या जैविक पद्धतीने वाढलेली नाही, तर ही डेमोग्राफी नियोजनबद्ध पद्धतीने बदलली आहे. त्याचे नियोजन देशाबाहेरून केले जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. पश्चिम बंगालमध्ये स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही तीन जिल्हे मुस्लिमबहुल होते. मात्र, आज बंगालमधील ९ जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत. हे कुठून होत आहे? कसे होत आहे? एवढी लोकसंख्या कशी वाढत आहे? नैसर्गिक रीत्या एवढ्या प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढू शकत नाही, असे सुकांत मुजुमदार यांनी सांगितले.

**भारतीयांचे अधिकार हिरावून घेत आहेत घुसखोर**

सुमारे पाच कोटी बांगलादेशींनी देशात घुसखोरी केली आहे, असे सीबीआयचे माजी संचालक जोगिंदर सिंग यांनी २०१४ मध्येच पुराव्यांसह म्हटले होते. जर आकडेवारीच्या आधारे अंदाज बांधायचा झाल्यास, बांगलादेशातून दररोज जवळपास पाच हजार लोक भारतात घुसखोरी करतात. म्हणजे महिन्याला सुमारे दीड लाख लोक. आता गेल्या ७०-७५ वर्षांत किती घुसखोरी झाली असेल याचा सहज अंदाज लावता येतो. त्यामुळे स्थानिक आसामी लोकांसाठी घुसखोरी हा मोठाच मुद्दा बनला आहे. बांगलादेश वंशाचे मुस्लिम आणि आता रोहिंग्याही भारतात येत आहेत आणि हे सर्व घुसखोर स्थानिक लोकांचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अधिकार हिरावून घेत आहेत, असेही जोगिंदर सिंग म्हणतात. हे घुसखोर आमच्या नोकऱ्या/रोजगार काबीज करीत आहेत, हे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे, असे जोगिंदर सिंग यांनी सांगितले. आसाम सरकार आपल्या पातळीवर त्यांना रोखण्याचा प्रयत्न करते. पण जे बांगलादेशातून येऊन आसाममध्ये स्थायिक झाले आहेत, ते घुसखोरांना गुपचूप आपल्याजवळ ठेवून घेतात आणि त्यांना पूर्ण संरक्षण देतात. यामध्ये मदरशांची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची आहे. संपूर्ण यंत्रणा देशभरातील मदरसे आणि मशिदींसाठी काम करते, जी घुसखोरांची कागदपत्रेच तयार करीत नाही तर त्यांना देशाच्या विविध भागांत पाठवण्याची व्यवस्थाही करते, त्यामुळे त्यांना ओळखणे आणि पकडणे एवढे सोपे नसते.

**घुसखोरीमुळे नऊ जिल्हे मुस्लिमबहुल**

जर आपण आकडेवारीवर नजर टाकली तर आसामच्या एकूण ३३ जिल्ह्यांपैकी नऊ जिल्ह्यांमध्ये मुस्लिम लोकसंख्या आता ५० ते ८० टक्क्यांपर्यंत वाढली आहे. बारपेटा, करीमगंज, दारंग, मोरीगाव, नौगाव, बोंगईगाव, धुबरी, लाकांडी आणि गोलपाराबतौर हे ते नऊ जिल्हे आहेत. या नऊ जिल्ह्यांव्यतिरिक्त कामरूप, कछार आणि नलबाडी येथेही मुस्लिमांची संख्या सुमारे ४० टक्के असल्याचा अंदाज आहे. एकूणच देशातील या एकट्या आसाम प्रांतात बांगलादेशी मुस्लिम घुसखोरांमुळे ४५ विधानसभा मतदारसंघांचा निर्णय मुसलमान मतदारांच्या हातात गेला. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत ३१ मुस्लिम आमदार निवडून आले होते, ज्यात १६ काँग्रेसचे आणि १५ ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटचे (याला एआययूडीएफ आणि सर्व भारतीय संयुक्त गणतांत्रिक मोर्चा या नावानेही ओळखले जाते) आहेत. या पक्षाचे संपूर्ण राजकारणच बांगलादेशी घुसखोर आणि इतर मुस्लिमांच्या मदतीवर अवलंबून आहे. कट्टर, जिहादी मुस्लिमांची पाठराखण करणे आणि हिंदू व हिंदुत्ववादी संघटनांविरुद्ध आगपाखड करणे हाच या पक्षाचा एककलमी कार्यक्रम आहे.

या पक्षाचा झेंडाही हिरवा आहे आणि या पक्षाचा संस्थापक एक मौलाना आहे व त्याचे नाव बदरुद्दीन अजमल आहे. भाजपा या मुस्लिमबहुल क्षेत्रात विजयी होत नाही कारण हा पक्ष घुसखोरांविरुद्ध नेहमीच प्रखर भूमिका घेत असतो. पण उद्या दुर्दैवाने हा पक्ष जर सत्तेवर आला किंवा सत्तेत भागीदार जरी बनला तरी हिंदूंचे काय हाल होतील, याची कल्पना करणेही शक्य नाही.

**पश्चिम बंगालमध्ये घेताहेत कल्याणकारी योजनांचा लाभ**

तीच स्थिती पश्चिम बंगालची आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या विजयात बांगलादेशी घुसखोरांचा मोठा वाटा आहे. अगदी स्पष्टच सांगायचे झाल्यास बांगलादेशी मुस्लिमांचीच ममतांच्या विजयात प्रमुख भूमिका आहे आणि त्याचे अनेक पुरावे माध्यमांमध्ये उपलब्ध आहेत. या घुसखोरांच्या बांगला भाषेमुळे त्यांना कोणी पकडू शकत नाही. ते दिसायलाही पश्चिम बंगालच्या रहिवाशांसारखेच आहेत. त्यामुळे ते ओळखूही येत नाहीत. हे बांगलादेशी मुस्लिम घुसखोर भारतात प्रचंड संख्येने येत आहेत आणि भारतीय करदात्यांच्या पैशातून पुरविल्या जाणाऱ्या सर्व सामाजिक कल्याणकारी योजनांचा आणि सुविधांचा लाभ घेत आहेत. याशिवाय ते मोठ्या प्रमाणात 'स्लीपर सेल' म्हणून काम करीत आहेत. पश्चिम बंगालमधील अनेक दहशतवादी संघटनांचे थेट बांगलादेशशी 'कनेक्शन' असल्याचे राष्ट्रीय तपास संस्थेला (एनआयए) आढळून आले आहे. प्रत्येक देशविरोधी कामात हे घुसखोर सहभागी असल्याचे आढळून येत आहे.

**झारखंडमधील डेमोग्राफीही बदलली**

या संदर्भात हेही नमूद करणे योग्य ठरेल की, भारताचे दक्षिणेकडील राज्य तामिळनाडूमध्ये पोलिसांनी अवैध बांगलादेशी स्थलांतरितांवर कारवाई करण्यास सुरुवात केली तेव्हा अनेक धक्कादायक माहिती समोर आली. हे घुसखोर देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले असल्याचे समोर आले. ते भारताचे नागरिक असल्याचे सिद्ध करणारी सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे होती. या बांगलादेशींना अनेक राज्यांतून अटकही करण्यात आली आहे. आसाम आणि पश्चिम बंगालप्रमाणेच झारखंडमध्ये बांगलादेशी घुसखोरीमुळे संथाल परगणा येथील लोकसंख्येची रचना अर्थात डेमोग्राफी बदलली आहे. येथील परिस्थिती इतकी भयानक बनली की, खुद्द न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. झारखंड सरकारने संथाल विभागाच्या सर्व उपायुक्तांना परस्पर समन्वयाने बांगलादेशातून येणाऱ्या घुसखोरांची ओळख पटवून त्यांना परत त्यांच्या देशात पाठवण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यास न्यायालयाने सांगितले आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून, एकटे राज्य सरकार ही परिस्थिती हाताळू शकत नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने राज्य सरकारसोबत मिळून काम करणे आवश्यक आहे.

**झारखंड होत आहे 'जिहाद खंड'**

झारखंड प्रदेश भाजपाध्यक्ष बाबुलाल मरांडी यांनी राज्यातील संथाल परगणा भागात बांगलादेशी घुसखोरीच्या मुद्यावरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. बांगलादेशी घुसखोरी हा केवळ प्रादेशिक मुद्दा नसून, राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बांगलादेशी घुसखोरांना या राज्यातील आदिवासी बांधवांची जमीन आणि संसाधने बळकावून झारखंडचे विभाजन करायचे आहे. या विषयावर राज्य सरकार गप्प तर आहेच, पण अवैध घुसखोरांना वसविण्यासाठी मदत करत आहे. या प्रकरणी झामुमो आणि काँग्रेस सरकार सातत्याने उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करीत आहे. बांगलादेशी घुसखोर झारखंडमधील आदिवासींचे हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. झामुमो-काँग्रेस सरकारच्या आश्रयाखाली मतदारयादीत आणि शिधापत्रिकांमध्ये मुस्लिम घुसखोरांची नावेही जोडली जात आहेत. या घुसखोरीमुळे 'माटी आणि बेटी' दोन्ही धोक्यात आल्या आहेत. आदिवासींच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकारने बांगलादेशातून होणारी घुसखोरी रोखण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे.

एकूणच हे घुसखोर आज देशभरातील अनेक राज्यांत पोहोचले आहेत. भारतातील संसाधनांचा पुरेपूर वापर करत आहेत. ते भरपूर पैसा कमावतात आणि परदेशात पाठवतात. दुसरीकडे, भारतातील सर्वसामान्य नागरिकांचा हक्काचा रोजगारही ते हिरावून घेत आहेत. अशा परिस्थितीत या विदेशींना पाठिंबा देऊन आणि त्यांना भारतात स्थायिक करून आपले कोणते कल्याण होत आहे, याचा विचार आता स्थानिक सामान्य नागरिकांनी, विशेषत: मुस्लिमांनी करायचा आहे. भारतातील मुस्लिम रोहिंग्या आणि बांगलादेशी जिहादी घुसखोरांना सर्वप्रकारची मदत करून देशाला प्रत्येक आघाडीवर कमकुवत करीत आहेत, हे त्यांनी लक्षात घेण्याची गरज आहे.

(पांचजन्यवरून साभार)

रविवारची पत्रे

## आई आणि बाळाला जोडणारा दुवा

स्त्रीच्या आयुष्यातील सुंदर क्षण म्हणजे आई होणं. स्त्रीला मातृत्व लाभले की, तिला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. ती आव्हाने पेलण्याची ताकद तिच्यात असते. मातृत्वाचा सुंदर अनुभव घेणाऱ्या आईसाठी बाळाला स्तनपान देणे पण तेवढेच महत्त्वाचं आहे. आपल्या भारतीय संस्कृतीनुसार आईच्या दुधाचे महत्त्व वेगवेगळ्या माध्यमातून स्त्रीला सांगितलं जातं. नुकत्याच जन्मलेल्या बालकाकरिता तर आईचे दूध हे पौष्टिक पेय अमृताहूनही जास्त गरजेचे असते. प्रसूती झाल्यानंतर आईला दूध येणं हे निसर्गाने दिलेलं मोठं वरदान आहे. बाळाचा संपूर्ण पौष्टिक आहाराचा एक भाग म्हणून जगभरात स्तनपानाला महत्त्व देण्यात आले. आई आपल्या बाळाला दूध पाजण्यासाठी सदैव तयार असते. आईला स्तनपान करण्यासाठी विशिष्ट तारखांची आणि उत्सवाची गरज नसते. आईच्या मनाला, शरीराला आणि आत्म्याला नवचैतन्य देणारी स्तनपान ही एक नैसर्गिक क्रिया आहे. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' असे म्हटले जाते. आईच्या दुधाच्या प्रत्येक थेंबातून बालकाच्या शरीराचीच वाढ होत नाही तर मानसिकरीतीने योग्य वाढ होण्यासाठीसुद्धा आईचे दूध हे बाळाला आईने दिलेली अनमोल भेट आहे. स्तनपान म्हणजे आई आणि बाळाला जोडणारा दुवा आहे. बाळ जन्माला आल्यानंतर लगेच बाळाला स्तनपान द्यावे. किमान पहिल्या एका तासात नक्कीच द्यावे. पहिल्या स्तनपानाला 'कोलोस्ट्रम' असं म्हणतात. बाळाच्या जन्मानंतरचं पहिलं 'लसीकरण' हे स्तनपानच आहे. प्रसूती ही नैसर्गिक असो की, सिझेरियन; बाळाला मात्र काही मिनिटात स्तनपान मिळणं हा प्रत्येक बालकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. प्रसूतीनंतर सुरुवातीच्या काळात आईच्या स्तनामधूनच चिक येतो. हा चिक बाळासाठी अमूल्य असतो. चिकामध्ये अ आणि क जीवनसत्त्व जास्त प्रमाणात असतात. शिवाय त्यामध्ये प्रतिबंधक द्रव्य व इतर आवश्यक घटक असल्यामुळे जंतू संसर्गापासून बाळाचे संरक्षण होते. स्तनपानाचे फायदे आई आणि बाळ दोघांनाही मिळतात. बाळ जन्मल्यानंतर पहिल्या एक तासापासून ते सहा महिन्याचे होईपर्यंत बालक स्तनपानावरच वाढले पाहिजे. त्यानंतर अन्न प्राशन करून दोन वर्षांपर्यंत आईच्या दुधासोबतच पूरक असे बाह्य अन्न त्याला मिळायला हवे. तेव्हाच त्या बाळाची सुदृढ वाढ होऊ शकते. स्तनपान आणि आरोग्यदायी काळजी या दोन्ही बाबी बाळासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक स्तनपान सप्ताह सुरू केला आहे. मातृत्व, आरोग्याच्या दृष्टीने, सामाजिक दृष्टिकोनातून स्तनपानाचे महत्त्व मोठे आहे. बाळाला स्तनपान करणाऱ्या मातेचा आहार चौरस असावा. जसे पालेभाज्या, मोड आलेली कडधान्य, दूध व दुधाचे पदार्थ याचं योग्य प्रमाण असावं. मात्र जंक फूड, बाहेरील खाद्यपदार्थ खाऊ नये. गरज पडल्यास योग्य आहारतज्ज्ञ, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार स्तनपानाच्या काळात मातेने आहार घ्यायला हवा. स्तनपानाचे फायदे जितके बाळासाठी आहे तितकेच आईकरिता आहे. जसे स्तनपान केल्याने स्तन, गर्भाशय, अंडाशय या अवयवांचे कॅन्सर होण्याची शक्यता कमी होते. आज जन्मलेले बालक आपल्या देशाच्या भविष्यासाठी खूप महत्त्वाचे व मौल्यवान कामगिरी बजावू शकतो. बालकाला मातेचे पौष्टिक पेय म्हणून स्तनपान मिळणं, हा त्याचा हक्क आहे. कारण त्याचा लाभ बालकाबरोबर मातेला, कुटुंबाला, समाजाला पर्यायाने आणि राष्ट्राला होतो. सुदृढ बालक सुदृढ राष्ट्र...

**डॉ. नीलिमा बर्गट**/९८५०३४१६७७

●● ●●

## माझी पंढरीची वारी...

श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची (माउली) पालखी ३० जून रोजी आळंदीवरून निघाली. मी माउलीच्या पालखीच्या रथामागे असलेल्या दिंडी क्रमांक १७ श्रीसंत बेंडोजी महाराजाच्या दिंडीत सहभागी होतो. दत्तवाडी नागपूरचे वारकरी ह. भ. प. तारेश महाराज किनकर यांच्या सोबतच पायी वारीची संकल्पना पूर्ण झाली. मी फेब्रुवारी २०२४ मध्ये शिक्षक पदावरून सेवानिवृत्त झालो. माझ्या मनात तीव्र इच्छा होती की, देश-विदेशातील नागरिक आळंदी ते पंढरपूर पायीवारी करतात; मग आपण का पायी वारी करू नये. मनात ऊर्मी जागृत झाली अन् २५० किलोमीटर पायीवारी करीत १६ जुलै रोजी पंढरपुरात पोहोचलो. माझे एक वर्षाअगोदरच एक मोठे ऑपरेशन झाले होते. कुटुंबातील सर्वांनाच काळजी लागली, परंतु मी निर्धास्त होतो. ज्याच्यासाठी मी चाललो आहे, ते माझी काळजी घेण्यास समर्थ आहेत. दशमी, एकादशी आणि द्वादशी असे तिन्ही दिवस विठुरायाच्या चरणी पंढरपुरी आमचे वास्तव्य झाले. वारकरी भक्तांचा उसळलेला जनसागर हा एक जागतिक इव्हेंट ठरावा, असाच सोहळा. जातिपातीचा विचार कुणाच्या मनालाही तिथे शिवत नव्हता. कोणाकडूनही कसलीही अपेक्षा न ठेवता येणारा वारकरी, विठुरायाच्या चरणी निर्मळ मनाने लीन होत होता. 'माझे जीवीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।' या उत्कट भावनेने लाखो वारकरी महिनाभर चालत येऊन विठुरायाच्या चरणी स्थिरावले होते. विठ्ठलाच्या दर्शनाशिवाय कशाचीही त्यांना आस नव्हती. पंढरपूर जसे 'भक्तिपीठ' आहे तसेच ते 'मुक्तिपीठ'ही आहे. येणाऱ्या भाविकांचे पांडुरंग ना ज्ञान पाहतो, ना त्याचा कर्मयोग. ना तो किती योगी आहे ते पाहतो. केवळ भक्ताचे शुद्ध अंतःकरण व त्याचा भक्तिभाव बघून त्याच्यावर कृपा करतो. हेच येथील माहात्म्य! पंढरपूरची आषाढी यात्रा हे महाराष्ट्राचे खरे वैभव ठरते. वर्षानुवर्षांपासून अविकसित असलेल्या पंढरपुराकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष होताना दिसते, हे दुर्दैव. साधे रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी मूलभूत व्यवस्थाही अपुरी आहे. महाआरोग्य अभियानासारखे तात्कालिक उपाय योजून यावर उपाय सापडणार नाही. एवढ्या मोठ्या सोहळ्यात जवळपास २०-२५ लाखांच्या गर्दीत एकही दुर्घटना झालेली नाही, ही जशी परमेश्वराची कृपा म्हणावी त्याचप्रमाणे ते पोलिस यंत्रणेचेही यश म्हणावे लागेल. एक विशेष गोष्ट म्हणजे पंढरपुरात कपड्यापासून तर प्रसादापर्यंत सारे काही अगदी माफक दरात उपलब्ध होते. यासाठी तेथील व्यापारी वर्गाचे कौतुक करावे तेवढे थोडे. एवढ्या गर्दीतही दुकानदारांची विनम्रता त्यांचा शांतपणा मनाला भावला. समाजात दुही पसरवणाऱ्या चळवळींना हा आषाढी सोहळा विराम देऊन पुन्हा सर्व महाराष्ट्र एकसंघ करो, हीच विठुरायाच्या चरणी प्रार्थना. आम्ही दर दिवशी २० ते २५ किलोमीटरचा प्रवास करत होतो. प्रत्येक दिवशी तीन विसावा मिळत असल्यामुळे प्रत्येक विसावानंतर जोषपूर्ण वातावरणात भजन करत ध्येय निश्चित करत होतो. तोंडले गावात ज्ञानेश्वर महाराज व सोपानकाका यांचा बंधुभेट सोहळा विलक्षणच!



**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

●● ●●

## आता हे थांबायलाच हवे...!

५ ऑगस्ट २०१९ ला ३७० कलम हटवल्यानंतर दहशतवाद्यांच्या कारवायांवर बरेच नियंत्रण केंद्र सरकारकडून ठेवण्यात आले. परंतु आता २०२४ च्या निवडणुकीनंतर असे लक्षात येते की, दहशतवाद्यांनी पुन्हा तोंड वर काढले आहे. वारंवार आपल्या भारतीय सैनिकांवर हल्ले करण्यात येत आहेत. गरज आहे ती सक्तीचे पाऊल उचलण्याचे. आपल्या भारतीय सैनिकांचे जीव अनमोल आहेत. दहशतवाद्यांच्या कारवायांमध्ये ते हुतात्मा होणे अपेक्षित नाही. केंद्र सरकारने दहशतवाद्यांच्या तळावर हल्ले करून त्यांना समूळ नष्ट करणे हा एकमेव पर्याय लक्षात येतो. यापूर्वीही केंद्र सरकारने सर्जिकल स्ट्राईक करून दहशतवाद्यांचे तळ नष्ट केले आहेत. आतादेखील दहशतवाद्यांचा समूळ नाश करणे ही काळाची गरज आहे. माझी सर्व राजकारण्यांना विनंती आहे की, घराणेशाहीच्या नावावर तुमची राजसत्ता आपल्या अपत्याला देण्यापेक्षा, आपल्याला समाजसेवाच करायची आहे आणि आपल्यामध्ये देशभक्ती आहेच तर प्रत्येक राजकारण्याने आपला एक तरी पुत्र किंवा पुत्री यांना राजकारणात न आणता भारतीय सैन्यामध्ये भरती करून देशसेवा खऱ्या अर्थाने करावी तसेच भारतातील प्रत्येक कुटुंबातील स्वेच्छेने सैनिक बनण्याची तयारी असेल त्याला भारतीय सैन्यात काही वर्षांकरिता तरी नोकरी करण्याची संधी सरकारने उपलब्ध करून द्यावी. जेव्हा आपले स्वतःचे लेकरू सैन्यामध्ये जाईल तेव्हा त्यांच्या जिवाची किंमत आपल्याला नक्की कळेल आणि मग आपण ताबडतोब पावले उचलून दहशतवाद्यांसारख्या शत्रूंना नेस्तनाबूत करू असे वाटते.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

●● ●●

## देवाभाऊ, रामराम!

देवाभाऊ, नाम्याचा रामराम! ओयखलं ना मले? तं भाऊ! आखरी पटलं तुमाले. मी जे सांगत होतो ते! तसं मले मालुम होतंच का एकना- एक दिवस तुमी, तुमच्या कानाशी गुंऽगूं करणाऱ्या चिलटाईवर डी.डी.टी.चा फवारा मारणारच! लय दिवस त्याईले एल्लावू देल्लं तुमी. ठाकू देल्लं तुमी! मले समजेना, कुनापाशी माह्यावालं मन मोकयं करू? आखरी घरवालीवरच आवाज काढला! तिले म्हनलं, ''हा माह्यावाला दोस्त सव्वासहा फुटाचा अन् त्या बारक्याईचं ऐकून काऊन घेते? तुले सांगतो बयने (तिचं नाव हाये बयनाबाई, पण मी लाडानं तिले बयनेच म्हन्तो!) माह्या दोस्तानं नुसता पाय जरी आपटला नं, तं हे सारेच्या सारे गलंडतेत! पन् गडी चूप काहून हाये, माह्या तं पल्ल्यातच पडत नाई!''

पन् आता बेस केलं भाऊ तुमी! तुमची डरकाई ऐकून साऱ्याईले झाडा लागला अशीन! भाऊ, तुमी त्याहीले सांगोवा द्यायचा होता, का पिवळ्या प्यॅंटा घालजा बाबू आज!

मी ऐकोना रोजच- जो उठे तो माह्या देवाभाऊले शिव्या दे! देवाभाऊ चूपच! तसा त्याईले आखीनच चेव आला. आत्ता कसं? एक-दोन दिवस फडफड करतील, पयता पयता जोरजोरानं बोंबा ठोकतील. आदत जाते का अशी एकदम! अन् तेवढं करावंच लागनं ना! मंग म्हनतील- शिव्या तं देल्ल्या!

म्या काय म्हन्तो भाऊ, त्याईचे कपडे एकदा फाडाच तुमी! लोकाईले दिसू द्या त्याईचे थोबाडं! पायजा तुमी, पब्लिक कसा उपेग करते त्या धुतफाडाईचा!

भाऊ, मले मालुम हाये का तुमी एकटेच काफी होता त्याहीले निपटाईले! पन् दोस्त म्हनून माहीबी काई जुम्मेदारी हाये का नाई? फर्ज बनते का नाई माह्यावालं! तं तुमी मले कधीही आवाज द्या, मी पयतच येतो. नाई तं माही जुनी लुना हाये, तिच्यावर येतो. खटाखट आननं ते मले! म्याबी देशाचं नमक खाल्लं हाये ना! एवढंबी नाई करणार का मी!

तवा, देवाभाऊ! आगे बढो! मी मांगमांगं आहोच. याहीचे सारे कारस्थानं बाहीर काढा. लय थंड्या डोक्यानं घेतलं तुमी आता ठावरोक. भक झालं आता. मी जाणून आहो ना, की तुमी झगडा मोल घेत नाई, पन कोनी तुमची खोड का काढली, तं तुमी त्याले जनमभराची याद राहीन, असा इलम देता! मले चांगलं माहीत होतं ना! वीस वर्षे तुमच्याच मोहल्ल्यात होतो ना मी!

लयच लय सोसलं तुमी भाऊ! समजावलबी टाईमा-टाईमाले, पण त्याहीचे शेपटं वाकडच्या वाकडंच! मले काय वाट्टे का तुमी त्याहीचे शेपटं सरके करायच्या भानगडीत पडूच नका. जालीम इलाज सांगतो तुमाले! माह्या इथं पोलादी आंबे-फोडणी हाये. आंबा कितीका टणक असेना, एका झटक्यात त्याच्या फोडी करते. ते मी तुमाले पाठोतो; चांगली धार लावून! त्याईच्या वाकड्या शेपट्या बुडापासून कापून टाका! बुच्या करून टाका! हालवल्याबी आल्या नाही पायजे! समोरून भूंकतेत, मांगून शेपट्या हालवतेत. बुडखं ठेवाजा फकत! पट्टी बी बांधता आली नाही पायजे! बुडखाईवर मधून मधून नमक अन् धुवायचा सोडा टाकत जा, आयडीनचं नमक नाई, साधं! आयडीन नमकानं जखम सुकून जाईन! सोडा टाका, सोडू नका! लय तरास देल्ला त्याहीने तुमाले. मले आवाज द्या. भुलू नका! आलोच समजा मी! टाईम लागला मले तं निपटून घ्या आन ध्यानात ठेवा जा तुकोबाले- नाठाळाच्या माथी हाणू रट्टा! सोटा नशीन तुमच्यापाशी तं मले सांगाना! पाठोतो! यक सांगायले इसरलोच- आता इलेक्शन हायेना, तवा नवे नवे बाबा बाजारात येतील; अलग अलग ढंगाईचे कातडं पांघरून येतील! त्याहीच्या कुंडल्या आतापासूनच जमा करून ठेवजा! या बहुरुप्यांईले त्या वक्ताले हिसका दाखवाच भाऊ! मी हावो ना, तुमी कायले फिकीर करता! मजाक नाई करत मी! रामराम देवाभाऊ!

**- तुमचा मोहल्ला-गडी**
**नाम्या हिरपुऱ्या**

**ता.क.** (१) चिठ्ठी देजा भाऊ. बयनेवर इम्प्रशन पडलं पायजा ना माह्यावालं! सदान्कदा म्हन्ते त्याहीचे मामा माह्या गावचे हायेत!

(२) आंबे-फोडणी मीच घेऊन येतो उद्या. लुनावर येतो. जरा टाईम लागनं, काहून का लय जुनं मॉडल हाये लुनाचंबी अन् माह्या स्वोताचं बी!

●● ●●

## स्वधर्म आणि राष्ट्रधर्म

स्वधर्म आणि राष्ट्रधर्म यातील अंतर स्पष्ट करणारा आणि त्यातील सर्वोपरी कोणते हे अधोरेखित करणारा दाखला महाभारतातील एका प्रसंगातून मिळतो. महाभारतातील युद्धसमयी रणांगणावर युधिष्ठिर आणि कर्ण यांचा सामना झाला. कर्णासमोर युधिष्ठिराचा टिकाव लागला नाही. पराभूत झालेला आणि कर्णाने जीवदान दिलेला युधिष्ठिर खिन्न मनाने तंबूत परतला. आपला ज्येष्ठ भ्राता युधिष्ठिर रणांगण सोडून तंबूत का परतला, याचे कारण अर्जुनाला समजले नाही. युधिष्ठिराला भेटण्यासाठी अर्जुन निघाला. अर्जुन येतो आहे असे युधिष्ठिराने पाहिले आणि युधिष्ठिराचा समज असा झाला की, कर्णाला पराभूत करूनच अर्जुन येतो आहे. युधिष्ठिर व अर्जुन यांची भेट झाल्यावर सर्व खुलासा झाला. रणांगण सोडून केवळ चौकशीसाठी, भेटीसाठी अर्जुनाचे येणे, ही बाब युधिष्ठिराला रुचली नाही. रागावलेल्या धर्मराजाने अर्जुनासह त्याच्या गांडिव धनुष्याची निर्भर्त्सना केली. एरवी मोठ्या भावाच्या आज्ञेत राहणारा अर्जुन संतापला आणि त्याने हाती खड्ग घेतले. जो कोणी गांडिव धनुष्याची निर्भर्त्सना करेल त्याचा वध करण्याची अर्जुनाची प्रतिज्ञा होती. कौरवांशी लढायचे सोडून पांडव आपापसातच लढायला सज्ज झाले, हे पाहून भगवान श्रीकृष्णाची चिंता वाढली. निर्णायक क्षणी योगेश्वराने हस्तक्षेप केला. कौरव आणि पांडव यांच्यातील युद्ध हे अधर्म आणि धर्म यांच्यातील युद्ध होते तसेच अनीती आणि नीती याचा निवाडा करणारे ठरणार होते. भगवंतांनी अर्जुनाला सांगितले की, स्वतः केलेल्या प्रतिज्ञेचे पालन करणे हा स्वधर्म आहे. मात्र अशा स्वधर्माच्या पालनाने जर राष्ट्राची हानी होणार असेल तर तो राष्ट्रद्रोह ठरेल. धर्मराजा हा केवळ तुझा भाऊ नाही तर देशाचा राजादेखील आहे. कौरवांना तर युधिष्ठिराचा निःपात हवाच आहे. शत्रूला जे हवे आहे तेच कृत्य तू केलेस तर तो निश्चितच राष्ट्रद्रोह ठरेल. अर्जुन हा श्रीकृष्णाचा निःसीम भक्त होता. कृष्णाने सांगावे आणि अर्जुनाने ऐकावे, असे दोघांचे सख्य होते. माझ्या प्रतिज्ञापूर्तीसाठी मी नेमके काय करावे असे अर्जुनाने विचारले. कृष्णाने जे मार्गदर्शन केले त्याला 'कृष्णनीती' म्हणतात. कृष्ण म्हणाला, मोठ्यांची निर्भर्त्सना करणे ही कृती त्यांची हत्या करणे समान आहे. त्यानंतर अर्जुनाने युधिष्ठिराची यथेच्छ मानहानी केली आणि पुन्हा रणांगणावर युद्ध खेळण्यास रवाना झाला. मोठ्यांचा अपमान करणे म्हणजे त्यांची हत्या करणे आहे, हे सूत्र समस्त भारतीयांनी मान्य केले आणि मोठ्यांना मान, आदर देण्यावर भर दिला. सर्वांच्या आचरणात जी समानता असते ती समानता म्हणजेच 'संस्कृती' होय.

भारतीयांना आरक्षण पाहिजे, मोफत पाहिजे, अनुदान पाहिजे. देश खड्ड्यात गेला तर त्याची तमा नाही. भारताच्या शत्रू देशांना जे साध्य करायचे असेल त्याला आपल्या आंदोलनामुळे बळ मिळतेय्, याचा विचार करायलाही अनेकांना वेळ नाही. देशाच्या पंतप्रधानांची, सैन्य दलाची, धर्मगुरूंची निर्भर्त्सना करण्यातही अनेकांना फुशारकी वाटते. 'आचारः प्रथमो धर्मः' असे आपली संस्कृती सांगते. आपल्याला जातीचा, धर्माचा, भाषेचा, प्रांताचा अभिमान निश्चित असावा. असा अभिमान बाळगणे हा स्वधर्म आहे. परंतु, टोकाचा अभिमान गाठल्याने राष्ट्रधर्म संकटात येणार असेल तर राष्ट्रधर्म सर्वोपरी आहे, याची जाणीव ठेवावी.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

## संक्षिप्त वृत्त...



### डॉ.घुले यांचा मतदारसंघात ग्रामदैवत दर्शन दौरा

**भूम/परंडा, दि.४ ऑगस्ट -**

भूम-परंडा-वाशी तालुक्यात आरोग्य दूत अशी आपली ओळख निर्माण करणारे डॉ.राहुल घुले यांनी तिन्ही तालुक्यात ग्राम दैवत दर्शन दौरा आयोजित केला आहे. तशी माहिती त्यांनी रविवार दि.४ रोजी शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. डॉ राहुल घुले यांनी कमल भिमराव घुले सामाजिक संस्थेच्या माध्यमातून भूम, परंडा, वाशी तालुक्यातील शेकडो गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला आहे. शेकडो रुग्णांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन डी.पी.दुरुस्तीची मोफत वाहतूक तसेच काठी वाटपाच्या माध्यमातून ते तिन्ही तालुक्यातील जेष्ठ नागरिकांपर्यंत पोहचले आहेत. तालुक्यातील अनेक गावांत आरोग्य शिबीर, परंडा तालुक्यात महाराष्ट्रातील पहिले खतना शिबीर यामुळे ते तळागाळापर्यंत पोहचले आहेत. प्रत्यक्ष प्रत्येक गावात जाऊन लोकांमध्ये मिसळण्याच्या उद्देशाने या ग्राम दैवत दर्शन दौऱ्याचे आयोजन केले असल्याचे डॉ घुले यांनी सांगितले. या दौऱ्यात ते तिन्ही तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्रामदैवताचे दर्शन घेणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यात ते गरजू रुग्णांना तसेच शेतकऱ्यांना भेटणार असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले. यावेळी आरोग्यदूत डॉ.राहुल घुले मित्रपरिवाराचे सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

### विक्रांत देटे-पाटील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना होणार

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील रुई ढोकी येथील विक्रांत रवींद्र देटे पाटील हा विद्यार्थी दि.७ ऑगस्ट रोजी पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना होणार आहे. विक्रांत देठे पाटील यांचे प्राथमिक शिक्षण धाराशिव येथील तेरणा पब्लिक स्कूल येथे तर शालेय शिक्षण पुणे येथील के लाईन मेमोरियल स्कूल ऑफ पुणे येथे झाले. पुढे पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठातून आयटी इंजिनिअरिंग झाल्यानंतर त्यापुढील शिक्षण अमेरिकेतील नामांकित नॉर्थ कॅरोलीना स्टेट युनिव्हर्सिटीतुन तो एमएसचे शिक्षण पूर्ण करणार आहे. तसेच शिक्षण पूर्ण करत असतानाच अमेरिकेतील आयटी क्षेत्रातील एका नामांकित कंपनीत तो आयटी इंजिनियर म्हणून कार्यरत राहणार आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन तो पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत जाणार असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या भरघोस यशाचे श्रेय आई अ‍ॅड.उल्का देटे-पाटील हिला जाते असे विक्रांत याने सांगितले.




### माजी मंत्री आ.मधुकरराव चव्हाण यांचा भव्य सत्कार

**तुळजापूर, दि.४ ऑगस्ट -**

माजीमंत्री माजी आमदार मधुकर चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसा निमित्ताने श्रीनाथ मंगल कार्यालयात भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर काँग्रेस नेत्या डॉ.स्मिता शहापुरकर, अशोक मगर, माधवराव कुतवळ, भागवत धस, मुकुंद डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सत्कारास उत्तर देताना मधुकरराव चव्हाण पुढे म्हणाले की, आजपर्यत जन्मदिन साजरा केला नाही या दिवशी मी देवधर्म देवदर्शनाथ तिर्थक्षेत्री जातो. पण यंदा कार्यकत्यांचा आग्रह नाकारु शकलो नाही म्हणून प्रथमच वाढदिवस प्रमाणात साजरा करतोय, असेच तुमचे प्रेम माझावर राहु द्या, माझे कायम तुमचावर राहिल. तुमच्या शुभेछेने मला काम करण्याची उर्जा ताकद मिळाली आहे. जिल्ह्यात काँग्रेस पक्ष वाढवण्याचे काम इमान इतबारे केले तसेच शहरवासियांचे कामे करताना आधी तुळजापूर करांना विचारायाचे मगच मगच विकास काम करायाचे अनेक कार्यकते निर्माण केले. मी तालुक्यातील जनतेच्या मुलभुत समस्या सोडविण्यासाठी प्रथम प्राधान्य दिले. सर्वजातीधर्माला मी आपला वाटतो कारण जात न बघता मानवता बघुन काम केले. मला मोठे करण्यात सर्वांचा सहभाग आहे.

### लाडकी बहीण योजना समिति सदस्यपदी सुरेश कवडे यांची निवड


**वाशी, दि.४ ऑगस्ट -**



लाडकी बहीण योजना परंडा विधानसभा समिती सदस्य भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा वाशी येथील उपनगराध्यक्ष सुरेश बप्पा कवडे यांची निवड झाली. त्याबद्दल वाशी तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या निवडणुकीमुळे परंडा-भूम-वाशी मतदार संघातील लाडक्या बहिणीचे शंभर टक्के काम होणार असल्याने नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे. कवडे यांची निवड झाल्याबद्दल वाशी तालुका भाजपा अध्यक्ष राजगुरू कुकडे महाराज, धनंजय कुलकर्णी, महादेव आप्पा आखाडे, कुलकर्णी प्रशांत, तात्या लोकरे, महिला आघाडी अध्यक्ष त्रिशाला देशमुख तसेच मित्र मंडळ पत्रकार बांधव यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

### अध्यक्षपदी मुगळे तर उपाध्यक्ष गंगथडे

**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**



तालुक्यातील मुळज येथील जिल्हा परिषद प्राशाळेत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी संजय मुगळे तर उपाध्यक्षपदी अमोल गंगथडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली शालेय व्यवस्थापन समिती निवडीसाठी सरपंच शिवकन्या महेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. संजय मुगळे यांचे अध्यक्ष तर अमोल गंगथडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर विश्वास बिराजदार, किरण कांबळे, अरुण चव्हाण, श्रीकांत माळी, गणेश कुलकर्णी, दत्ता राजपूत, अंजली शिंदे, उषा गोसावी, वेंकट दंड, घुले राजपूत, मिनाक्षी पांचाळ यांची ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक जाधवसर, गोपाळ शिंदे, पप्पु दुधभाते, मनोज यादव यांच्या सह पालक, शिक्षक गावातील मान्यवर उपस्थित होते. या निवडीनंतर बाबा पाटील यांनी अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा सत्कार केला.

# जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा मविआ खासदार, आमदारांचा राजकीय डाव

## * भूमिगत गटारीचे रखडलेले काम हे त्यांचेच पाप... * शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळूंके यांचा मविआ नेत्यांना प्रतिटोला...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट-**



शहरातील भूमिगत गटारीचे काम हे नागरिकांना चिखलातून वाट काढावी लागते, भूमिगत गटारीचे रखडलेले कामम हाविकास आघाडीचे खासदार, आमदार व माजी नगराध्यक्षांचेच पाप आहे. या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी तात्काळ मंजूर केला. महिनाभरात या कामाला सुरुवात होईल, हे माहीत असताना काल महाविकास आघाडीचे खासदार, आमदार व माजी नगराध्यक्षांनी पत्रकार परिषद घेऊन जे आरोप केले. दुसरा कुठलाही मुद्दा नसल्यामुळे सातत्याने त्याच त्याच विषयाचे भांडवल करुन जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा त्यांचा राजकीय डाव असल्याचा प्रतिटोला शिवसेना जिल्हाप्रम ुख सुरज साळुंके यांनी पत्रकार परिषदेत लगावला.

शासकीय विश्रामगृहात रविवारी (दि.४) झालेल्या पत्रकार परिषदेत खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील आणि माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांनी केलेल्या आरोपांचा समाचार घेतला. ते म्हणाले, तुम्ही खासदार म्हणून मतदारसंघातील माता, भगिनींसाठी, बेरोजगारांसाठी काय करणार आहात? हे त्यांनी स्पष्ट करणे अपेक्षित होते. परंतु या विषयावर न बोलताना मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सरकारवर आरोप करणे, मंत्री, आमदारावर आरोप करत सुटले आहेत. निवडणूकीत पैशांचे वाटप केले असा ते करतात,

भुयारी गटार योजना जेव्हा त्यांनी आणली त्यांनीच योजनेचा सत्यानाश केला. आज सगळीकडे रस्त्यांवरर चिखल आहे. तरीही आम्ही योजनेसाठी निधी आणला आणि त्याला पालकमंत्री महोदय आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील स्थगिती आणली म्हणून ते सांगतात. परंतु त्यांनी नेमका कोणता निधी आणला, हेही सांगावे असे आव्हान जिल्हाप्रमुख साळुंके यांनी आ.कैलास पाटील व माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांना दिले.

खरेतर या योजनेची शहराला गरज होती काय? असा सवालही त्यांनी केला. पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावरही ते बोलले, मात्र भुयारी गटार योजनेवर झालेला खर्च पाणीपुरवठ्यासाठी केला असता तर पाण्याचा प्रश्न सुटला नसता काय? योजना कुणी आणली आणि त्या योजनेचे लाभार्थी कोण आहेत?

स्वतःच्या घराजवळ आमदार, म ाजी नगराध्यक्षांनी मोठ्या पाईपलाईन गटारीसाठी टाकल्या, परंतु इतर ठिकाणी किती साईजच्या पाईपलाईन टाकल्या, हेही पत्रकार परिषदेत सांगितले असते तर बरे झाले असते. या योजनेमुळे जनतेचा नाही तर त्यांचाच विकास झालेला असल्याचे श्री.साळुंके म्हणाले.

रस्त्यावरील चिखलामुळे जनतेला होणारा त्रास कमी होण्यासाठी पालकमंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन दिला, परंतु रस्त्याच्या कामाला पण भुयारी गटार योजनेची अडचण येत आहे. विशेष म्हणजे भुयारी गटार योजनेच्या २५ टक्के निधीचा भार नगर परिषदेवर पडत आहे, हा निधी विशेष वैशिष्ट्य पूर्ण योजना मधून का आणला नाही? असा सवालही त्यांनी केला.

आमदार कैलास पाटलांनी १०८ कामांना स्थगिती दिल्याचा आरोप केला आहे. परंतु या कामांच्या निविदा प्रक्रियेवर आक्षेप नोंदवल्यामुळे जिल्हाधिकार्यांनी ही कामे नगर परिषदेला समांतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केली. या १०८ कामांपैकी ८८ कामे प्रगती पथावर आहेत १० कामे हॉटमिक्स असल्यामुळे पावसाळ्यात करता येत नाहीत म्हणून थांबलेली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील वर्ग १ च्या जमिनी वर्ग २ मध्ये घेतल्यानंतर अन्यायग्रस्त शेतकरी व प्लॉटधारकांनी धनंजय शिंगाडे यांच्या नेतृत्त्वात शेतकरी बचाव कृती समिती स्थापन केली. परंतु महाविकास आघाडीच्या खासदार, आमदारांनी यासाठी पाठपुरावा का केला नाही? उलट पालकमंत्री महोदय आणि आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेऊन महसूल मंत्री विखे पाटील यांच्याकडे बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठक अभ्यास समिती स्थापन करण्यासाठी पाठपुरावा केला.

फक्त महायुती सरकारवर आरोप करण्याचा उद्योग ही मंडळी करत आहेत. महाविकास आघाडी सरकारने उद्यानासाठी दिलेला निधी सध्या अस्तित्वात असलेल्या ठिकाणीच खर्च करण्याचा घाट नगराध्यक्षांनी घातला. त्यामुळे आम्ही हा निधी इतरत्र उद्यान निर्मितीसाठी वापरण्याकरिता पाठपुरावा केला.

परवाच पालकमंत्री, आ.राणाजगजितसिंह यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी शासकीय दुध डेअरीची १ एकर जागा उपलब्ध करुन १ कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याचा शासननिर्णय जारी केला.

मातंग समाजाने या निर्णयाचे स्वागत करुन महायुतीच्या पदाधिकार्यांचा सत्कार केला. महाविकास आघाडीच्या खासदार, आमदारांना ही बाब सलत असल्यामुळे याचेही राजकारण करण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्यामुळे यापुढे तरी त्याच त्याच विषयावर पुन्हा पुन्हा बोलून जनतेची दिशाभूल करण्याचे काम म हाविकास आघाडीच्या पदाधिकार्यांनी थांबवावे असा सल्लाही जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी दिला.

पत्रकार परिषदेस शिवउद्योग सहकारचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरखाने, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित बनसोडे, शिवसेना शहर संघटक रणजीत चौधरी, उपशहर प्रमुख रजनीकांत माळाळे, युवासेना शहरप्रमुख सागर कदम, अमर माळी, सौरभ निंबाळकर, सिद्धू सावंत उपस्थित होते.

# नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविणे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य : आ.चौगुले

## दाळिंब ग्रामस्थांच्या वतीने आ.ज्ञानराज चौगुले यांचा भव्य सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ ऑगस्ट-**



दाळींब ता.उमरगा येथे विशेषतः मागील ०२ वर्षाच्या कार्यकाळात विविध मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांनी भरघोस असा निधी मंजूर केला आहे. त्याबद्दल ग्रामपंचायत दाळिंब व बाबा जाफरी फाउंडेशन च्या वतीने आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या भव्य अशा सत्काराचे समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्कारास उत्तर देताना आमदार चौगुले यांनी नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा पुरविणे हे लोकप्रतिनिधीचे आद्यकर्तव्य असून यासाठी निधी उपलब्ध करून देणे व त्याच्या माध्यमातून विविध विकास कामे करणे ही अविरत चालणारी गोष्ट आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या जाणणारा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याला मिळाल्याने मला प्रत्येक गावातील वेगवेगळ्या जाती धर्मांच्या उद्धारासाठी व मूलभूत सुविधा सोडविण्यासाठी भरघोस असा निधी मंजूर करून घेता आला असे यावेळी व्यक्त केले. त्यानंतर गावातील अनेक नागरिकांनी केलेल्या विकास कामांबद्दल आमदार ज्ञानराज चौगुले यांचा सत्कार केला व आभार व्यक्त करत पुढील काळात आमदार चौगुले यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. तसेच शाळेची इमारत बांधणे, कब्रस्थान सरंक्षक भिंतच्या उर्वरीत कामांसाठी निधी मिळणे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर समाज मंदिर बांधणे, बौद्ध विहार बांधणे, शेतरस्ते करणे, नविन व अतिरीक्त रोहित्र बसविणे, मातंग समाज स्मशानभूमी करणे, धनगर समाज मंदिर बांधणे, दिव्यांग बांधवांना घरकुलाचा लाभ मिळवुन देणे अशा अनेक मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी समाजसेवक बाबा जाफरी, तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, शेतकरी सेना तालुकाप्रमुख शाहूराज सावंत, सरपंच रंजनाताई सातपुते, पोलीस पाटील अश्विनीताई वाले, साहेबलाल (चाचा) कमाल, बाबुराव टिकंबरे, एकबाल पटेल, खय्युम चाकुरे, नदीम मुगळे, हनुमंत शिंदे, धीरज इंगळे, राजू कारभारी, प्रदीप मदने, अमर देशटवार, लक्ष्मीकांत कुलकर्णी, सर्व ग्रामपंचायत सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिर्थक्षेत्र तुळजापूरातील कुठल्याही घटकावर अन्याय होणार नाही : जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ ऑगस्ट-**



तिर्थक्षेत्र तुळजापूरात विकास कामे करताना विस्थापीतांचे प्रमाण कमी असेल आपण केलेल्या सुचना सल्लागार यांना पाठवल्या असुन या बाबतीत लवकरच अहवाल येईल, असे मत श्रीतुळजाभवानी मंदीरसंस्थान अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांनी व्यक्त केले.

तुळजापूर विकास आराखडय़ाबाबत तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष जिल्हाधिकारी सचिन ओंम्बासे यांच्याशी चर्चा करण्यासाठी खा.ओमराजे निंबाळकर यांनी जिल्हाधिकारी निवास येथे बैठक नियोजित केले होती. या बैठकीत तिन्ही पुजारी मंडळाच्या अध्यक्षांनी मते मांडले.

खा.ओमराजे निंबाळकर यांनी यावेळी तुळजापूर शहराचा विकास करताना शहर वासियांचे मत विचारत घ्यावा विस्थापीत करुन शहरवासीयांचे नुकसान करु नका कारण मंदीरावर शसरवासायीयांचि उपजिविका अवलंबून आहे, यांचा विकास आराखड्यात गांभीर्य पुर्वक विचार करा, तिर्थक्षेत्र तुळजापूरचा विकास करताना सर्व भागात विकास करा विकास करताना कुण्याही भागावर अन्याय होवू देवु नका, तुळजापूर शहरामध्ये प्रत्येक भागामध्ये समान विकास होणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले शेवटी जिल्हाधिकारी यांनी तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरातील कुठल्याही घटकावर अन्याय होणार नाही, याची ग्वाही दिली.

या बैठकीला धिरज पाटील, विपीन शिंदे, अनंत कोंडो, रूशीकेश मगर, अमोल कुतवळ, अमर परमेश्वर, श्याम पवार, सुधीर परमेश्वर, प्रविण कदम, राहुल खपले, भाऊ भांजी, सचिन अमृतराव, लालासाहेब मगर, राजाभाऊ चोपदार, आण्णासाहेब क्षीरसागर, नवनाथ जगताप, बल्लर कदम, अमोल जाधव, मुन्ना धुमाळ, श्रीराम अपसिंगेकर व इतर उपस्थित होते.



## कोळेवाडीचा शेतकरी पुत्र बनला पीएसआय

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ ऑगस्ट-**

तालुक्यातील कोळेवाडी गावचे अल्पभूधारक शेतकरी म च्छिंद्र पालमपल्ले यांचा मुलगा म ोहन पालमपल्ले पोलीस उपनिरीक्षक पीएसआय बनला आहे.या यशाबद्दल त्यांचा सत्कार प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, विठ्ठल चिकुंद्रे, सिद्धेश्वर माने, मच्छिंद्र पालमपल्ले, जीवन पालमपल्ले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला.

त्यांचे प्राथमिक शिक्षण कोळेवाडी येथील छोट्याशा गावात झाले.त्यानंतर माध्यमिक शिक्षण रामलिंग मुदगड येथे तर महाविद्यालयीन शिक्षण लातूर येथे झाले.

त्यांचा हा यशाचा प्रवास दीपस्तंभासारखा दिशा देणारा ठरतो. अद्यावत शैक्षणिक सुविधा, साधने नाहीत, योग्य मार्गदर्शनाचा अभाव आहे. आर्थिक संपन्नता नाही म्हणून हतबल न होता प्रतिकूल परिस्थितीवर जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मात करता येऊ शकते हे त्यांनी आपल्या यशाद्वारे सिद्ध करून दाखवले आहे.

## राष्ट्रवादीकडून विधानसभेची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.४ ऑगस्ट-**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जीवनराव गोरे इच्छुक आहेत. त्यांनी ग्रामीण भागाचा दौरा सुरू केला असून, या दौऱ्याच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हा युवकाध्यक्ष आदित्य गोरे यांनी सिंदगाव येथे भेट देऊन विधानसभेची जोरदार तयारी करण्याच्या सूचना दिल्या.

याप्रसंगी ग्रा.पं.सदस्य गंगाधर पेठसांगवे, माजी ग्रा.पं.सदस्य प्रताप पाटील, दानाप्पा बणजगोळे, मल्लिनाथ कुलकर्णी, विजय भोसले, विजय पेठसांगवे, रवी शिंदे, संतोष चव्हाण, अशोक कुलकर्णी, प्रेमनाथ सोनकाटे, लक्ष्मण इंगोले, नागेश सुरवसे, अशोक बणजगोळे, सिद्धांना करंडे, साधू इंगळे, सोमनाथ रेड्डी, रवी रेड्डी, सिद्धू कुलकर्णी, परू पेठसांगवे, खंडू चव्हाण, शरणू कामगुंडे, मल्लू स्वामी, लाडूशा शिंदे, बाळू स्वामी आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ड्रग्ज सप्लायरला सहज सोडणार नाही : उपविभागीय अधिकारी डॉ.निलेश देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ ऑगस्ट-**



तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात ड्रग्ज येत असेल तर घेणाऱ्या ऐवजी सप्लायर पकडुन त्याचावर कारवाई करणारसप्लायरला सोडणार नाही असे प्रतिपादन उपविभीगीय अधिकारी डॉ.निलेश देशमुख यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

येथील पोलिस ठाण्यात पत्रकारांशी संवाद साधताना देशमुख म्हणाले की , ड्रग्ज प्राशन करणाऱ्या वर कारवाई करण्यासाठी मर्यादा आहे ऐक तर त्याच्या कडे कमी प्रमाणात असते पण ड्रग्ज प्राशन करणाऱ्या पेक्षा सप्लाय करणाऱ्यावर कारवाई होणे गरजे आहे ते आम्ही निश्चित करणार आहे.

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात वाढत्या चोऱ्यांच्या घटने बाबतीत बोलताना म्हणाले कि पोलिस रात्री पेट्रोलिंग करीत असुन सायरन सिस्टीम सुरु केली आहे.

शहरात सध्या सर्वत्र ५७ सीसीटीव्ही कार्यरत असुन उर्वरीत सीसीटीव्ही दुरुस्ती पत्र नगर परिषदेला दिले आहे. तिर्थक्षत्री वेश्याव्यवसाय बाबतीत कारवाई करण्याचे आश्वासन दिले. तसेच शहरात बेभाव पैसे रिक्षावाले घेतात. अनाधिकृत रिक्षा बाबतीत बोलतान म्हणाले की, शहरातील सर्व रिक्षांची तपासणी करावी लागेल, या बाबतीत आरटीओला कळवु असे यावेळी म्हणाले. जेष्ठ नागरिकांचा मोबाईल चोरी पार्श्वभूम ीवर बोलताना म्हणाले की, बंदोबस्त वाढवावा लागेल व तक्रार आली तर निश्चित कारवाई केली जाईल, अशी ग्वाही यावेळी दिली.

# अवयवदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट-**



येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रोटरी क्लब उस्म ानाबाद तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे राष्ट्रीय अवयवदान दिनाचे औचित्य साधुन अवयवदानाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबसे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा दोमकुंडवर, रोटरी क्लब उस्मानाबादचे अध्यक्ष डॉ.श्रीराम जिंतुरकर व सचिव आनंद कुलकर्णी, डॉ. सचिन देशमुख, डॉ.तानाजी लाकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमामध्ये पथनाट्याद्वारे अवयवदानाची जनजागृतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला अवयवदाना निमित्त सर्वांनी शपथ घेऊन अवयवदानाचा संकल्प केला. तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी काव्यवाचन /स्लोगन/वक्तृत्व / रांगोळी इत्यादी स्वरुपाच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्याचे प्रशिस्तिपत्राचे वाटप जिल्हाधिकारी सचिन ओंबसे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कोळी यांच्या मुलाचे अवयवदान केल्याबद्दल त्यांचा सत्कार जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या हस्ते करण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.शिल्पा दोमकुंडवार यांनी केले. त्यानंतर अवयवदान जनजागृती रॅलीला जिल्हाधिकारी धाराशिव यांनी हिरवा झेंडा दाखवून शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले.

# नवोदय विद्यालयात त्वचारोग तपासणी शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट-**



पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात रविवार दि.४ ऑगस्ट रोजी त्वचारोग तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य के.वाय.इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील वरिष्ठ अध्यापक एस.डी.खोब्रागडे, एस.एस.माने, हरी जाधव, आरोग्य परिचारिका सुषमा येलकर यांची उपस्थिती होती. या शिबिराम ध्ये जवळपास ५५ विद्यार्थ्यांची त्वचेची तपासणी करण्यात आली. ही तपासणी तुळजापूर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, तुळजापूर येथील नामवंत त्वचारोग तज्ञ डॉ.मीनल सूजितकुमार मगर यांनी केली.

या त्वचेच्या रोगासंबंधी म ार्गदर्शन करताना म्हणाल्या की, सर्वांनी सकस आहार, जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्या, फळे, भरपूर व्यायाम, स्वच्छ कपडे, विश्रांती, भरपूर झोप, अंग ओले न ठेवणे, भरपूर पाणी पिण्यासाठी सांगून आंघोळ करताना केमिकल युक्त शाम्पू व साबण न वापरण्याचे सांगितले. या आरोग्य तपासणीसाठी विद्यालयातील आरोग्य परिचारिका सुषमा येलकर यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

# संघ, सरकार आणि सरकारी नोकर




गुजरात सरकारने, सरकारी नोकरांना रा. स्व. संघाच्या कार्यक्रमात भाग घ्यायला प्रतिबंध करणारा नियम बाजूला सारला, ही फार चांगली गोष्ट झाली. संघाच्या दृष्टीने नव्हे, सरकारच्या दृष्टीने. कारण, सरकारच्या कृपेने संघ वाढलेला नाही. त्याच्या जवळपासच्या पंचाहत्तर वर्षांच्या आयुष्यात सरकारी अवकृपेचाच भोग त्याच्या वाट्याला आला. तरी तो वाढला. ही अवकृपा स्वातंत्र्योत्तर काळातलीच होती, असेही नाही. इंग्रजांचे परकीय शासन असतानाही सरकारची अवकृपाच होती. स्वदेशी काँग्रेस सरकारांनीही विदेशी इंग्रज सरकारचेच अनुकरण केले आणि याचे तरी आश्चर्य का मानावे? इंग्रजी शासनाचे वारसदार म्हणूनच ते आले ना? उत्तराधिकाऱ्याला, आलेली परंपरा सोडायला खूप हिंमत लागते.

### बंदीची भाषा

१५ डिसेंबर १९३२ ला, तेव्हाच्या मध्यप्रांत वऱ्हाडच्या गोऱ्या सरकारच्या पत्रकाची भाषा आणि काँग्रेस सरकारांनी काढलेल्या पत्रकांची भाषा यातील साम्य लक्षणीय आहे. १९३२ च्या इंग्रज सरकारच्या पत्रकांचा भावानुवाद असा - ''राजकीय चळवळींच्या संबंधात सरकारी नोकरांची भूमिका सरकारी नोकर वर्तणूक नियमातील २१ व्या कलमात सांगण्यात आली आहे. असल्या सगळ्या राजकीय विषयांपासून सरकारी नोकरांनी स्वत:ला अलिप्त ठेवण्याच्या आवश्यकतेकडे ती कटाक्षाने लक्ष वेधते. रा. स्व. संघ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संघटनेचे उघडउघड जातीय स्वरूप व राजकीय चळवळीतून ती वाढत्या प्रमाणात घेत असलेला भाग, या गोष्टी विचारात घेता त्या संस्थेच्या हालचालींशी सरकारी नोकरांचा संबंध असणे, हे त्या सरकारी नोकरांच्या आपापली कर्तव्ये नि:पक्षपातीपणे बजावण्याशी विसंवादी आहे किंवा विसंवादी होईल, या विषयी सरकारची पूर्ण निश्चिती झाली आहे. अर्थात् या विषयाला अनुसरून कोणत्याही सरकारी नोकराला रा. स्व. संघाचा सदस्य होण्याला किंवा त्याच्या कार्यक्रमात भाग घेण्याला परवानगी दिली जाऊ नये, असे सरकारने ठरविले आहे. (डॉ. हेडगेवार : ना. ह. पालकर, पृष्ठ २५०) संघ त्यावेळी फक्त सात वर्षांचा होता.

या सरकारी घोषणेवर डॉ. हेडगेवारांची प्रतिक्रियाही ध्यानात घेतली म्हणजे संघ त्याच्या बाल्यकाळापासून या धमक्यांकडे कोणत्या दृष्टीने पाहतो, हे समजून येईल. डॉक्टर म्हणाले होते, ''ज्या दिवशी सरकार संघ बेकायदा ठरवून बंद करील, त्या दिवशी नागपुरात दोनशे संघशाखा निर्माण होतील. जितके स्वयंसेवक संघात आहेत तितक्याच शाखा संघ बंद केल्यानंतर निघतील.'' त्यावेळी नागपुरातील स्वयंसेवकांची संख्या फक्त दोनशे होती. इंग्रज सरकारचे प्रत्यक्ष पत्रक निघण्यापूर्वी, त्याची चर्चा हवेत असताना, डॉक्टरांनी हे काढलेले आहेत.

### संघ संपला नाही

संघावर बंदी घालण्याची ही भाषा नंतर सुमारे पंधरा वर्षे बंद होती. १९४७ साली, ती पुनः प्रकटू लागली. उत्तर प्रदेशातील काँग्रेसचे कार्यकर्ते आणि मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत यांचे संसदीय सचिव गोविंद सहाय यांचा त्यात पुढाकार असे. कम्युनिस्ट लोक संघासंबंधी 'फॅसिस्ट' वगैरे दूषणे लावून जशी भाषा वापरीत, तशाच भाषेचा त्यांनी वापर करून 'नाझी तंत्र आणि संघ' या आशयाच्या शीर्षकाची एक पुस्तिका काढली होती. पं. नेहरूंसारखे थोर नेतेही, ही पुस्तिका म्हणजेच वेदवाक्य होय, असे समजून वागले. १९४८ च्या ३० जानेवारीला महात्मा गांधींची हत्या झाली आणि या मंडळींना संघावर बंदी घालण्यासाठी सुवर्णसंधी लाभली. संघाकरिता खरेच तो काळ फार कठीण होता. एका विश्ववंद्य नेत्याच्या हत्येचा आरोप, सारे समाजमन प्रक्षुब्ध, प्रसारमाध्यमांमध्ये संघाविरुद्ध गरळ ओकण्याची अहमहमिका! हे सारे असूनही संघ संपला नाही. त्या हत्येच्या क्षुब्ध वातावरणात वीस हजार स्वयंसेवकांना अटक करण्यात आली. असंख्य घरांच्या झडत्या घेण्यात आल्या. संघ कार्यकर्त्यांच्या घरांवर, संघ कार्यालयांवर हल्ले करण्याची गुंडांना मोकळीक देण्यात आली. सगळ्यांनाच वाटले की संघ संपला. पण संघाने तो सारा जनक्षोभ पचविला. नेहरू-पटेलांचे लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले सरकारही जेव्हा न्याय देण्याला टाळाटाळ करू लागले, तेव्हा, बंदी लागल्यापासून अकरा महिन्यांच्या आत संघाने सत्याग्रह केला. त्यात साठ हजार लोकांनी भाग घेतला. एका भीषण गडद अंधारात उडी घेण्यासाठी एवढे लोक सिद्ध झाले, हे बघून सरकारही चकित झाले. संघावरची



बंदी उठली. सरकारातील व काँग्रेस पक्षातील अनेक लोकांनाही वाटू लागले की, संघाचे हे वीर आणि धैर्यशील लोक काँग्रेसमध्ये यावेत. मी येथे सरदार पटेलांचे दोन उद्गार उल्लेखित करतो. एक आहे संघावर बंदी घालण्यापूर्वीचा आणि दुसरा संघावरील बंदीच्या काळातला. लखनौला भाषण करताना सरदार पटेल म्हणाले होते की, संघ ही देशभक्तांची संघटना आहे, तिला बळाचा प्रयोग करून संपविता येणार नाही. संघावरील बंदीच्या काळात, तत्कालीन सरसंघचालक श्रीगुरुजी आणि गृहमंत्री सरदार पटेल यांच्यात जो पत्रव्यवहार झाला, त्यात सरदारांनी आपली ही भावना पुनः प्रकट केली. दिनांक ११-९-४८ रोजी लिहिलेल्या पत्रात सरदार पटेल लिहितात, ''मेरा पूर्ण विश्वास है कि आर. एस. एस. वाले अपने देशप्रेम को काँग्रेस से मिलकरही निभा सकते है। संघाने काँग्रेसबरोबर यावे अशी सरदारांची जी इच्छा होती ती संघावरील बंदी उठल्यानंतर, काँग्रेस कार्यकारी समितीने, संघ स्वयंसेवकांना काँग्रेसप्रवेशाची दारे खुली करण्याचा प्रस्ताव पारित करून प्रकट केली. पण पं. नेहरूंच्या आग्रहास्तव कार्यसमितीने तो ठराव परत घेतला. यात संघाचे कोणते नुकसान झाले? कोणतेच नाही. नुकसान काँग्रेसचेच झाले.

पुढे श्रीमती इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. आपली सत्ता टिकविण्यासाठी आणि पक्षांतर्गत विरोधकांवर कुरघोडी करण्यासाठी त्यांनी डावा मार्ग निवडला. कम्युनिस्टांचे सहकार्य घेतले. त्या सहकार्याला जागण्यासाठी त्यांनीही आपली वक्र दृष्टी संघाकडे वळविली. ज्या पक्षांनी इंदिराजींच्या राजीनाम्याची मागणी केली, त्यांच्यावर इंदिरा सरकारने बंदी घातली नाही. ज्याने त्यांच्या राजीनाम्यासंबंधी अवाक्षरही काढले नाही, त्या संघावर बंदी घातली! कारण, त्यांना भीती संघाचीच वाटत होती. आणिबाणीच्या त्या काळ्याकुट्ट पर्वात आशेचा एकमात्र किरण संघ होता. आणिबाणीच्या विरोधात जो सत्याग्रह झाला, त्यातील ८० टक्क्यांहून अधिक सत्याग्रही संघातले होते. तुकड्यांमागून तुकड्या शिक्षेची पर्वा न करता तुरुंगात येत होत्या. नागपूरच्या मिसाबंद्यांमध्ये आमच्या बरोबर कम्युनिस्ट पक्षाचे नेते बिंदाप्रसाद कश्यपही होते. अंधारात उडी घेणारे एवढ्या मोठ्या संख्येतील लोक बघून त्यांनीही आश्चर्य व्यक्त केले. हे सर्व सांगण्याचा उद्देश हा की, नेहरू, पटेल, गोविंद वल्लभ पंत, इंदिरा गांधी यांच्या उंचीच्या तुलनेत दिग्विजयसिंग किंवा विलासराव देशमुख यांना मुंग्यांच्या वारूळांचीही उंची लाभलेली नाही. त्यांची अवकात अगदी तुच्छ आहे. त्यामुळे त्यांच्या वल्गना गांभीर्याने घेण्याची गरज नाही. सोनिया गांधींना रिझविण्यासाठी, संघासंबंधी जे बोलणे आवश्यक आहे, ते त्यांनी अवश्य बोलावे. आपल्या राज्यात जे करायचे आहे ते अवश्य करावे. जे आपल्या मंत्र्याच्या जिवाचे रक्षण करू शकत नाहीत, अशा शेंदाडशिपायांच्या धमकावणीने संघाचे काही बिघडायचे नाही.

### हितोपदेश

खरे म्हणजे काँग्रेस पक्षाने अधिकृतपणे ठराव करून आपल्या कार्यकर्त्यांना आणि काँग्रेसच्या सरकारांनी आपल्या कर्मचाऱ्यांना योजनापूर्वक संघात पाठवायला हवे. सरदार पटेल प्रभृती संघाला काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न करीत होते. उद्देश हा की, शुद्ध पाण्याचा प्रवाह पुरेशा शक्तीने आला, तर घाण वाहून जाईल. आता तो प्रवाह तिकडे येण्याची सुतराम् शक्यता नाही. आता इतरांनीच त्या प्रवाहात येऊन अवगाहन केले पाहिजे. काही प्रमाणात तरी कलुष नक्की धुतले जाईल. ओडिशातले जानकीवल्लभ पटनायक आणि गिरधर गमांग काही काळ जरी संघप्रवाहात न्हाऊन निघाले असते, तर ओडिशात प्रचंड वादळ आपल्या विनाशलीलेने सर्वनाश करायला उठले असताना, ते संकटग्रस्त जनतेच्या मदतीला पहिल्यांदा धावून गेले असते आणि नंतर मुख्यमंत्री हा की तो, हे राजकारण चिवडीत बसले असते. परंतु, अत्यंत शरमेची गोष्ट ही की, त्या भीषण आपत्तीच्या प्रसंगी या मंडळींना राजकारण चिवडीत बसण्याची लाज वाटली नाही. हा कोणत्या शिक्षणाचा व राजकारणाचा परिणाम आहे, हे दिग्विजयसिंग आणि विलासराव यांनी जनतेच्या उद्बोधनासाठी अवश्य सांगावे. मी दूरदर्शनवरील एका चित्रात संघाच्या पश्चिम आंध्रप्रदेशाचे संघचालक, ओडिशातील विपन्नांच्या मदतीसाठी स्वत: जातीने साहित्य घेऊन जाताना बघितले. कुठे हैदराबाद आणि कुठे ओडिशा! पण आंध्रचे संघचालक तेथे धावले. नोव्हेंबरच्या २० तारखेला मी काही तासांसाठी दिल्लीच्या संघकार्यालयात थांबलो होतो. सारा परिसर ओडिशातील विपन्नग्रस्तांसाठीच्या मदत-सामग्रीने व्यापला होता. कपड्यांची छाटणी केली जात होती. त्यांचे गठ्ठे बांधले जात होते. भांडी व धान्य यांची वेगळी बांधणी होत होती. ट्रकांमध्ये हे सामान भरले जात होते. अनेक कार्यकर्ते हेच काम करीत होते. ते भाडोत्री नव्हते. त्यांना याचे पारिश्रमिक मिळणार नव्हते, तरी ते कार्य करीत होते. ही संघाची किमया आहे की, जी दिल्ली आणि ओडिशा यातले अंतर समाप्त करते. कुणाला, कोणत्या जातीच्या लोकांना, कोणत्या पंथसंप्रदायांच्या जनांना हे दिले जाणार आहे, याचा ते विचार करीत नाहीत. पंजाबात, सौदी अरेबियाच्या एका विमानाला अपघात झाला, तेव्हा स्वयंसेवक धावून गेले. त्या विमानातील यात्रेकरूंना विचारा की, त्यांचा मजहब कोणता हे संघाच्या स्वयंसेवकांनी विचारले काय? आणिबाणीत मिसाबंदींच्या घरची वास्तपुस्त करताना, ते कोणत्या पक्षाचे आहेत हे संघाच्या कार्यकर्त्यांनी कधी विचारले काय आणि फाळणीच्या वेळी काँग्रेसवाल्यांच्या कुटुंबांना, आपले प्राण धोक्यात घालून संघाच्या स्वयंसेवकांनी वाचविले, तेव्हा काँग्रेसवाल्यांनी काही महिन्यांपूर्वीच जे जहर उगाळले होते, त्याची त्यांनी आठवण तरी ठेवली काय? संघस्वयंसेवकांच्या या निरपेक्ष सेवेच्या तुलनेत, ओडिशात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेल्या सहेतुक सेवेला बसवा आणि मग संघावर टीकेचे आसूड ओढण्यासाठी जीभ टाळूला लावा. काँग्रेसजनांना माझा अगदी मनापासून हितोपदेश आहे की, त्यांनी काही वर्षे तरी संघात रहावे, तेथील औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचा लाभ घ्यावा. संघाचा एक जबाबदार कार्यकर्ता म्हणून मी तुम्हा सर्वांना आश्वासन देतो की, तुम्ही भाजपाला मत द्या, असा कोणीही तुम्हाला आग्रह करणार नाही. संघशाखेत तुमची जी रगड होईल, त्याने तुमचे स्वार्थाचे, परस्परांना बोचणारे अनेक कोपरे घासून जातील. तुमचा मोठेपणाचा अहंकारही कमी होईल. अरेच्या, आपण सर्वांसारखेच आहोत की, असा ठसा अंत:करणावर बिंबेल. ज्यात कसलाही स्वार्थ नाही, असेही काम करण्याची प्रेरणा जागू शकेल. अर्ध्या खाकी चड्डीचा हा प्रभाव आहे. निर्जीव वस्तूही मनावर कसा परिणाम करते, हे आचार्य विनोबांच्या 'मधुकर' या पुस्तकात तपस्वी आणि शिकारी इंद्र यांची जी कथा आली आहे, त्यावरून आपणास कळून येईल. विस्तारभयास्तव ती कथा येथे मी देत नाही. मी प्रथम 'तरुण भारता'चा मुख्य संपादक झालो, तेव्हा एका इंग्रजी दैनिकाच्या मान्यवर मुख्य संपादकाने मला प्रश्न केला होता की, ''बाबूराव, तुम्ही अजूनही खाकी चड्डी घालता काय? मी म्हणालो, ''रोजच घालतो''. त्यांना सुचवायचे होते की, या 'मोठ्या' पदावर गेल्यावर ती अर्धी चड्डी घालणे योग्य नाही. त्यांच्या मनीचा भाव ओळखून मीच त्यांना म्हणालो, ''खाकी चड्डी घातल्याचे खूप फायदे आहेत. सर्वात मोठा लाभ हा की, आपला अहंकार संपतो. हा झाला आध्यात्मिक लाभ. आणि भौतिक लाभ असा की, आपले वय दहा वर्षांनी कमी झाल्यासारखे वाटून आपण अधिक सक्रिय व अधिक निरामय होतो.'' ते बिचारे काय बोलणार! विलासराव देशमुखांनी हे चांगले ठरविले आहे की, सरकारी नोकरीतील संघाच्या स्वयंसेवकांना हुडकून काढायचे. विलासराव, अवश्य हुडकून काढा आणि त्यांना सांगा की, आपल्या सहकाऱ्यांनाही संघात घेऊन जा. आपल्या सरकारचा फायदाच होईल. आणि विलासराव, सरकारी सेवेच्या 'भगवाकरणाने' निदान आपण तरी बुजू नका. कोणता मर्द मराठा भगव्या रंगाचा द्वेष करील? त्याला तर सगळ्याच भगव्या वस्तूंचा अभिमान वाटायला हवा, नाही का?

> संघावरची बंदी उठली. सरकारातील व काँग्रेस पक्षातील अनेक लोकांनाही वाटू लागले की, संघाचे हे वीर आणि धैर्यशील लोक काँग्रेसमध्ये यावेत. मी येथे सरदार पटेलांचे दोन उद्गार उल्लेखित करतो. एक आहे संघावर बंदी घालण्यापूर्वीचा आणि दुसरा संघावरील बंदीच्या काळातला. लखनौला भाषण करताना सरदार पटेल म्हणाले होते की, संघ ही देशभक्तांची संघटना आहे, तिला बळाचा प्रयोग करून संपविता येणार नाही. संघावरील बंदीच्या काळात, तत्कालीन सरसंघचालक श्रीगुरुजी आणि गृहमंत्री सरदार पटेल यांच्यात जो पत्रव्यवहार झाला, त्यात सरदारांनी आपली ही भावना पुनः प्रकट केली.

### फायदाच फायदा

गुजरात सरकारने, सरकारी नोकरांवर, संघात जाण्याच्या बाबतीत जी बंदी होती, ती दूर केली. त्यामुळे, त्या सरकारचा निश्चितच फायदा होईल. राज्याचा मुख्यमंत्री अर्धी चड्डी घालून आला, हे त्याचे केवढे धाडस! सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. आमचे मित्र नितीन गडकरी मंत्री असतानाही विजयादशमीच्या उत्सवात संघाचा गणवेष परिधान करून येत. एवढेच नव्हे तर खुर्चीवर न बसता, स्वयंसेवकांच्या रांगेत उभे राहत. त्यांच्या बरोबर एकसाथ हातपाय खालीवर करीत. याचा फायदाचा फायदा. त्यांचे फोटो प्रसिद्ध होत. राजकारणी माणसाला प्रसिद्धीची आवड असते म्हणतात. विलासराव, तुम्ही जर चड्डी घालून संघाच्या कार्यक्रमात आलात ना, तर मी नक्की सांगतो, भारतातील यच्चयावत् वृत्तपत्रांमध्ये, प्रथम पृष्ठावर, तुमचा भव्य फोटो प्रकाशित होईल. जसा न्हावी मुंडन करताना शबाना आझमीचा आला तसा !


पण विलासराव किंवा दिग्विजयसिंग असे धाडस करावयाचे नाहीत. ते सोनिया गांधींना आवडणार नाही. पण जर का सोनियाजींना हे आवडले, तर मी नक्की सांगतो, आमच्या चड्डीपेक्षाही विलासराव-दिग्विजयसिंगादींच्या चड्डीची इस्त्री अधिक कडक राहील!

माझे असेही मत झाले आहे की, केशूभाई पटेलांच्या सरकारच्या निर्णयाचा काँग्रेसला फायदाच झाला. काँग्रेसला काही कार्यक्रमच नव्हता. तो त्यांना या निमित्ताने मिळाला. आणि मुख्य म्हणजे सोनियाजी रस्त्याने 'वंदे मातरम्'चा उद्घोष करीत चालत गेल्या. काँग्रेसवाले १९४७ पासूनच 'वंदे मातरम्' विसरत चालले होते. सोनिया गांधींनी त्याचे स्मरण करून दिले हे फार चांगले झाले. 'वंदे मातरम्' चा अर्थ त्यांनी ध्यानात घेतला असेल की नाही, हे त्याच सांगू शकतील. पण अर्थ मनात असो की नसो, मंत्राच्या नुसत्या जपानेही कल्याण साधले जाते, असे म्हणतात. अजामिळाने आपल्या आवडत्या पुत्राचे नाव 'नारायण' ठेवले आणि त्याला तो वारंवार हाक मारू लागला तर त्या नामग्रहणाने अजामिळाचाही उद्धार झाला, अशी पुराणात कथा आहे. गेल्या वर्षी डॉ. मुरलीमनोहर जोशींच्या मंत्रालयाने एका सरकारी कार्यक्रमात सरस्वती वंदना म्हटली तर केवढा गहजब झाला होता! आणि उत्तर प्रदेश सरकारने शाळांमध्ये 'वंदे मातरम' म्हणावे असा आदेश काढला तर सर्व सेक्युलर मुस्लिम बंधूंनी केवढा आरडाओरडा केला होता. या आरडाओरड्याला काँग्रेसचेही समर्थन असलेच पाहिजे. कारण, तो सेक्युलर मुस्लिमांचा आक्रोश होता. सोनियाजींनी, यावेळी तरी त्या आक्रोशाची पर्वा न करता 'वंदे मातरम' चा घोष करीत सत्याग्रह केला, याबद्दल त्यांची किती म्हणून थोरवी गावी? सर्व काँग्रेसजनांना माझे आवाहन आहे की, या निमित्ताने तरी आपण सडकेवर या, वंदे मातरम्चा जयघोष करा आणि त्या जयघोषात गुजरात सरकारचा आणि संघाचाही निषेध करा. तुमच्या निखळ नकारात्मकतेला निदान सकारात्मकतेची थोडी किनार तरी प्राप्त होईल. ●●

***पूर्वप्रकाशित : (दि. ४-२-२०००)***
***(लाखे प्रकाशन, नागपूरने प्रकाशित केलेल्या मा. गो. वैद्य यांच्या 'ठेवणीतले संचित' या पुस्तकावरून साभार)***

---

# शब्दसरिता 69



**उभी विधाने :–** 1) क्षेत्रफळानुसार महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा 2) मुघल साम्राज्याचा संस्थापक 3) भारतातील अणूविज्ञानाचे शिल्पकार 4) शिक्षणाची गंगा गावागावात पोहोचविणारे आधुनिक भगीरथ भाऊराव पाटील यांना संत गाडगे महाराज यांनी दिलेली उपाधि 5) हैदाबाद शहरात असलेली जगप्रसिद्ध वास्तु 6) हिंदीत शहाणा 7) रामायणातील एक श्रीरामपुत्र 8) तामिळनाडूच्या एक दिवंगत महिला मुख्यमंत्री 12) अनिल कपूर, माधुरी दीक्षितच्या या चित्रपटात एक गीत लता मंगेशकर यांच्यावर चित्रित करण्यात आले होते 14) जगातील सर्वात गरीब देश 16) भारतीय संसदेतील एक ज्येष्ठ सभागृह, यातील 12 सभासदांची निवड विविध क्षेत्रातील मान्यवरांतून राष्ट्रपती करतात, अन्य सभासदांची निवड राज्य व केन्द्रशासित प्रदेश विधीमंडळ करतात 17) हिंदीत जीभ 19) शालेय अभ्यासक्रमातील एक विषय 21) भाजीत टाकण्याचा मसाला 25) भारताचे हे अर्थमंत्री पुढे पंतप्रधान झाले 27) हिंदू परंपरेत वर्णित मानवी जीवनातील चार आश्रमांपैकी एक 28) संपूर्ण भारतीय बनावटीची 12 डब्यांची पहिली मेधा लोकल ट्रेन या शहरात सुरु करण्यात आली 31) झोपडी 34) चंद्रपूर जवळ असलेला महाराष्ट्रातील एक व्याघ्रप्रकल्प 35) पुणे जिल्ह्यात मुठा नदीवर बांधलेले मातीचे धरण 36) अंगावरील कोमल केस 38) रामायणातील विद्वान खलनायक 39) कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे संत 41) अगदी थोडे, किंचित 43) विश्व, सृष्टी 45) पाकिस्तानच्या पंजाब प्रांताची राजधानी 46) हॉलिवुड चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणारी भारतीय अभिनेत्री 49) मान्यवर व्यक्तिच्या स्मरणार्थ उभारलेली धातुची मुर्ती 50) असंमत, कबूल न होणे 52) जीव न घेण्याबद्दल दिलेले वचन 53) रामायणात श्रीरामांनी या ठिकाणाहून आपले सैन्य लंकेत नेण्यासाठी राम सेतुचे निर्माण केले 55) ग्लानी, मरगळ 56) सिद्धीस गेलेले, निष्पन्न, फळ 58) मराठीतील सर्वश्रेष्ठ निसर्गकवी त्र्यंबक बापुजी ठोंबरे यांचे टोपणनाव 59) जमिनीत असलेले पाणी 60) मृदू, मुलायम 61) महाभारतातील एक पांडव 64) जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश 65) कपाळ ●

**आडवी विधाने :–** 1) जनसेवेचे व्रत घेतलेल्या होळकर घराण्याच्या पुण्यश्लोक महाराणी 6) पंजाब राज्यातून वाहणाऱ्या पाच नद्यांपैकी सर्वात मोठी नदी 9) 2018 ची फिफा वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा या देशात आयोजित करण्यात आली होती 10) वयोमान, आयुष्याची होऊन गेलेली वर्षे 11) या राज्याची राजधानी इम्फाल आहे. 13) माजी पंतप्रधान राजीव गांधीजींच्या समाधीस्थळाचे नाव 15) मोर्चातील घोषणा 17) सन् 1605–1627 दरम्यान या चौथ्या मुगल बादशाहचे भारतावर शासन होते 18) 'आधी लगीन कोंढाण्याचे....' असे म्हणून हौतात्म्य पत्करणारा छत्रपती शिवरायांचा सेनापती 20) लहान शहर 22) प्रचलित शासकाविरुद्ध बंड करणारा (हिंदी) 23) लोकांचा कोलाहल 24) सारखेपणा 26) फळाच्या आतील रसाळ भाग 27) माकड, मर्कट 29) अंत:करणाची जागृत स्थिती 30) इस्लामी कालगणनेनुसार येणारा 9 वा महिना 32) भारताचा राष्ट्रीय पक्षी 33) भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती 37) श्रीविष्णुचा एक अवतार 39) अंतराळ संशोधन करणारी अमेरिकन संस्था नॅशनल एरोनॉटिक्स ॲन्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशनचे संक्षिप्त उच्चारण 40) माणसाच्या डोक्याची कवटी 42) जंगलात उत्पन्न झालेले 44) ....... युसुफजाई, 2014 मध्ये शांततेचा नोबल पुरस्काराने गौरविण्यात आलेली पाकिस्तानी मुलगी 47) भारताचे पाचवे पंतप्रधान 48) गलबतावरील दिशा ओळखण्याचे यंत्र 49) बाल श्रीकृष्णाला मारण्यासाठी सुंदर स्त्रीचे रूप घेऊन आलेली राक्षसी 51) बुद्धिबळाच्या पटावरील एक महत्वाची सोंगटी 53) रात्र (हिंदी) 54) पंजाब राज्यातील एक प्रमुख शहर 57) संतसंप्रदायातील एक संत 58) इंडोनेशिया सारख्या मुस्लीम राष्ट्रात हिंदू संस्कृती टिकवून ठेवणारा प्रदेश 59) अतिरिक्त जमिनीचे दान करणे 61) कुबेराची राजधानी 62) वाईट सवय 63) स्वातंत्र्यपूर्व काळात अमृतसर येथे जालियानवाला हत्याकांड घडवून आणणारा इंग्रज ब्रिगेडियर 65) काकुळतीने केलेली विनंती 66) बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक

**मागील शब्दसरिताचे उत्तर**



---

## विश्व

**कुलदीप सिंह**

जर्मनीच्या गृहमंत्रालयाने हॅम्बर्गस्थित इस्लामिक सेंटर असोसिएशन आणि त्यांच्या सर्व समर्थक संस्थांवर बंदी घातली आहे. याला जर्मनीच्या गृहमंत्रालयाने दुजोरा दिला असून इस्लामिक सेंटर देशात जिहादी इस्लामिक कट्टरतावादाला चालना देण्यासाठी सातत्याने काम करीत असल्याचे स्पष्ट केले. याबाबत २५ जुलै रोजी एक निवेदन जारी करताना गृह मंत्रालयाने म्हटले आहे की, न्यायालयाच्या आदेशानुसार अधिकाऱ्यांनी ८ जर्मन राज्यांतील इस्लामिक सेंटरच्या ५३ परिसरांवर छापेमारी केली. छापा टाकण्यात आलेल्या ठिकाणांमध्ये हॅम्बुर्ग येथील इस्लामिक सेंटर (आयझेडएच) तसेच, जर्मनीतील सर्वात जुन्या मशिदींपैकी एक असलेली निळी मशीद, तसेच फ्रँकफर्ट, म्युनिक आणि बर्लिनमधील त्यांच्या उप-समूहांवरही प्रतिबंध घालण्यात आले आहेत. जर्मनीच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशातील चार शिया मशिदी लवकरच बंद करण्यात येणार आहेत.

५५ मालमत्तांची चौकशी केल्यानंतर जे भक्कम पुरावे समोर आले त्या आधारावर आम्ही इस्लामिक सेंटर असोसिएशनवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला, असे




जर्मनीच्या गृहमंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. गृह मंत्रालयाने सांगितले की, इराणमधील स्थलांतरितांनी १९५० मध्ये इस्लामिक सेंटर हॅम्बुर्ग (आयझेडएच) ची स्थापना केली होती. या संघटनेवर जर्मनीतील शिया मुस्लिमांवर आपला अजेंडा राबविण्याचा आणि शिया अतिरेकी संघटना हिजबुल्लाहला पाठिंबा देण्याचा आरोप आहे. ही संस्था हॅम्बुर्गमधील इमाम अली मशिदीचे व्यवस्थापन करते, जी जर्मनीतील सर्वात जुन्या मशिदींपैकी एक आहे. ही मशीद जर्मनीमध्ये तिच्या निळ्या रंगाच्या भिंतींसाठी ओळखली जाते, म्हणूनच या मशिदीला निळी मशीद असेही म्हणतात.

### जर्मनीत इस्लामी राजवटीसाठी कार्य

जर्मनीच्या गृहमंत्री नॅन्सी फेसर यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, 'आज आम्ही इस्लामिस्चेस झेंट्रम हॅम्बुर्गवर (आयझेडएच) बंदी घातली आहे, ही संघटना जर्मनीमध्ये कट्टर इस्लामिक विचारसरणीचा प्रचार करीत असल्याचे आढळून आले आहे.' ही संघटना इराणच्या सर्वोच्च नेत्याचे प्यादे म्हणून काम करीत होती आणि ती जर्मनीमध्ये इस्लामिक क्रांती आणण्यास इच्छुक होती, जेणेकरून जर्मनीत इस्लामिक शासन लागू करता येऊ शकेल, असे जर्मनीच्या गृह मंत्रालयाने सांगितले. दरम्यान, जर्मन सरकारने इस्लामी कट्टरवाद्यांना जबरदस्त दणका दिल्याने इराणने प्रचंड थयथयाट केला असून राजधानी तेहरान येथील जर्मन राजदूताला तातडीने पाचारण करून तीव्र नाराजी व्यक्त केली. इस्लामिक कट्टरतावादाला चालना देण्यासाठी लेबनॉनस्थित हिजबुल्लाहला पाठिंबा दिल्याने इस्लामिक देश इराणच्या अनेक धार्मिक संस्थांवर जर्मन सरकारने बंदी घातली आहे. यामुळे संतप्त होत इराणने जर्मन राजदूत हंस उडो मुझेल यांना पाचारण केले. ●●

> ५५ मालमत्तांची चौकशी केल्यानंतर जे भक्कम पुरावे समोर आले त्या आधारावर आम्ही इस्लामिक सेंटर असोसिएशनवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला, असे जर्मनीच्या गृहमंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

***(पांचजन्यवरून साभार)***

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्रावण मासानिमित्त औंढ्यातील नागनाथ मंदिर संस्थानकडून जय्यत तयारी

## पहिल्याच सोमवारी एक लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ४ ऑगस्ट**

देशातील आठवे ज्योर्तिलिंग असलेल्या औंढा नागनाथ येथे सोमवारपासून श्राणव महिना सुरू होत असल्यामुळे मंदिर संस्थानाकडून जय्यत तयारी करण्यात आली असून पहिल्याच सोमवारी एक लाख भाविक दर्शनासाठी येणार असल्याचा अंदाज व्यक्त केल्या जात आहे.

सर्व भाविक भक्त, पर्यटक यांच्यासाठीसुलभ दर्शन व्यवस्थेला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आले. येथील नागनाथ संस्थान सभागृहामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक जी श्रीधर, पदसिद्ध अध्यक्ष तहसीलदार हरीश गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रावण मासानिमित्त विशेष उपाययोजना करण्यासाठी आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये मंदिर प्रशासनाकडून सुलभ दर्शन व्यवस्था, परिसर स्वच्छता, भाविकांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी, पश्चिम द्वाराकडून दर्शन रांग, भाविकांसाठी भोजनालय व अल्पोपहारासाठी खिचडी, विद्युत रोषनाई, सीसीटीव्ही, कॅमेरे, पोलीस कर्मचारी, स्वयंसेवक आदी उपायोजना करण्यात आल्या. यामध्ये भाविकांसाठी श्री नागेश्वर नागनाथचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आली आहे.

दि ५ ऑगस्ट रोजी पहिला श्रावण सोमवार असल्याने रात्री बारा वाजून ३० मिनिटांनी संस्थान अध्यक्ष तहसीलदार हरीश गाडे सपत्नीक नागेश्वर नागनाथाची महापूजा, रुद्राभिषेक करून रात्री दोन वाजता पासून भाविकांसाठी मंदिर खुले करण्यात येणार आहे. यावर्षी श्रावण महिन्यामध्ये पाच श्रावणी सोमवार असून सुट्टीचे दिवस नागपंचमी या काळात भाविकांची विशेष गर्दी होत असते. यासाठी मंदिर परिसरात ३२ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आली असून, परिसर स्वच्छतेस विशेष महत्त्व दिले जाणार आहे. मंदिरामध्ये पोलीस चौकी, आरोग्य सुविधा आदी बाबत विशेष विभाग उघडण्यात आली असून मंदिरात गाभाऱ्यामध्ये दर्शनासाठी कमीत कमी तीन मिनिटांचा अवधी लागणार असल्याने विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

यामध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी दोन, पोलीस निरीक्षक सहा, पोलीस अधिकारी २१, १२० पोलीस कर्मचारी, ४० महिला पोलीस, १२० होमगार्ड, एक दंगल नियंत्रण पथक, एक बॉम्बशोधक व नाशक पथक, राज्य राखीव पोलीस दलाची एक प्लॅटून, अशा पोलीस बंदोबस्तासह मंदिर संस्थानचे ८० कर्मचारी ४० स्वयंसेवक सुलभ दर्शन व्यवस्थेसाठी परिश्रम घेणार आहेत. विशेष अतिथींसाठी विशेष दर्शन व्यवस्था ठेवण्यात आली असून कोणत्याही भाविकांना तसेच पर्यटकांना कुठलीही समस्या उद्भवल्यास मंदिर प्रशासन किंवा पोलीस प्रशासनाची संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वकील संघाचे अध्यक्ष अॅड वाबळे, संस्थान अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, गणेश उदगिरे, कृष्णा पाटील, नागेश माने, बबन सोनवणे, आदींसह महसूल प्रशासनाचे नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव व दोन विशेष कर्मचारी मंदिर परिसरात विशेष लक्ष ठेवून राहणार आहेत. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ हरण, वीज वितरण कंपनीचे उपाभियंता मेश्राम, बांधकाम उपविभागाचे उपअभियंता, राज्य परिवहन महामंडळाचे वाहतूक नियंत्रण हळवे, शिवाजी बांगर, बाळासाहेब पांचाळ, नगरपंचायत चे सुनील वसमतकर, विजय महामुने आदी सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते पोलीस निरीक्षक गणेश राहिरे यांनी श्रावण मास निर्विघ्न पार पाडण्यासाठी व भाविकांची दर्शन व्यवस्था सुलभ होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. सोबतच कुठलाही अनुचित प्रकारात दोषी आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल असा गर्भित इशारा पोलिस अधीक्षक जी श्रीधर यांनी दिला.

# शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ घ्यावा– अप्पर जिल्हाधिकारी

## महसुल पंधरवाड्यानिमित्त शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

राज्य शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना या व अशा अनेक महत्वाकांक्षी योजना सुरु केलेल्या आहेत. या सर्व योजनेचा लाभ जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी केले.

महसूल पंधरवाड्याच्या निमित्ताने येथील आदर्श महाविद्यालयात आज मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांना व्हावा यासाठी आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी उपस्थित होते. यावेळी समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, तहसीलदार नवनाथ वगवाड, आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. परदेशी म्हणाले, सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थ स्थळांना जाऊन मन:शांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी राज्यातील सर्व धर्मातील ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु केली आहे. या योजनेचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे तातडीने उपलब्ध व्हावीत व त्याची माहिती होण्यासाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यासह शासनाच्या अनेक महत्वपूर्ण योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा उद्देश विशद करुन योजनेची माहिती दिली.

यावेळी समाज कल्याण कार्यालयाचे सिध्दार्थ गोवंदे, नागनाथ नकाते, सुनिल वडकुते, प्रा. जी. पी. चव्हाण, सुलोचना ढोने, वर्षा घुगे, नितिन राठोड, विजय सोनटक्के, विनोद कागने, विश्वनाथ बिहाडे, नितीन खरात, निलेश सुदुलवार यांच्यासह नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज येथील आदर्श महाविद्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणीही महसूल पंधरवाड्यानिमित्त विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करुन मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेची माहिती देण्यात आली. या शिबिरामध्ये हिंगोली जिल्ह्यातील १२३७ नागरिक, लाभार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये हिंगोली ३०८, कळमनुरी १८१, वसमत २७३, औंढा नागनाथ १९७, सेनगाव तालुक्यातील २७८ जणांचा समावेश आहे. शिवाजी महाविद्यालयातही महसुल पंधरवाड्यानिमित्त शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्यावतीने रक्तदान शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

येथील संत निरंकारी चॅरीटेबल फाऊंडेशनच्या वतीने रविवारी ता. ४ सकाळी १० ते सायंकाळी पाच यावेळेत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्याातत आले होते.

मागील अनेक वर्षापासून रक्तदान शिबीराचे आयोजन फाऊंडेशनच्यावतीने करण्यात येते. येथील संत निरंकारी भवनात शिबीराचे उदघाटन अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नितीन तडस, नेत्र शल्यचिकीत्सक डॉ. किशन लखमावार, शिरीष गुंडेवार, बाजार समितीचे संचालक उत्तमराव बावळे, रत्नाकर महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबीरात जास्तीत जास्त रक्तदान होण्यासाठी शनिवारी ता. ३ शहरातून रॅली काढण्यात आली होती. यावेळी कन्हैयालाल नेनवाणी, लालचंद नेनवाणी, पंढरीनाथ सवनेकर, संजय जाधव, सुदर्शन नेनवाणी, राजू लोखंडे, ओम नेनवाणी, नानकराम नेनवाणी, सुनील नेनवाणी, राजू आठवले, संदीप नायक, दीपक नेनवाणी, अनिल नेनवाणी, शंतनू मानमोठे, सुशीला आठवले, रीना मानमोठे, तन्वी नेनवाणी, ममता नेनवाणी, पुजा नेनवाणी, सरीता नेनवाणी, नम्रता नेनवाणी, सिमरन नेनवाणी यांनी परिश्रम घेतले. या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसार मिळाला असून अनेक रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले.



**हिंगोली– शहरातील मधुरदीप पॅलेस येथे रविवारी काँग्रेसच्या जिल्हा कार्यकारणी, बुथ समिती तसेच बी एल ए ची आढावा बैठक पार पडली. यावेळी आ. डॉ प्रज्ञा सातव, लोकसभा प्रभारी अॅड सचिन नाईक, माजी नगराध्यक्ष सुधीर अप्पा सराफ, काँग्रेसचे नेते प्रकाश थोरात, उपाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, अनिल नेनवाणी, माजी नगरसेवक माबुद बागवान, विनायक देशमुख, माजी नगरसेवक मुजीब पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहरातून रॅली काढीत जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज महसुल पंधरवाड्यानिमित्त कृषी मार्गदर्शन

हिंगोली– कृषी विज्ञान केंद्र व महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने महसूल पंधरवडा निमित्त कृषी मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रमाचे तोंडापूर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात दि ५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर हे उपस्थित राहणार आहेत तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार हे राहणार आहेत. तर अप्पर जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख पी. पी. शेळके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम हे राहणार आहेत. तर मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे कृषी विद्या विशेषज्ञ राजेश भालेराव, उद्यान विद्या विशेषज्ञ अनिल ओळंबे, पीक संरक्षण, कीटकशास्त्र विशेषज्ञ अजयकुमार सुगावे, गृह विज्ञान विशेषज्ञ रोहिणी शिंदे, मृदाशास्त्र विशेषज्ञ साईनाथ खरात, कृषी विस्तार विशेषज्ञ डॉ.अतुल मुराई, पशुविज्ञान कार्यक्रम सहाय्यक डॉ.कैलास गीते हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास जिल्ह्यातील शेतकरी नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन व कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

### सुट्टीच्या दिवशीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे मदत कक्ष सुरू

हिंगोली– महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य, पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि त्यांची कुटुंबातील निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी २१ ते ६५ वयोगटातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर तालुका कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑनलाईन अर्जाची छानणी करून पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी अद्यावत करण्याचे काम सुरु आहे. पात्र लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळवून देण्यासाठी शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशीही तालुका कक्ष सुरू ठेवण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने सर्व तालुका सनियंत्रण अधिकारी तथा तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

### मोठा पाऊस नसल्यामुळे धरणे कोरडीच

हिंगोली– जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून रिमझिम तर कधी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. पिकांसाठी सध्या हा पाऊस उपयोगी आहे मात्र जिल्ह्यातील इसापूर, येलदरी, सिध्देश्वर धरणात अजूनही पुर्णपणे भरले नाही. दरवर्षी जुलै महिन्यात ही धरणे पूर्णपणे भरतात परंतु यावेळी पावसाची रिपरिप चालु आहे परंतु मोठा पाऊस अद्यापही पडला नसल्याने ओढे नद्या, नाले दुथडी भरून वाहतांना दिसले नाही. कयाधू नदीलाही पाणी नाही. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होणार आहे.

# आरक्षण बचाव समितीकडून अॅड. प्रकाश आंबेडकरांचे औंढ्यात जंगी स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ४ ऑगस्ट**

शनिवारी सायंकाळी वंचीत बहुजन आघाडीचे अध्यक्ष अॅड प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण बचाव रॅलीचे आगमन झाल्यानंतर औंढ्यात आरक्षण बचाव समितीच्यावतीने जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. जेसीबी द्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. ढोल ताशाच्या गजरात अनेक वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते त्यांच्या स्वागतासाठी बस स्थानक परिसरात होते स्वागत झाल्याच्या नंतर मंदिर परिसरात छोटे खाली सभा घेण्यात आली. अहिल्याबाई होळकर आणि संत सावता माळी यांना पुष्पहार अर्पण करून अभिनंदन केले. यावेळी मार्गदर्शन करताना तुमचा पक्ष हा ओबीसीवादी असायला पाहिजेत, नेत्यांना डोक्यावर न घेता खांद्यावर ठेवा आणि येत्या विधानसभा निवडणुकीत १०० पेक्षा जास्त आमदार ओबीसीवादी निवडून द्या नाहीतर ही मंडळी आरक्षणाला धोका दिल्याशिवाय राहणार नाहीत असे आवाहन केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संजय दराडे यांनी उपस्थित ओबीसी समाजाचे आभार व्यक्त करून ओबीसी समाजाने एक संघ राहण्याचे आवाहन केले. यावेळी ओबीसी समाजाचे अनेक कार्यकर्ते सभेला उपस्थित होते.

# वसमतमध्ये माजी नगरसेवकासह अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ ऑगस्ट**

आमदार राजु भैय्या नवघरे यांच्या कार्य कर्तृत्वावर विश्वास ठेऊन माझी नगरसेवक शमीम सिद्दिकी व असंख्य मुस्लिम बांधवांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा गट)पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचे पक्षात राजू भैय्या नवघरे यांनी स्वागत करून अभिनंदन केले व पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या पक्षप्रवेश मेळाव्याचे अध्यक्ष म्हणुन शबिर अहेमद कुरेशी होते. यावेळी प्रमुख पाहुणे कृषी उत्पन्न बाजार समिती वसमत सभापती तानाजी बेंडे पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीउपसभापती सचिन भोसले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष त्र्यंबक कदम,शहराध्यक्ष मुजीब पठाण, कार्याध्यक्ष अमजद खान उर्फ नंमू, मोबीन भाई, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष मनोज भालेराव, कृषी उत्पन्न बाजार समिती जवळा बाजार उपसभापती बाबाराव राखोंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती वसमत माजी संचालक जिजामामा हरणे, सेवा प्रतिष्ठान अध्यक्ष बालूमामा ढोरे, प्रा. रामचंद्र भिसे, लक्ष्मीकांत नवघरे, सय्यद इम्रान अली, बाबासाहेब गायकवाड, गजानन ढोरे, प्रविण टोंपे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष माजिद इनामदार, कोषाध्यक्ष नवीद अहेमद यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दोन महिन्यांपासून रास्त भाव दुकानाच्या लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याच्या तक्रारी

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ ऑगस्ट**

येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडून लाभार्थ्यांना दोन-तीन महिने पासून राशन धान्य मिळत नसल्याच्या तक्रारी येत असून सणासुदीचे दिवस तोंडावर असताना स्वस्त धान्य दुकानदारांकडून धान्याबाबत नकारघंटा वाजवली जात आहे.

ज्या वेळेत दुकाने सुरू ठेवण्याचे आदेश आहेत. त्याला तिलांजली देऊन आपल्या सोयीप्रमाणे दुकाने उघडण्याचे मनमानी धोरण राबवले जात आहे. परिणामी, दुकानदारांची वाट पाहण्याची वेळ सामान्य लाभार्थीवर आली आहे. रिकाम्या हाती परत गेलेल्या लाभार्थ्यांनी दुकानदारांशी संपर्क साधल्यास धान्य आलेच नाही. पुढच्या आठवड्यात येईल अशी उडवा उडवीचे उत्तरेही देऊन ग्राहकांना माघारी पाठवले जात असल्याच्या तक्रारी आहेत. स्वस्त धान्य दुकानाच्या या सावळ्या गोंधळावर महसूल विभागाचे अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

ऐन सणासुदीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंच्या दरात प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे सर्वसामान्यांना चढ्या दराने जीवनावश्यक वस्तू खरेदी कराव्या लागत आहेत. या अडचणींमध्ये स्वस्त धान्य दुकानांच्या अनागोंदी कारभाराची भर पडत आहे. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे नागरिकांच्या सुविधेसाठी शहरातील स्वस्त धान्य दुकाने सकाळी चार तास दुपारनंतर चार तास तसेच ज्या ठिकाणी आठवडे बाजार आहे तेथे पूर्णवेळ दुकाने खुली ठेवून लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करण्याचा नियम आहे. मात्र, शहरातील बहुतांश रेशन दुकानदार नागरिकांच्या अडचणी वा कोणत्याही कारवाईची भीती बाळगता सवडीनुसार दुकाने सुरू ठेवत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहे. काही दुकानदार दोन-तीन महिने लाभार्थ्यांना राशन धान्य देण्यासाठी टाळाटाळ करत आहे. याबाबत शहरातील आमच्या प्रतिनिधींनी पाहणी केली असता बहुतांश स्वस्त धान्य दुकानांचा अनियमित वेळेचा कारभार समोर आला. दुकानदारांच्या या मनमानीमुळे नागरिकांना धान्य मिळण्यासाठी दुकानासमोर तासन्तास ताटकळत राहण्याची वेळ आल्याचे दिसले. दुकान कधी सुरू होणार याची माहिती नसल्याने लाभार्थ्यांना हक्काचे धान्य मिळविण्यासाठी या दुकानांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो.

अनियमिततेचा गैरप्रकारांसाठी फायदा

धान्यदुकानदारांना, वेळेत धान्य मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्याचा परिणाम पुरवठा विभागाकडूनच धान्यच आले नसल्याची उत्तरे लाभार्थ्यांना दिली जातात. जेव्हा धान्य येते तेव्हा लाभार्थी नसतात. नागरिकांकडून धान्य आल्याबाबत दुकानदारांकडे अनेकदा विचारणा केली जाते. मात्र, या दुकानदारांकडून या महिन्याचे धान्य आले नाही, यंदा कमी धान्य प्राप्त झाले, पुढील आठवड्यात चक्कर मारा, अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात येतात. असे प्रकार गैरप्रकारांसाठी पोषक ठरत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

# संत शिरोमणि सावता महाराज पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७२९ व्या संजिवन समाधी सोहळा केमिस्ट भवन येथे शहर व जिल्ह्यातील सकल माळी समाज बांधवांच्या वतीने संपन्न झाला.

यानिमित्त भागवताचार्य ह.भ.प.सागर महाराज पारिसकर,वाशिम यांचे प्रबोधनपर किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी त्यांनी संत सावता महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. यावेळी समाज बांधवांनी एकत्र येऊन हिंगोली मध्ये संत सावता महाराज यांचे भव्य मंदिर निर्माण करण्याचा संकल्प केला. या सामाजिक व धार्मिक कार्यक्रम करीता एक विश्वस्त मंडळ स्थापन करण्यात आले. चंदू लव्हाळे, केशवराव जांबुतकर, संदीप काळे, बालाजी सोनुने, लिंबाजी थोरे, बाबूराव पारसकर, शाम राऊत,शामजावळे,विठ्ठल सोनुने, शंकरराव देवकर, जगदीश काळे, लखन गिराम, अशोक माने, सुभाषराव कदम, शिवाजी पारसकर, सुरेश सोनुने, गजानन वैद्य, श्रीरंग ईगंळे, ज्ञानोबाराव गव्हाणे, अशोक बंडे, सुभाष पोपळघट, विकास माने, गजानन पारिसकर, विठ्ठल डोके, गजानन शिंगारे, शिवाजी शिंदे, काशिनाथ पारसकर, पवन मगर, धरमदास बोराटे, बापूराव काळे, रामेश्वर लुटे, कैलासराव धामणे, अशोक धामणे, मारुती बोबडे, केशव सोनटक्के आदींसह माळी समाजबांधव उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अक्षरओळख नसलेल्या पालकांचा मुलगा झाला पीएसआय

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ४ ऑगस्ट -**

आई-वडील दोघेही निरक्षर, कोरडवाहू दोन एकर शेती त्यामुळे मजुरी हाच मुख्य व्यवसाय; पण मुले शिकली पाहिजेत, अशी पालकांची जिद्द, आश्रम शाळेमध्ये शालेय शिक्षण पुर्ण करुन , डी. एड. चे शिक्षण पूर्ण झाल्यावर 'टीईटी'च्या तयारीसाठी लातूरला आलेल्या विठ्ठल राठोड यांना इथे स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण झाली. त्यात चारवेळा अपयश आल्यावरही जिद्द सोडली नाही. संयम ठेवून अभ्यासात सातत्य ठेवल्याने पाचव्या प्रयत्नात तांड्यावरचा हा मुलगा 'पीएसआय' झाला.

सावळी तांडा येथील रहिवासी असलेले विठ्ठल वसंतराव राठोड. आई-वडील मजुरी, शेळ्या सांभाळून घरगाडा चालवितात. दोन मुले, एक मुलगी असे छोटंसं कुटंब, मोठा मुलगा विठ्ठल याचे पूर्ण शिक्षण आश्रमशाळेत झाले. उदगीरच्या आश्रमशाळेत अकरावी, बारावी झाल्यावर डी.एड. केले. शिक्षक व्हायचे म्हणून 'टीईटी'ची तयारी करण्यासाठी ८ वर्षांपूर्वी गावातून लातूरला आलेल्या विठ्ठल राठोड यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण झाली. मग काय 'टीईटी'चा नाद सोडला अन् स्पर्धा

**योग्य मार्गदर्शक, जिद्द, संयम, अभ्यासात सातत्य महत्त्वाचे**

स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना संयम महत्त्वाचा आहे. अपयश आले म्हणून खचून न जाता अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. योग्य मार्गदर्शन मिळाले की मन एकाग्र राहते. सतत प्रयत्न करीत राहावेत. मला चारवेळा अपयश आले. वर्ष २०१८ मध्ये गुप्त वार्ता अधिकारी म्हणून निवड झाली; पण उंची मायक्रो २ मध्ये कमी पडल्याने अपयश आले. तरीही खचून न जाता मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या मार्गदर्शनात अभ्यासात सातत्य ठेवले.



डी.एड. असतानाही शिक्षक पदासाठी कुठलीच परीक्षा दिली नाही. जे लक्ष्य ठेवले त्यात यश मिळाले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संयम, अभ्यासात सातत्य ठेवावे, असा सल्ला पीएसआय विठ्ठल राठोड यांनी दिला आहे.परीक्षेच्या अभ्यासात मन रमले. तब्बल तीन वेळा पूर्व परीक्षेत अपयश आले. चौथ्यावेळी मुख्य परीक्षा पास झाल्यावर मुलाखतीत अनुत्तीर्ण झाले. तरीही संयम ठेवला. पाचव्यांदा यश आले, निकाल जाहीर होताच मित्रपरिवार अन् ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव सुरू केला. अक्षर ओळख नसलेल्या पालकांच्या कौतुकासाठी ग्रामस्थांची रीघ लागली. मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या हस्ते लातूरमध्ये भव्य सत्कार करण्यात आला. मित्रांनीही पेढे भरवून कौतुकाचा वर्षाव केला.

**दोन्ही भावंडे झाले अधिकारी**

अक्षर ओळख नसलेल्या आई-वडिलांनी दोन्ही मुलांना जिद्दीने शिक्षण दिले. मुलांनीही पालकांच्या कष्टाचे चीज केले. लहान मुलगा भरत राठोड हा दहा महिन्यांपूर्वीच कर सहायक झाला.

आता मोठा मुलगा विठ्ठलही पीएसआय झाला, दोघांच्या यशाने कुटुंब आनंदी झाल्याचे वडील वसंतराव राठोड यांनी सांगितले.

**योग्य मार्गदर्शक, जिद्द, संयम, अभ्यासात सातत्य महत्त्वाचे**

स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना संयम महत्त्वाचा आहे. अपयश आले म्हणून खचून न जाता अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. योग्य मार्गदर्शन मिळाले की मन एकाग्र राहते. सतत प्रयत्न करीत राहावेत. मला चारवेळा अपयश आले. वर्ष २०१८ मध्ये गुप्त वार्ता अधिकारी म्हणून निवड झाली; पण उंची मायक्रो २ मध्ये कमी पडल्याने अपयश आले. तरीही खचून न जाता मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या मार्गदर्शनात अभ्यासात सातत्य ठेवले.

डी.एड. असतानाही शिक्षक पदासाठी कुठलीच परीक्षा दिली नाही. जे लक्ष्य ठेवले त्यात यश मिळाले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संयम, अभ्यासात सातत्य ठेवावे, असा सल्ला पीएसआय विठ्ठल राठोड यांनी दिला आहे. परीक्षेच्या अभ्यासात मन रमले. तब्बल तीन वेळा पूर्व परीक्षेत अपयश आले. चौथ्यावेळी मुख्य परीक्षा पास झाल्यावर मुलाखतीत अनुत्तीर्ण झाले. तरीही संयम ठेवला. पाचव्यांदा यश आले, निकाल जाहीर होताच मित्रपरिवार अन् ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव सुरू केला. अक्षर ओळख नसलेल्या पालकांच्या कौतुकासाठी ग्रामस्थांची रीघ लागली. मार्गदर्शक प्रा. सुधीर पोतदार यांच्या हस्ते लातूरमध्ये भव्य सत्कार करण्यात आला. मित्रांनीही पेढे भरवून कौतुकाचा वर्षाव केला.

# चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज माळाकोळी येथे रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचा कीर्तन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ४ ऑगस्ट -**

लिंबोटी धरणाचे प्रणेते ,माजी खासदार, लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर आणि भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि. ५ ऑगस्ट रोजी लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

संतोष नाना तिडके यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा भव्य कीर्तन सोहळा माळाकोळी येथील श्री बाराज्योतिर्लिंग सभा मंडपात दुपारी बारा वाजता सुरू होणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या भव्य कीर्तन सोहळ्यास माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर , भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. प्रनिताताई देवरे - चिखलीकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित ढोक महाराजांच्या कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी भाविक भक्तांनी आणि चिखलीकर यांच्यावर जीव लावणाऱ्या तमाम चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक संतोष नाना तिडके यांनी केले आहे.



# डाक विभागातील विविध कल्याणकारी योजना लाभार्थ्यांना नवसंजीवनी देणाऱ्या आहेत : डॉ. एस.बी.अडकिणे

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड, ४ ऑगस्ट -**

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारतीय डाक नांदेड विभाग यांच्या वतीने आधार नोंदणी , दुरुस्ती व इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक खाते शिबीर आयोजित करण्यात आला होता . यावेळी भारतातील अनेक मौल्यवान घटकांपैकी एक म्हणजे भारतीय डाक विभाग आहे . या विभागाच्या वतीने जनतेसाठी विविध लाभकारी योजना उपलब्ध करून दिले आहेत . या योजना लाभार्थ्यांना नवसंजीवनी ठरणाऱ्या आहेत असे प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे यांनी प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे , प्रमुख उपस्थिती मुखेडचे सब पोस्ट मास्टर संजय भिसे , मंडळ अधिकारी सुरेश कपाटे , प्रमुख मार्गदर्शक नांदेडचे डाक पर्यवेक्षक उमेश पाटील , कुंद्राळाचे पोस्ट मास्टर सुधाकर हिवराळे , तलाठी जी.डी.कल्याणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून डाक पर्यवेक्षक उन्केश्वर कानगुले , उमरदरी पोस्टमन केशव काळे , बहोद्दीन शेख , सुर्यवंशी , बोंडले , आटोळकर हे उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चंद्रकांत एकलारे , सूत्रसंचालन स्वयंसेविका कु.ऋतुजा डाकळे तर आभार प्रदर्शन स्वयंसेविका कु. कोमल टोकलवाड यांनी केले .

## संक्षिप्त वृत्त

### नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने बाळासाहेब आंबेडकर यांचे जंगी स्वागत

**लोहा**-वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे बाळासाहेब आंबेडकर लोहा शहरातील सुर्यवंशी कॉम्पलेक्स येथे नगरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने शहरांच्या परंपरेनुसार खारिक खोबऱ्याचा हार घालून फटाक्यांची आतिषबाजी करून ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी चंद्रसेन पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, , नगरसेवक संदीप दमकोडावार वैभव हाके ,ज्ञानेश्वर भीसे ,लकी फुलवरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### महाडीबीटी पोर्टलवर ६ ऑगस्ट पर्यत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड,** - सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीस चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्य साखळीस चालना देण्यासाठी राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये चालू खरीप हंगामामध्ये निविष्ठा १०० टक्के अनुदानावर पुरविण्यात येणार आहेत. मागील १० दिवसापासुन अर्ज करण्याची प्रक्रिया पोर्टलवर सुरू असुन सद्यस्थितीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अर्जाची संख्या कमी प्रमाणात असल्याने ६ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप शंभर टक्के अनुदानावर लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी करावेत व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

# लोहा नगरपरिषदेने नागरिकांच्या मुलभूत सुविधेची हालगर्जी करु नये : भास्कर पवार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ४ ऑगस्ट -**

शहरात गल्ली बोळातील नाल्या तुंबुन सर्वसमान्याच्या घरात पाणी जात आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आल्याने रस्त्याच्या बाजूने काटेरी झुडपे,गवत ,कचऱ्याचे ढिगारे साचला आहेत.प्रतेक वार्डातील रस्त्यावरील दोन महिने झाले दिवा बत्ती बंद आहे.रस्त्यामध्ये मोठमोठे खड्डे पडले आहेत त्या ठिकाणी मुरूम टाकून खड्डे भरून घ्यावेत या मुलभुत सुविधेची अधिकाऱ्याने हालगर्जी केली तर तहसील कार्यालय समोर जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाजपचे माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार यांनी उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार लोहा यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

लोहा नगरपरिषदेवर प्रशासकीय मंडळ आसल्यामुळे स्थानीक स्वराज्य संस्थेकडे दुर्लक्ष केले जात आहे. या हालगर्जीपणाचा नागरिकांना अनेक आडणीचा सामना करावा लागत आहे.नागरिकांच्या मुलभूत सुविधेकडे दुर्लक्ष केले जात आहे. शहरात रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे पडुन आसल्याने दुर्गंधी पसरत आहे यामुळे शहरात रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे.गल्ली बोळातील रस्त्यावर गवत, काटेरी झुडपे वाढल्यामुळे रात्रीला पायी चालणे जिकिरीचे वाटत आहे.पावसाळ्याचे दिवश आसल्याने प्रत्येक वार्डातील नाल्या तुडुंब भरून सर्वसामान्याच्या घरात पाणी जाऊन घरात राहाणे मुश्कील होतं आहे. नगर परिषदेचे प्रशासकिय अधिकारी आसल्याने उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार लोहा यांनी तात्काळ लक्ष देऊन अंमलबजावणी करावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर जन आंदोलन करण्यात येईल अशी नोंद घेऊन नागरिकांच्या मुलभूत सुविधेची हालगर्जी करु नये असे माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार यांनी उपविभागीय अधिकारी कंधार यांना दिलेल्या निवेदनात नमुद करुन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांना निवेदनाची प्रत देऊन इशारा दिला आहे.

# आ. केराम यांनी केले मयत किशन मुंडे यांच्या कुटूंबियांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ४ ऑगस्ट -**

किनवट तालुक्यातील बोधडी खुर्द येथील शेतकरी, प्रतिष्ठित दुकानदार व युवकाच्या निधनाप्रती संवेदना व्यक्त करत आ. भीमराव केराम यांनी दि ३ ऑगष्ट रोजी बोधडी येथे जाऊन मयतांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले व त्यांना धीर दिला आहे.



किनवट तालुक्यातील मौजे बोधडी खु येथील किशन मुंडे या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.त्यानंतर शेतकरी रामेश्वर गणपत मुंडे यांचा मुलगा पवन मुंडे याचे विजेच्या धक्क्याने दुर्दैवी निधन झाले. दि २२ जुलै रोजी रोजी प्रसिद्ध किराणा दुकानदार निवृत्ती गोविंद दराडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले तर प्रतिष्ठित नागरिक दिगंबर गादेकर हे दीर्घ आजाराने मृत्यु पावले. बोधडी खु येथे लागोपाठ झालेल्या शेतकरी, युवक, प्रसिद्ध दुकानदार तसेच प्रतिष्ठित नागरिकाच्या निधनाप्रती आ. भीमराव केराम यांनी संवेदना व्यक्त केली असून दि ३ ऑगस्ट रोजी त्यांनी भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह बोधडी खु येथे मुंडे, दराडे व गादेकर कुटुंबियांच्या घरी जाऊन सांत्वन केले व त्यांना धीर दिला आहे.यावेळी भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाबुराव केंद्रे,किनवट नगर परिषदचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार करपुडे पाटील, दत्ता आडे, संतोष मरस्कोल्हे बोधडी खु चे उपसरपंच डॉ नामदेव कराड, विवेक केंद्रे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# तालुका गुरू गौरव पुरस्कार वितरित करा; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ४ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात येणारा गुरू गौरव पुरस्कार गेल्या चार वर्षांपासून देण्यात आला नसून तो लवकर वितरीत करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा गटाचे) शहराध्यक्ष मोहम्मद बुराण यांनी निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांच्या कडे केली आहे .

दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरू गौरव पुरस्कार तालुकास्तरावर वितरीत केला जातो. आपले अध्यापन कार्य उत्तमरीत्या पार पाडणारे शिक्षक यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. परंतु २०२० पासून गेली चार वर्षे ह्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले नाही.त्यामुळे तालुका गुरू गौरव पुरस्काराचे वितरण करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष मोहम्मद बुराण, गजानन बोडखे,दिलीप सरोदे, शेख मुखीद जानेमिया ,हनुमंत नटुरे , गजानन बोडके ,शेख इरफान, म.साजिद,म. खाजा शेख हकिम,संतोष दर्शनवाड,ज्ञानेश्वर गायकवाड आदी उपस्थित होते.

# पत्रकारासाठी पंचसूत्री कार्यक्रम घेऊन व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेची वाटचाल : विजय चोरडिया



**तभा वृत्तसेवा**
**कंधार, ४ ऑगस्ट -**

ग्रामीण भागातील पत्रकार सक्षम झाला पाहिजे पत्रकार हे आपल्या हक्कापासून वंचित राहू नये यासाठी पंचसूत्री घटकाचा कार्यक्रम घेऊन पत्रकारांना न्याय देण्यासाठी व्हॉईस ऑफ मिडिया ही संघटना तत्पर असल्याचे प्रतिपादन संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया यांनी कंधार येथील पत्रकार संघाच्या बैठकीत केले.

शिर्डी येथे होणाऱ्या अधिवेशनासंबधी व्हाईस ऑफ मिडिया या संघटनेची बैठक कंधार येथील शासकीय विश्रामगृहावर दिनांक ४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीस व्हाईस ऑफ मिडियाचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया, नांदेड महानगर अध्यक्ष गणेश जोशी जिंतूर चे तालुकाध्यक्ष चव्हाण हे उपस्थित होते. यावेळी चोरडिया व जोशी यांचा कंधार तालुका संघटनेच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पत्रकारांना मार्गदर्शन करताना मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया म्हणाले की, जागतिक पातळीवर पत्रकारासाठी न्याय हक्कासाठी काम करणारी एकमेव संघटना म्हणून व्हाईस ऑफ मिडिया काम करते. पत्रकारासाठी कौशल्य शिक्षण, घरकुल, आरोग्य, निवृत्तीनंतर पेन्शन योजना आदी पत्रकाराच्या प्रश्नासाठी संघटना काम करत आहे.ग्रामीण भागातील पत्रकार सक्षम झाला पाहिजे,छोटे-मोठे उद्योग आदी पंचसूत्री कार्यक्रम घेऊन संघटनेची वाटचाल सुरू आहे. याच व्हाईस ऑफ मीडिया संघटनेच अधिवेशन ३१ ऑगस्ट ल शिर्डी येथे होणार असून या अधिवेशनास कंधार तालुक्यातील संघटनेचे अधिका अधिक पदाधिकारी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.यावेळी गणेश जोशी यांनी ही पत्रकाराना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले तर आभार विनोद तोरणे यांनी मानले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद कदम, संभाजी कांबळे उपस्थित होते तर व्हॉईस ऑफ मीडियाचे कंधार तालुका अध्यक्ष सय्यद हबीब, सचिव विनोद तोरणे ,सहसचिव संतोष कांबळे ,कार्याध्यक्ष माधव गोटमवाड, सदस्य मगदुम परदेसी, ॲड. उमर शेख, प्रा जमील बेग, ॲड. सिद्धार्थ वाघमारे, माधव जाधव आदींची उपस्थिती होती.



**नांदेड- साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे क्रांती सेनाच्यावतीने आयोजित निर्धार मेळावा अनंता लॉन्स येथे पार पडला. यावेळी उद्घाटन प्रसंगी संस्थापक अध्यक्ष तथा अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई सावित्रीबाई साठे, खा. वसंतराव पा. चव्हाण, डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांतीसेनाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा नातू सचिन साठे, आ. माधवराव पा. जवळगावकर, आ. मोहन हंबर्डे, माजी जि.प. अध्यक्ष आनंद गुंडले, राष्ट्रीय सचिव गणेश भगत, रा.काँ. चे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर भिलवंडे, आयोजक जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष विठ्ठल पावडे, आयोजक अण्णाभाउ साठे क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, सतीश कावडे, माधव डोम्पले, उत्तम भाबळे, किशोर कवडीकर, संजय वाघमारे, अविनाश आंबटवाड आदीसह अण्णाभाऊ साठे क्रांती सेना पदाधिकारी व समाज बांधव**

# अचानक कामावरुन कमी करण्यात आल्याने नगर परिषदेविरोधात महिलेचे अमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, ४ ऑगस्ट -**

गेली दहा वर्षापासून भोकर नगरपरिषदेची सेवा करुनही कोणतेही कारण नसताना पूर्व कल्पना न देता अचानक नगरपरिषदेकडून कंत्राटी महिला कर्मचारी महानंदा मोटेकर यांना कामावरुन कमी करण्यात आले असून पालीकेकडे सदर महिला कर्मचार्यांचे चार महिन्याचे मानधन थकित आहे परिणामी सदरील महिलेवर उपासमारीची वेळ आली राहिलेले थकित मानधन देवून पूर्ववत कामावर रूजू करुन घेण्यात यावे याकरिता दि.५ ऑगष्ट पासून महानंदा नागोराव मोटेकर या कंत्राटी महिला कर्मचारी नगरपरिषदेसमोर अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महानंदा मोटेकर मागील दहा वर्षापासून भोकर नगरपालीकेत कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता कामावरुन कमी करण्यात आले त्यांचेवर उपासमारीची वेळ आली भोकर नगरपालीकेने महात्मा फूले सेवा भावी संस्था आष्टी ता.हदगाव या संस्थेला स्वच्छतेचे कंत्राट दिले सदरील कंत्राटदाराकडे सदर कंत्राटी महिला कर्मचारी महानंदा मोटेकर यांचे चार महिन्याचे मानधन थकित असताना सदरील कंत्राटदाराने या महिलेला कामावरुन कमी करण्यात आल्याचे सांगून कामावर येवू नकोस असे म्हणत अरेरावीची भाषा सदर कंत्राटदार वापरत असल्याचे निवेदनात नमूद असून भोकर नगरपरिषद प्रशासनाने सदरील महिलेला पूर्ववत कामावर रुजू करुन घेवून न्याय मिळवून द्यावा अन्यथा कामावर जो पर्यंत घेणार नाही तो पर्यंत नगरपरिषद कार्यालयासमोर अमरण उपोषण सूरुच ठेवणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

# नायगाव मतदार संघात आमदार राजेश पवारांसारख्या विकास पुरुषांना गमवू नका : सांवत

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, ४ ऑगस्ट -**

नायगाव मतदार संघातील आमदार राजेश पवार यांनी जिल्हात इतर आमदारा पेक्षा निधी आणून मतदार संघाचा कायापालट केला असून अशा विकास करणाऱ्या आमदार यांना गमवानुका पुन्हा एकदा येणाऱ्या निवडणुकीत मध्ये निवडणू द्यावे असे आव्हान भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सांवत यांनी केली आहे .

महाराष्ट्रात व केंद्रात महाविकास आघाडीचे सरकार असल्याने शासकीय योजना जनकल्यासाठी करीत आहे पण नायगाव मतदार संघाचे विकास पुरुष आमदार राजेश पवार यांनी शेतकरी पिकाचा उत्पनाचा भाव जास्तीचा मिळावा , विमा ही शेतकरी यांना वेळेत मिळावा , अवैध वाळू माफियावर कार्यवाचा करावी , गोर गरीब घरकुल यांना वाळू मोफत पाच ब्रास मिळावी , मराठा आरक्षण , एसी समाजातील अ ब क ड वर्गीकरण असे मतदार संघातील रस्ते , विज , पाणीपुरवठा , निराधार आधार असे प्रश्न विद्यानसभेत तारांकीत करून न्याय दिला आहे . जिल्हात जेवढा आमदार यांना विकास भेटला नाही तेवढा विकास निधी खेचून आनला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण यासाठी मतदार संघात मोफत फॉर्म भरित आहे हा सामाजिक सर्व योजना असल्या तरी , जि प सदस्या त्यांच्या धर्म पत्नी पुनमताई पवार यांनी ही वंदेमातरम् प्रतिष्टाषण कडून मतदार संघात मोफत चष्मे वाटप तपासनी शिबीर प्रत्येक गावा गावात घेतले आहे त्यामुळे मतदार संघात पन्नास हजारा च्या वर लोकांना सेवा मिळाली आहे . यापुढे ही ज्ञानेश्वर पाटील सावंत म्हणले की आमदार राजेश पवार हे सामाजीक क्षेत्र विकासा प्रमाणे धार्मिक क्षेत्रात भक्ताचे निपुन आहेत नव्हे तर धार्मिक भाविकाचे आमदार वेडे आहेत. म्हणून तर पाच वर्ष गणपती निधी, देवदर्शन, भंडारे ही करून भक्तात विलीन होतात. त्यांच्या धर्म पत्नी पुनमताई पवार यांचा ही सिहांचा वाटा असून त्यांनी बचतगट महिलाना ही मोफत देवदर्शन दिले तर मातृत्व योजना राबवून प्रस्तुती मध्ये बाळाना व मातृवाना किट देवून मदत दिली आहे.

परवा मुदखेड येथेतून दोनहजार दोनशे लोकांना काशी तिथे तिर्थयात्रा जाणाऱ्या भक्ताची मोफत रित्या एकस्ट्रा रेल्वेची मागणी करून तिर्थयात्रेस रवानगी केली आहे यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्येमान भाजप खासदार या सह अनेक माजी आमदार, पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थितीथ होते.

यावेळी अशोकराव चव्हाण म्हणाले की आमदार राजेश पवार सारख्या आमदाराची गरज आहे त्यांनी शासनाच्या अगोदर त्या योजना राबवता त्या बदल मला आनंद होत आहे त्यांच्यामुळे दोन हजार च्या वर लोक तिर्थक्षेत्राला जात आहे निश्चितच त्यांचे राजकीय भविषय सुखकर असणार आहे अशी प्रतिक्रिया अशोकराव चव्हाण यांनी उपस्थित पत्रकार यांना प्रतिक्रीया दिली आहे.

असे कार्य करणाऱ्या विकास पुरुष आमदार राजेश पवार यांना येणाऱ्या निवडणूक काळात गमवूनका पुन्हा आमदार म्हणून संधी द्यावी कारण केंद्रात सरकार आहे राज्यात येणार आहे जे कॉग्रेस सरकार ७० वर्षात केले नाही ते मोदी सरकार केले तर नायगाव मतदार संघात ही ५० वर्ष पुल, रस्ते, गाव अतर्गत रस्ते , असे अनेक मुलभूत विकास आमदार राजेश पवार यांनी केले आहे अशी प्रतिक्रीया उमरी भाजप तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील शिंदे यांनी दै तरून भारत प्रतिनिधीशी दिली आहे.